मासिक वार्तापत्र • अंक २ • सप्टेंबर २०१५ • सहयोग राशी - रु. ५ • १६ पाने



# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक


डिलिव्हरी कामगारांच्या निर्दय शोषणावर उभा आहे ई कॉमर्सचा धंदा ३

अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या झुंझार संघर्षासमोर झुकले केजरीवाल सरकार! ५

समाजवादी रशिया आणि चीनने व्यसनबाजीचे उन्मूलन कसे केले? ८


## मोदी सरकारच्या निवडणुकीतील आश्वासनांचा उडतोय रंग!

### कामगार विरोधी फासिस्ट सत्ताधाऱ्यांचे पितळ उघडे पडतेय!

# अजून काही भ्रम बाकी आहे?

**संपादक मंडळ**

देश स्वतंत्र होऊन या १५ ऑगस्ट रोजी ६८ वर्षे पूर्ण झाली. पुन्हा एकदा देशाचे पंतप्रधान लाल किल्ल्यावरून मोठमोठे दावे, मोठमोठी आश्वासने आणि घोषणा करून निघून घेले. शाळा, कॉलेज आणि कचेऱ्यांमध्ये ध्वजारोहण करून देशातील सामान्य जनतेला देश स्वतंत्र असल्याची आठवण करून देण्यात आली. परंतु ६८ वर्षांच्या स्वातंत्र्याबद्दल देशातील सरकार आणि भांडवलदारांच्या मिडियाने कितीही ढोल बडवले तरी सामान्य माणसाची आवस्था आज कधी नव्हे इतकी बिकट झाली आहे. बेरोजगारी आणि महागाईने नवे उच्चांक गाठले आहेत. देशभरात गरीब दलितांवर आणि महिलांवर पूर्वीपेक्षा जास्त हल्ले होऊ लागले आहेत. भगव्या टोळ्या पसरवीत असलेल्या सांप्रदायिकतेवर, कूपमंडूकतेवर, अंधविश्वासांवर आणि रूढींवर आघात करणाऱ्या आणि सरकारला विरोध करणाऱ्या नागरिकांच्या आणि बुद्धिजीवींच्या हत्या केल्या जात आहेत, त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. अशा वेळी महाराष्ट्रातील भाजप मुख्यमंत्र्यांनी आदेश जारी केला आहे की कोणीही सरकार किंवा मंत्र्यांच्या विरोधात लिहिता कामा नये! अशा प्रकारची पाउले देशभरात उचलण्याची तयारीसुद्धा अनौपचारिकपणे केली जात आहे, व यामुळे एका अघोषित आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. जी कृत्ये सरकार स्वतः पार पाडू शकत नाही ती बजरंग दल, विश्व हिंदू परिषद आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेसारख्या संघटनांमार्फत केली जात आहेत. देशात महागाई, बेरोजगारी आणि भ्रष्टाचाराचे जुने विक्रम मोडले जात असताना सरकारला अशा प्रकारची दमनकारी पाऊले पूर्वीपेक्षा जास्त उचलावी लागणे स्वाभाविक आहे!

या **खऱ्या समस्यांपासून लोकांचे लक्ष हटवण्यासाठी जनगणनेच्या आकड्यांचा फसवा वापर करून देशातील जनतेमध्ये सांप्रदायिक उन्माद भडकवण्याचे नवे प्रयत्न आणि प्रयोग मोठ्या प्रमाणात होत आहेत.** जनगणनेच्या आकड्यांनी हे स्पष्टपणे दाखवून दिले आहे की मुसलमान समाजाच्या वृद्धीचा दर खालावला आहे. परंतु दीर्घ कालावधीत मुसलमान समाजात झालेल्या निरपेक्ष वाढीची मनमान्या पद्धतीने उरलेल्या लोकसंख्येशी तुलना करून एक दिवस मुसलमानांची संख्या हिंदूपेक्षा जास्त होईल, अशी भीती निर्माण केली जात आहे. तीन चार दशकांच्या दीर्घ कालावधीतील वाढीचा दर स्थिर मानण्यात आला तरीदेखील असे होण्यास तीन हजारपेक्षा जास्त वर्षे लागतील! आणि मुसलमान जनतेच्या वाढीच्या दरात आलेली कमी लक्षात घेतल्यास असा दिवस कधी येणारच नाही. परंतु हिटलर आणि त्याचा प्रचार मंत्री गोबेल्सचे अनौरस वंशज देशातील गरीब कष्टकरी जनतेत फूट पाडण्यासाठी त्यांच्यात निराधार भीती निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. आणि हे सगळे होत असताना **मोदी सरकार मेक इन इंडिया अभियानाद्वारे देशातील कष्टकऱ्यांचे श्रम आणि देशाची नैसर्गिक संपदा थाळीमध्ये सजवून देशी विदेशी भांडवलदारांसमोर लुटण्यासाठी पेश करीत आहे.** श्रम कायद्यांमधील प्रस्तावित दुरुस्तीद्वारे देशातील श्रम लुटण्याच्या मार्गातील सारे अडथळे दूर करण्याची तयारी सुरू आहे. अंबानी अदानीसारख्या वाटमारांना, लुटारूंना करातून सूट, कर्ज माफी आणि सब्सिडी दिल्या जात आहेत. ही जनतेच्या कमाईची उघड उघड लूट आहे. देशातील नैसर्गिक संपदा देशाच्या नागरिकांची सामूहिक संपत्ती असते. परंतु तीदेखील जणू चार आणे आठ आणे भावाने ही संपदा टाटा,

पान ६ वर

## सरकारच्या विरोधात बोलण्यावर बंदी, गरीब-अल्पसंख्याकांचे हाल आणि कष्टकऱ्यांची लूट

# हीच आहे महाराष्ट्रातील सरकारकडून चांगल्या दिवसांची भेट

महाराष्ट्रात भाजपचे सरकार बनून एक वर्ष पूर्ण झाले आहे. केंद्रात भाजप सरकारला एका वर्षाहून जास्त काळ झाला आहे. प्रत्येक गल्लीबोळात सरकारला शिव्याशाप मिळत आहेत. आता तर परिस्थिती अशी आली आहे की लोकांची तोंडे बंद करण्यासाठी सरकारला नवे कायदे करावे लागत आहेत. निवडणुकीपूर्वी डरकाळ्या फोडणारे भाजप समर्थक आता बोलायलादेखील कचरताहेत. काळा पैसा, गुड गव्हर्नेन्स, चांगले दिवस, मजबूत सरकार वगैरे भाजप समर्थकांच्या तोंडी असलेले सगळे शब्द आता त्यांच्या तोंडून गायब झाले आहेत. महागाई भ्रष्टाचाराने सगळे विक्रम मोडीत काढले आहेत. २४ ऑगस्टला शेअर बाजारने दिलेल्या झटक्याने अनेकांची झोप उडवली आहे. १०० दिवसात देशाचा कायापालट करायला निघालेल्या भाजपने निवडणुकीआधी जी आश्वासने दिली होती ती आता विनोदाचा विषय बनली आहेत. आता भाजप समर्थक एकच रडगाणे गात असतात – मोदींना अजून पाच वर्षे पूर्ण करू द्या, काँग्रेसने ६० वर्षे लुटले आहे. पाच साल पूर्ण होतील तेव्हा होतील परंतु एका वर्षात भाजपने जे दिवे लावले आहेत त्यावरून सरकारचे इरादे काय आहेत आणि चांगले दिवस कोणाचे येणार आहेत ते पुरेसे स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्रातसुद्धा देवेंद्र फडणवीस यांना युवा नेता, मॉडेल मुख्यमंत्री वगैरे वेगवेगळी विशेषणे लावण्यात आली होती. त्यांच्या शपथविधीवरच १०० कोटी खर्च करण्यात आले होते आणि लोकांना त्यांच्याकडून भरमसाठ अपेक्षाही होत्या. परंतु एका वर्षात त्यांनी जे काही केले आहे त्यावरून फडणवीससुद्धा आपल्या गुरूच्या पावलांवर पाऊल टाकून चालत आहेत हे सर्वांना कळून चुकले आहे.

सरकारने घेतलेल्या प्रत्येक निर्णयावरून सरकार नेमका कशा प्रकारचा महाराष्ट्र घडवू पाहत आहे, कोणासाठी काम करते आहे आणि सरकार कोणाचे शत्रू आहे, ते दिसून आले आहे. बीफवर बंदी आणि श्रम कायद्यांमध्ये फेरबदल तर सरकारने याधीच केलेले आहेत. आता २७ ऑगस्ट रोजी सरकारने एक नवीन परिपत्रक करून सरकारवर टीका करणाऱ्या कोणालाही देशद्रोही घोषित करून तुरुंगात डांबण्याची तरतूदही करून ठेवली आहे. जैन समुदायाचा उत्सव प्रयुषणच्या दिवसांमध्ये अलीकडेच सरकारने मुंबईत चार दिवस आणि मीरा भायंदरमध्ये आठ दिवस कोणत्याही प्रकारच्या मांसविक्रीवर (मासे सोडून) बंदी घातली होती.

सरकारने द्रेशद्रोहाच्या संदर्भात जारी केलेल्या परिपत्रकानुसार सरकारी अधिकारी, नेता मंत्री यांच्यावर टीका केल्यास आपणाला भारतीय दंड संहितेच्या कलम १२४ अ नुसार देशद्रोही ठरवून तुरुंगात डांबले जाऊ शकते. उदाहरणादाखल, आता जर आपण मोदींची तुलना हिटलरशी केली, किंवा सरकारी अधिकाऱ्यांना भ्रष्ट म्हटले, नेत्यांची व्यंगचित्रे काढली, वर्तमानपत्रांमधून सरकारवर दोषारोप केले तर आपल्याला खतरनाक गुन्हेगार ठरवले जाऊ शकते. स्वतःचे तोंड उघडण्याचे मोल आपल्याला तीन वर्षांचा तुरुंगवास किंवा आजीवन कारावस व त्यासोबत दंड भरून चुकवावे लागू शकते. सरकारच्या कोणत्याही लुटारू धोरणावर टीक केल्यामुळे आपले दैव फिरू शकते. अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावर हे नवे आक्रमण म्हणजे महाराष्ट्र सरकारने जनतेला दिलेली नवीन भेट आहे.

पान २ वर

# हीच आहे महाराष्ट्रातील सरकारकडून चांगल्या दिवसांची भेट

पान १ वरून

भाजप सरकार सर्वांचीच काळजी घेते. जैन समुदायाच्या धार्मिक भावना बिलकुल दुखावल्या जाऊ नयेत म्हणून सरकारने त्यांच्या सणासुदीच्या दिवसांत मांसविक्रीवर बंदी घातली. त्यांचे म्हणणे असे की बाजारात लटकणारे मांस बघून त्यांना किळस येते आणि म्हणून जैन लोकांच्या भावनिक कल्याणासाठी मांसविक्रीवर बंदी घालणे गरजेचे आहे. सरकारचे म्हणणे ग्राह्य धरायचे तर मासेविक्रीवरसुद्धा बंदी घातली पाहिजे. तोसुद्धा शुद्ध मांसाहार आहे, आणि कुणालाही त्याचीसुद्धा किळस येऊ शकते. वास्तविक मांसविक्री करणारे प्रामुख्याने मुसलमान आहेत त्यांना लक्ष्य बनवण्यासाठीच सरकारने ही बंदी घातली आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशा प्रकारच्या प्रतिबंधामुळे सर्वाधिक विपरित परिणाम गरीब मुसलमानांवर होत असतो. एखाद्या विशिष्ट खाद्यपदार्थाच्या विक्रीवर बंदी घालणे, आणि तेसुद्धा जेव्हा त्याद्वारे एका मोठ्या लोकसंख्येचे पोट त्यावर अवलंबून असताना! अशा प्रकारचे धोरण एखादा फासीवादी पक्षच लागू करू शकतो. मोदींनी निवडणुकांच्या अगोदर लोकांना आश्वासन दिले होते की ते एक अत्यंत मजबूत सरकार देतील. शरकार खरोखरच मजबूत आहे. जेथे मांसविक्रीवरसुद्धा बंदी घातली जाते, ते सरकार नक्कीच अतिशय मजबूत असले पाहिजे. पुढच्या वर्षी अशाच एखाद्या उत्सवावेळी कांदा आणि लसूण विकण्यालासुद्धा गंभीर अपराध घोषित करण्यात आले, तरी आश्चर्य माणण्याचे कारण नाही.

परंतु गंमत म्हणजे भाजप सरकारने या दिवसांत मांसविक्रीवर बंदी घालताच सरकारचा घटक पक्ष असलेली शिवसेना आणि तिचा सावत्र भाऊ असलेला मनसे पक्ष लगेच चवताळून उठले. इतरांच्या धर्मांनी आमच्या स्वैंपाकघरात येण्याची गरज नसल्याच्या घोषणा ते देऊ लागले. परंतु गोवंशहत्या बंदी करून अनेकांना बेरोजगार बनवताना आणि त्यांच्या अन्नातील महत्त्वाचा घटक हिरावून घेताना आपला धर्म इतरांच्या स्वैंपाकघरातच फक्त घुसत नाही तर त्यांच्या पोटावर लाथ मारतो आहे, हे त्यांना कधी जाणवले नाही!

दाऊद इब्राहिमच्या मुसक्या आवळून आपल्या सरकारचा कणखरपणा दाखवून देऊ असे अगोदर भाजप सरकारने सांगितले होते. दाऊदची गोष्ट दूर राहिलली, प्रत्यक्षात नरेंद्र दाभोळकरांचे मारेकरी अजून पकडण्यात आलेले नाहीत, आणि पानसरेंच्या हत्येसाठी ज्यांना पोलिसांनी अटक केली आहे, ते सनातन भारतीय संस्कृती संस्थेसारख्या भाजपच्या पाठिराख्या संघटनेशी संबंधित असल्याचे उघडकीस आल्यानंतर त्यावर मुख्यमंत्र्यांनी सोयिस्कर मौन धारण केले आहे. उलट दाभोळकर, पानसरेंसारख्यांचा विचार पुढे घेऊन जाऊ इच्छिणाऱ्यांनाच चिरडून टाकण्याची आणि जातियवादी, फासिवादी विचारांना पाठबळ देणाऱ्यांना राजकीय-सांस्कृतिक प्रतिष्ठा मिळवून देण्याचे धोरण सरकार नेटाने राबवते आहे. बा. मो. पुरंदरेंना देण्यात आलेला महाराष्ट्र भूषण पुरस्कार आणि शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी उद्घाटन केलेल्या आंतरराष्ट्रीय मराठी साहित्य संमेलनात शेषराव मोरेंनी केलेले "नरेंद्र दाभोलकरांचे कार्य म्हणजे सावरकरांच्या कार्याचा पुढचा टप्प आहे" हे विधान यावरून महाराष्ट्रातील सांस्कृतिक फासीवादही जास्तीत जास्त स्पष्ट होत चालला आहे.

भाजप पक्ष आपल्या जन्मापासूनच सांप्रदायिक राजकारण करीत आला आहे, किंवा सांप्रदायिक राजकारणेच भाजपला जन्मास घातले आहे, असेही म्हटले जाऊ शकते. भाजप राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या इशाऱ्यानुसार काम करते हे उघड गुपित आहे. इतकी वर्षे संघाने राजकारणाशी आपला संबंध कितीही नाकारलेला असला आणि आपण एक राष्ट्रवादी सामाजिक संघटना असल्याचे कितीही ठासून सांगितलेले असले तरी आता पंतप्रधान आपल्या कार्याचा अहवाल देण्यासाठी संघाच्या बैठकीलाही जाऊ लागले आहेत. हिंदुत्त्ववादी विचारधारा बाळगणारा संघ आपल्या जन्मापासूनच बहुसंख्य हिंदू जनतेच्या मनामध्ये मुसलमान द्वेष कालवत आला आहे. इतकी वर्षांच्या कठोर परिश्रमांनंतर संघाने बहुसंख्य जनतेच्या मनात मुसलमानांच्या विरोधात भयंकर पूर्वग्रह निर्माण केले, त्यांच्या मनात भीती आणि असुरक्षेची भावना निर्माण केली आणि याच भीतीचा फायदा घेऊन भाजप सत्तेत आला. बीफवर बंदी, मांसविक्रीवर बंदी यांसारख्या निर्णयाद्वारे सरकार पूर्वग्रहदुषित बहुसंख्य लोकांचे तुष्टीकरण करून आपली कातडी बचावण्याचा प्रयत्न करीत आहे. दुसरी गोष्ट म्हणजे, मुसलमानांना देशात दुय्यम दर्जाचे नागरिक बनवून ठेवायचे, ही संघाची विचारधारा आहे. सरकार हेच धोरण राबवते आहे. आणि म्हणूनच मुसलमानांवर एकापाठोपाठ एक राजकीय हल्ले सुरू आहेत. या विचारधारेचा वाहक असलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ एक अस्सल फासिवादी संघटना आहे आणि फासीवादी प्रागतिक विचारांना नेहमीच आपला सर्वात मोठा शत्रू मानतात. म्हणूनच सरकार लोकांचे स्वातंत्र्य हिरावून घेणारे कायदे आणते आहे. लोकांच्या मनातील असंतोष कठोरपणे चिरडण्यासाठी असे कायदे उपयुक्त असतात. अशा कायद्यांचे बळी कोण ठरणार? एकमेकांना शिव्या घालणारे आणि तू नंगा तू नंगा करणारे वेगवेगळ्या पक्षांचे बडे नेते या कायद्यांचे बळी ठरणार नाहीत, हे ठरलेले आहे. शिव सैनिक, अभाविपचे गुंड यांना हे कायदे लागू होणार नाहीत. या कायद्यांचे बळी ठरणार धार्मिक अल्पसंख्यांक, दलित, प्रागतिक विचार बाळगणारे आणि त्यांचा प्रचार-प्रसार करणारे कार्यकर्ते, बुद्धिजीवी व कलाकार, आणि त्याहून जास्त क्रांतिकारी कामगार संघटना. कष्टकऱ्यांना त्यांच्या हक्कांबद्दल जागरूक आणि एक करणाऱ्यांना नक्सलवादी घोषित करून कोणत्याही पुराव्यांशिवाय यापूर्वीसुद्धा तुरुंगात डांबण्यात आल्याची उदाहरणे काही कमी नाहीत. आता तर त्यांना देशद्रोही घोषित करून त्यांचा काटा काढणे आणि न्याय्य हक्कांसाठीच्या शोषितांच्या चळवळी कायदेशीरपणे मोडीत काढणे आणखीनच सोपे होणार आहे. एकीकडे कामगारांचे हक्क हिरावून घेताना दुसरीकडे कामगार आंदोलनांना आता जास्त निर्दयपणे चिरडून टाकले जाईल, व लोकांचा आवाज दाबून टाकण्याचा पक्का बंदोबस्त केला जाईल. देश जणू कैदखाना बनवून टाकण्याचे प्रयत्न केले जातील. अशा वेळी आपण कामगारांनी काय केले पाहिजे? कामगारांपाशी गमावण्यासारखे त्यांच्या बेड्या सोडून दुसरे काहीच नाही, आणि जिंकण्यासाठी सारे विश्व आहे. "जगातील कामगारांनो, एक व्हा", हा मार्क्स ने दिलेला विचार आपल्यासाठी आज पूर्वीपेक्षा जास्त प्रासंगिक नाहीये का?

**विराट**

●

**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**



## 'कामगार बिगुल' ची वेबसाइट

www.marathi.mazdoorbigul.net

**फेसबुक पेज**

www.facebook.com/kamgarbigul

सहकाऱ्यांनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लुट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

रुम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३ मो. नं. ९७६९९०३५८९, ९७६४५९४०५७, ९६१९०३९७९३

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

संपादक मंडळ : नारायण खराडे, विराट चौधरी

संपादकीय कार्यालय : रुम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३

संपर्क : ९७६९९०३५८९, ९७६४५९४०५७, ९६१९०३९७९३

ईमेल : bigulakhbar@gmail.com

सहयोग राशी : रु. ५ (एका अंकासाठी)
वार्षिक - रु. ७० (टपाल शुल्कासह)

# डिलिव्हरी कामगारांच्या निर्दय शोषणावर उभा आहे ई कॉमर्सचा धंदा

पाठीवरती भल्यामोठ्या बॅगा घेऊन ग्राहकांना माल पोहोचवण्याऱ्या गडबडीत सुसाट मोटरसायकल चालवणारे आपण पाहिले असणार. हे आहेत फ्लिपकार्ट, अमेझॉन आणि स्नॅपडिलसारख्या ई कॉमर्स कंपन्यांचे माल पोहोचवणारे कामगार. गेल्या काही वर्षांत ऑनलाईन शॉपिंगच्या कारभारात जबरदस्त वाढ झाली आहे. ही वाढ एक लाख कोटीपेक्षाही जास्त असल्याचे निश्चित झाले आहे. भांडवली प्रसारमाध्यमे आणि सुखवस्तु मध्यवर्ग या ऑनलाईन कंपन्यांचे फार गुणगान करताना दिसून येतात. माऊसवर क्लिक केल्यावर त्यांच्या गरजा आणि चैनीच्या सगळ्या वस्तू त्यांच्या घरांपर्यंत सहज पोचविल्या जातात.जर या ऑनलाईन शॉपिंगच्या कार्यप्रणालीकडे गांभीर्याने पाहिले तर असे लक्षात येईल की या कंपन्या ग्राहकांना भरभरून सवलती यासाठी देऊ शकतात कारण त्यांच्यासाठी काम करणाऱ्या डिलिवरी कामगारांचे भयानक शोषण केले जाते. आज या असंख्य कंपन्यांसाठी काम करणाऱ्या डिलिवरी कामगारांची संख्या लाखोंच्या घरात आहे. २१ व्या शतकात भांडवली उत्पादकांनी आपल्या उत्पादन प्रणालीमध्ये अनेक बदल केले आहेत. तसेच उत्पादनाच्या वितरण तंत्रातही मोठ्या प्रमाणात बदल झालेले दिसून येतात. म्हणूनच ऑनलाईन शॉपिंगची कार्यप्रणाली समजून घेणे गरजेचे आहे.

आपल्या विलासित गरजा भागवण्यासाठी मध्य वर्ग आणि उच्च वर्गातील लोकांना बाजारात जाणं त्रासदायक वाटतं, हे ई कॉमर्सच्या वाढत्या व्यवसायाचं एक कारण सांगता येईल. हा त्रास कमी करण्यासाठी आणि बाजाराच्या किंवा त्यापेक्षाही कमी भावात सगळ्या वस्तू त्यांना सहज मिळू शकतात. म्हणूनच इंटरनेट आणि ऑनलाईन बँकिंगच्या प्रसाराने ऑनलाईन शॉपिंगसाठी आवश्यक भक्कम संरचना उभी केली आहे. अशा वेळी, फ्लिपकार्ट, अमेझॉन, स्नॅपडिलसारख्या कंपन्या इतक्या कमी दरात वस्तू कशा विकू शकतात, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. मार्क्सवादी वैज्ञानिक विचार असे सांगतो की मालाची किंमत त्याच्या विनिमय मूल्यावर आधारलेली असते. त्याचा स्रोत असतो उत्पादनात लागलेले कामगारांचे श्रम. मालामध्ये मूल्य निर्माण करण्याच्या मोबदल्यात कामगारांना उत्पादनातील एक छोटा हिस्सा पगाराच्या रूपात मिळतो व अधिक मोठा हिस्सा भांडवलदाराकडे जातो. शेतमजुरांकडून मिळवलेला उत्पन्नाचा अधिक भाग भांडवलदाराच कमावतात, आणि त्यातूनच वितरण क्षेत्रात व्यापारी दुकानदारांमध्ये वाटणी केली जाते.

रुढार्थाने दुकानदाराला एक दुकान घ्यावे लागते आणि ग्राहकाला आकर्षित करण्यासाठी तेथे वेगवेगळ्या प्रकारे खर्च करावा लागतो. ऑनलाईन शॉपिंगच्या कंपन्या हा खर्च वाचवतात. ती वाहतुकदारांचा आधार घेते आणि किंमतीत काटछाट करून कमीत कमी किंमत ठेवून आपल्या वेबसाईट, ईमेल इत्यादींच्या माध्यमातून ग्राहकांना आकर्षित करते. एवढेच नाही तर काही कंपन्या ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी व बाजारात आपले स्थान पक्के करण्यासाठी तात्पुरते नुकसान सहन करून माल कमीत कमी किंमतीत विकायलाही तयार होतात. तात्पुरता जो तोटा सहन करावा लागतो त्याहून कितीतरी अधिक पैसा त्यांच्यापाशी असल्यामुळे ते असे करू शकतात. अमेझॉनने तर अमेरिकेच्या बाजारात आपले अस्तित्त्व अशाच प्रकारे स्थापित केले आहे. आणि तिच्यापाशी एवढी संपत्ती आहे की तोटा सहन करूनही ती आपला कारभार सुरळीत चालवू शकते.

फ्लिपकार्टसारखी भारतीय कंपनीदेखील अशा कंपन्यांमध्ये पैसा लावते कारण तिला विश्वास असतो की भविष्यात या कंपन्या जास्तीत जास्त नफा



कमावून चांगली भरपाई मिळवतील. ऑनलाईन शॉपिंगच्या ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या बक्षिसांचा सर्वसामान्य उद्देश असतो पारंपारिक दुकानदार आणि व्यापाऱ्यांना नेस्तनाबूत करण्याचा. म्हणूनच दुकानदार आणि व्यापारी ई कॉमर्स कंपन्यांच्या विरोधात एकत्र येऊन सरकारवर या कंपन्यांच्या विरोधात दबाव आणण्याचा प्रयत्न करतात. परंतु भांडवली वृत्तीची गतीच अशी असते की ती छोट्या व्यापाऱ्यांना आणि दुकानदारांना चिरडून टाकते. हे अगदी ठरलेले आहे.

वेगवेगळ्या सवलतींचे आमिष दाखवून ऑनलाईन शॉपिंग कंपन्या ग्राहकांना आकर्षित करण्यात यशस्वी होतात, आणि वेबसाईटद्वारे ग्राहक मालाची ऑर्डर देतात. त्यांच्या पुढ्यात एक स्पर्धा निर्माण होते – कमीत कमी किंमतीत आणि कमीत कमी वेळेत माल पोहोचविण्याची. आणि येथूनच माल वाहतूक कामगारांची भूमिका सुरू होते. सर्वसाधारणपणे ऑनलाईन कंपन्या डिलिव्हरी कामगारांना कंपनीत सामावून घेत नाहीत तर कंत्राटी पद्धतीवर काम चालते. कंत्राटदार डिलिव्हरी कामगारांमार्फत माल पोहोचविण्याचे काम करतात. ग्राहकांपर्यंत माल पोहोचवणारे हे कामगार म्हणजेच ऑनलाईन कंपन्यांचा ग्राहकांशी असलेला खरा दुवा आहेत, जो गोदामातील माल ग्राहकांपर्यंत पोहोचवतो.

भारतात ट्रॅफिक आणि खराब रस्त्यांमुळे माल सहसा मोटरसाईकलनेच पोहोचवला जातो. एक तर त्यामुळे वाहतुकीचा खर्च कमी होतो, शिवाय वेळेत माल पोहोचवता येतो. पण याची दुसरी बाजू म्हणजे माल वाहतूक करणाऱ्या कामगारांवरचा दबाव वाढत जातो. हे कामगार दररोज सुमारे चाळीस किलोचा माल पाठीवर बांधून ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी दिवसभर मोटरसायकलने फिरत असतात. मध्यवर्गीय इमारतींमध्ये बऱ्याचदा त्यांना लिफ्टमधून जायचीदेखील परवानगी नाकारली जाते. त्यामुळे हे ओझे पायऱ्यांवरून चढून वर न्यावे लागते व उतरावे लागते. जीव तोडून केलेल्या या कष्टांचा परिणाम म्हणजे काही महिन्यांतच हे कामगार पाठीचे दुखणे, मान दुखणे, स्लीप डिस्क, स्पॉन्डिलाईटिस यांसारख्या आजारांच्या विळख्यात सापडतात. दिल्लीमधील सफदरजंग इस्पितळातील स्पोर्ट्स इंज्युरी सेंटरच्या डॉक्टरांच्या मते दर दिवशी त्यांच्याकडे येणाऱ्या पेशंटपैकी एक-दोन पेशंट हे कोणत्यातरी ऑनलाईन शॉपिंग कंपनीचे कामगार असतात. कंत्राटी पद्धतीमुळे त्यांना कोणत्याही सुविधादेखील पुरविल्या जात नाहीत. वेळेत माल पोहोचवण्याच्या घाईत अपघात होण्याची शक्यताही असतेच. अशा अपघातांच्या प्रसंगीदेखील त्यांना कंपन्यांकडून कोणतीही मदत दिली जात नाही, वा उपचाराचा खर्च करण्याची जबाबदारीसुद्धा कंपन्या घेत नाहीत.

या भयंकर शोषणाला कंटाळून नुकताच मुंबईत फ्लिपकार्ट आणि मिंत्रासारख्या ई कॉमर्स कंपन्यांच्या ४०० वाहतूक कामगारांनी संप करण्याचा निर्णय घेतला. एवढे कष्ट उपसूनही पगार मात्र अगदीच कमी दिला जातो, अशी त्यांची तक्रार आहे. त्यांपैकी एका कामगाराने सांगितले की त्याने २०११ साली रु.७२०० च्या पगारावार काम सुरू केले आणि अजून साधा ३००० रुपयेदेखील वाढीव पगार मिळत नाहीये. कामाला सुरुवात केली त्यावेळी त्यांना सांगण्यात आले होते की दररोज ३० ते ४० डिलिव्हरी कराव्या लागतील, परंतु प्रत्यक्षात ६० ते ७० डिलिव्हरी कराव्या लागतात. या कामगारांना सकाळी ७ वाजता कामावर हजेरी लावावी लागते, आणि काम संपण्याची वेळ मात्र निश्चित नसते. दिवसभरात ना आराम, ना जेवणासाठी पुरेसा वेळ. इतकेच नाही तर ऑफिसमध्ये शौचालयाचीसुद्धा धड व्यवस्था नसते. त्यांच्यासाठी सुट्टीला काही अर्थच नसतो. सणासुदीच्या दिवशी तर कामाचा ताण आणखीनच वाढतो. कारण अशा वेळी ई कॉमर्स कंपन्या नवनव्या सवलती आणतात व ग्राहकांकडून येणारी मागणी आणखीनच वाढते.

अशा एकंदर परिस्थितीत मुंबईतील कामगारांनी आपल्या शोषणाच्या विरोधात आवाज उठवणे ही एक सकारात्मक बाब आहे. परंतु, हे कामगार फॅसिस्ट विचारसरणी असलेल्या व शिवसेनेतून फुटून उदयास आलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या नियंत्रणाखाली आहेत, हे दुर्लक्षून चालणार नाही. मुंबईतल्या झुंजार कामगार आंदोलनाची कंबर मोडण्याचे काम शिवसेनेनेच भांडवलदार वर्गाकडून सुपारी घेऊन केले होते, हे सर्वज्ञात आहे. आजसुद्धा भांडवलदार मालकांकडून दलाली खाऊन कामगारांचा संघटित संघर्ष कमकुवत करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे मनसेसारख्या फॅसिस्ट पक्षाचा कामगाराच्या संघर्षात हस्तक्षेप असणे ही बाब चिंताजनक आहे. आज प्रत्येक क्षेत्रात कामगारांनी मालकधार्जिण्या व तडजोडवादी कामगार संघटनांमधून बाहेर पडून क्रांतिकारी ट्रेड युनियन बनवणे अपरिहार्य आहे. फक्त रोजरोजच्या शोषणाच्या विरोधातील संघर्ष पुरेसा आहे असे नाही, तर त्याही पलीकडे जाऊन परिवर्तनाच्या लढाईची तयारी आजपासूनच करावी लागणार.


**आनंद सिंह**
**अनुवाद - सुदेश जाधव**

●

# तर्कवादी विचारवंत कलबुर्गी यांची हत्या
# धार्मिक कट्टरतावाद्यांचे आणखी एक भ्याड कृत्य

३० ऑगस्ट २०१५ च्या पहाटे प्रसिद्ध कन्नड साहित्यिक, तर्कवादी विचारवंत, संशोधक आणि लेखक प्रा. एम.एम. कलबुर्गी यांची कट्टरपंथी हिंदुत्त्ववादी फासिवाद्यांनी हत्या केली. कर्नाटकसह देशभरात सामाजिक-लोकशाहीवादी संघटना, कार्यकर्ते, विद्यार्थी, शिक्षक, बुद्धिजीवी यांनी मोठ्या संख्येने हिंदुत्त्ववादी फासिवाद्यांच्या या भ्याड कृत्याच्या विरोधात आपला रोष प्रकट केला. बेंगळुरु येथे प्रसिद्ध कलाकार गिरिश कर्नाड यांच्यासह साहित्य, कला आणि संस्कृतीच्या क्षेत्रातील अनेक नावाजलेल्या व्यक्ती या घटनेच्या विरोधातील मोर्चामध्ये सहभागी झाल्या. धारवाड व हंपी विद्यापिठांच्या विद्यार्थ्यांनी जबरदस्त निषेध करत खुन्यांना लवकरात लवकर पकडण्याची मागणी केली. मंगळुरूमध्येसुद्धा या हत्येमुळे सुन्न झालेल्या शिक्षक, विद्यार्थी व शैक्षणिक क्षेत्रातील लोकांनी कलबुर्गी यांना श्रद्धांजली वाहिली. दिल्लीतील जंतरमंतरवर या घटनेच्या विरोधात झालेल्या सभेत वेगवेगळ्या प्रागतिक, डाव्या व लोकशाहीवादी संघटनांनी भाग घेतला. या व्यतिरिक्त मुंबई, चेन्नई, हैद्राबाद, इलाहाबाद, लखनौ, गोरखपूर, पटना, वाराणसी, कोलकाताबरोबर ठिकठिकाणी या घटनेच्या निषेधार्थ सभा, मोर्चे झाले.

साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित प्रा. कलबुर्गी हे धारवाडमधील कर्नाटक विद्यापिठाच्या कन्नड विभागाचे प्रमुख होते व नंतर त्यांनी हंपी येथील कन्नड विद्यापिठाचे कुलगुरुपदही भूषवले होते. एक प्रबुद्ध बुद्धिजीवी आणि तर्कवादी म्हणून कलबुर्गी यांचे जीवन म्हणजे धार्मिक कुरीतींच्या, अंधविश्वासांच्या, जातीप्रथेच्या, कर्मकांडांच्या व सडक्या जुन्या मान्यता आणि परंपरांच्या विरुद्ध संघर्षातील एक आदर्श होते. या दरम्यान कट्टरतावादी संघटनांकडून त्यांना सतत धमक्या आणि हल्ल्यांना तोंड द्यावे लागले, परंतु या धमक्यांना आणि हल्ल्यांना भीक न घालता कलबुर्गींनी आपले संशोधन आणि प्रचार-प्रसाराचे काम सुरूच ठेवले. प्रा. कलबुर्गी एक असे संशोधक आणि इतिहासकार होते ज्यांची इतिहासाचा अभ्यास, शोध आणि उद्देश्य यांच्याबद्दलची दृष्टी यथास्थितीवादाच्या विरोधात सतत संघर्ष करीत राहिली. त्याचबरोबर कलबुर्गी आपले संशोधन शैक्षणिक गल्ल्यांतून बाहेर नाटक, कथा, चर्चा, वादविवाद यांच्या माध्यमांतून व्यवहारात उतरवण्यासाठी नेहमीच तत्पर असायचे आणि म्हणूनच यथास्थितीवादाचे संरक्षक, धार्मिक कट्टरपंथियांना त्यांचे विचार सर्वाधिक अस्वस्थ करायचे. त्यामुळेच त्यांची हत्या करण्यात आली. खुद्द कलबुर्गी यांच्या शब्दांमध्ये सांगायचे झाल्यास – ऐतिहासिक तथ्यांवर दोन प्रकारचे संशोधन होत असते. पहिला प्रकार सत्याचा शोध लावून थांबतो, दुसरा त्याच्या पुढे जाऊन वर्तमानाचा पथप्रदर्शक बनतो. पहिल्या प्रकारचे संशोधन फक्त शैक्षणिक पद्धतीचे असते, तर दुसऱ्यामध्ये वर्तमानाला मार्गदर्शन केले जाते. वर्तमानातील प्रश्नांवर



इतिहासाकडून मिळणाऱ्या शिकवणीचा प्रकाश टाकणाऱ्या दुसऱ्या प्रकारच्या संशोधनावर आपण जोर द्यावा, ही काळाची गरज आहे.

प्रा. कलबुर्गी यांनी प्राचीन कन्नड श्लोकांच्या, पुरालेखांच्या व शिलालेखांच्या अनुवादात आणि विवेचनाध्ये अद्वितीय योगदान दिले. अकराव्या आणि बाराव्या शतकात विकसित वाचन साहित्याचे त्यांनी सखोल अध्ययन केले आणि अनेक शोधपत्रांमधून तत्कालिन पश्चिमी चालुक्य साम्राज्याच्या काळातील सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीची व्याख्या केली. त्या काळातील प्रसिद्ध तर्कवादी संत बसव यांच्या श्लोकांना त्यांनी आपल्या संशोधनाचा आधार बनवले. त्यांच्याच आधारे खोदकामात सापडलेल्या शिलालेखांचा आधुनिक कन्नडमध्ये अनुवाद केला आणि २२

पान ७ वर

# कुठवर अंधश्रद्धेच्या बळी ठरत राहतील महिला?

गेल्या ७ ऑगस्टच्या रात्री झारखंडमधील कांझिया माराएतोली गावातील पाच महिलांना हडळी घोषित करून व त्यांना विवस्त्र करून अत्यंत निर्घृण पद्धतीने ठार मारण्यात आले. या महिला गावातील मुलांवर काळी जादू करीत होत्या व त्यामुळे मुले आजारी होऊन मृत्यूमुखी पडत होती, असा गाववाल्यांचा आरोप होता. गावातील एका १८ वर्षांच्या मुलाच्या मृत्यूसाठीदेखील याच पाच महिलांना जबाबदार धरण्यात आले व त्यानंतर त्यांना ठार मारण्यात आले. सात ऑगस्टच्या रात्री सुमारे १०० गावकरी शस्त्रे घेऊन या पाच महिलांच्या घरात घुसले व त्यांना फरफटत मैदानात घेऊन आले. यानंतर पंचायत बोलावण्यात आली व या महिलांना विवस्त्र करून चाकू, काठ्या आणि दगडांनी त्यांचा जीव जाईपर्यंत मारण्यात आले. मृत्यूचे हे तांडव पाच तास सुरू होते. मृतांच्या कुटुंबियांनी पोलिसांना बोलवले, परंतु पोलिस कोणतीही कारवाई न करताच परत गेले.

ही अशा प्रकारची ना पहिली घटना आहे, ना शेवटची. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागानुसार २००८ ते २०१३ या वर्षांमध्ये अशाच प्रकारे झारखंडमध्ये २२० महिलांना, ओरिसामध्ये १७७ महिलांना, आंध्रप्रदेशमध्ये १४३ महिलांना आणि हरयाणामध्ये ११७ महिलांना हडळी घोषित करून मारून टाकण्याचे प्रकार घडले आहेत. या कालावधीमध्ये देशभरात अशा प्रकारे २२५७ हत्या करण्यात आल्या. येथे आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की हे आकडे वास्तविक चित्र सादर करीत नाहीत, कारण बहुतेक प्रकरणांमध्ये मृतांचे कुटुंबिय गुन्हेगारांच्या दहशतीपायी तक्रार नोंदवीत नाहीत किंवा पोलिस अशा घटनांची नोंद करण्यास टाळाटाळ करतात.

एकट्या राहणाऱ्या विधवा प्रामुख्याने अशा प्रकारच्या रानटी प्रथांच्या बळी ठरतात. हडळी घोषित करून त्यांना अपमानित केले जाते व त्यांच्यावर भीषण अत्याचार केले जातात. विवस्त्र करणे, मुंडन करणे, दात पाडणे, मल-मूत्र खाण्यास किंवा जनावरांचे रक्त पिण्यास भाग पाडले जाणे, जीवे मारणे ही या रानटीपणाची फक्त काही उदाहरणे आहेत. ज्या महिलांना जिवे मारण्यात येत नाही त्यांना गावातून हद्दपार केले जाते. जीवनाच्या मूलभूत संसाधनांपासून वंचित करून नव्या प्रदेशात राहण्यास त्यांना भाग पाडले जाते. खरे तर झारखंड, छत्तीसगढ, बिहार, ओरिसा, आणि राजस्थान या राज्यांमध्ये हडळ प्रथेच्या विरोधात कायदे अस्तित्वात आहेत, परंतु पुस्तकांची शोभा वाढवण्यापलीकडे त्यांना काहीही महत्त्व नाही.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे अशा प्रकारच्या अनेक घटनांमध्ये या निरंकुश प्रथेच्या आडून जमीन बळकावण्याचे वा जमिनीसंबंधीचे वाद कायदाबाह्य मार्गाने सोडवण्याचे प्रकार चालतात. जेव्हा पतीच्या मृत्यूनंतर जमिनीची मालकी पत्नीकडे जाते तेव्हा तिची जमीन गिळंकृत करण्यासाठी नातेवाईक या कुप्रथेचा आधार घेतात. विधवा महिलेला हडळ ठरवून तिला वेगवेगळ्या संकटांसाठी, दुर्घटनांसाठी, रोगांसाठी जबाबदार धरून तिची सामूहिक हत्या केली जाते व अशा प्रकारे जमीन बळकावण्याचे इरादे पार पाडले जातात. आपल्या दुःखांसाठी हडळींनी केलेली काळू जादू कारणीभूत असल्याचा अंधविश्वास भारतीय जनमानसात खोलवर रुजलेला असल्याने हडळी घोषित करून महिलांच्या होणाऱ्या हत्यांना न्याय्य ठरवतानाच या अत्यंत क्रूर हत्या घडवून आणण्याच्या प्रक्रियेतही सर्वसामान्य माणसे सहभागी होत असतात. खाजगी संपत्तीवर हक्क प्रस्थापित करण्याची भूक अशा निरंकुश महिला विरोधी कुप्रथेद्वारे शांत केली जाते.

आजच्या आधुनिक काळातही आपला समाज अशा प्रकारच्या आदिम कुप्रथांना चिकटून कां राहिला आहे, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. याचे कारण भारताच्या वासाहतिक इतिहासात आहे. भारताची सरंजामशाहीतून (जमीनदार, राजे-रजवाडे असलेली व्यवस्था) भांडवलशाहीपर्यंतची वाटचाल पाश्चात्य जगाप्रमाणे झाली नाही. पाश्चात्य समाजातील भांडवलशाहीला पुनर्जागरण, प्रबोधनाच्या चळवळींचा आधार होता. क्रांत्यांनी तेथील तमाम मागासलेल्या, पुराणमतवादी मूल्यांना उपटून फेकून दिले व त्यांच्या जागी तर्क आणि विज्ञानावर आधारित दृष्टिकोणाची पताका फडकवली. आज पाश्चात्य भांडवलशाहीदेखील रोगट व ऱ्हासोन्मुख झालेली आहे हे खरे, परंतु कधी काळी ती विज्ञान, लोकशाही, तर्क यांची वाहक होती. भारतीय समाज या उलथापालथीपासून नेहमीच वंचित राहिला. वसाहतपूर्व काळात भारतात स्वतंत्र भांडवली विकासाच्या ज्या शक्यता अस्तित्वात होत्या त्या ब्रिटिश वसाहतवादाने नष्ट केल्या. भारतीय भांडवलशाही वसाहतवादाच्या गर्भातून जन्माला आलेली विकलांग आणि थोटी भांडवलशाही आहे जिने आपल्या अनुरूप संस्कृती निर्माण केली आहे. भारतीय भांडवलशाहीने शतकांपासून चालत आलेल्या वेगवेगळ्या निरंकुश, महिलाविरोधी सडक्या मूल्यांना, अंधविश्वासांना ध्वस्त करण्याऐवजी त्यांचा स्वीकार केला व नव्याच्या नावाखाली जे काही स्थापन केले तेदेखिल निरंकुश होते. ही सारी पुराणपंथी मूल्ये समाजाच्या रोमारोमात अशी काही भिनली आहेत की आजही भारतीय माणूस जादू टोना, तंत्र मंत्र इत्यादींवर विश्वास ठेवतो. नैसर्गिक आणि सामाजिक परिघटनांकडे पाहण्याच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव त्यांना अंधविश्वासाकडे घेऊन जातो.

आज भांडवलशाही मोठ्या प्रमाणात खाजगीकरणाचा वरवंटा चालवून जनतेपासून आरोग्य, शिक्षण, रोजगार यांसारख्या मूलभूत सुविधासुद्धा हिरावून घेते आहे आणि लोकांना परिघावर ढकलते आहे. वास्तविक भांडवलशाहीची गती अशीच असते. कोट्यावधी कष्टकऱ्यांना दारिद्र्य आणि अडचणींच्या समुद्रात ढकलूनच ती बहरत असते. तर्काच्या अभावामुळे जनता आपल्या विपन्नावस्थेसाठी भांडवलशाहीला जबाबदार ठरवण्याऐवजी भूत-प्रेत, मागच्या जन्माचे कर्म, अलौकिक शक्ती यांना जबाबदार ठरवते आणि त्यांना शांत करण्यासाठी मग जादू टोणा, भूतप्रेत, तंत्र मंत्र, वेगवेगळ्या प्रकारचे बाबा यांचा आधार घेते. भांडवलशाही आज जनतेच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन अंधविश्वासांना उत्तेजन देण्याचे काम करते आहे आणि तिने या गोष्टींचे रूपांतर एका संघटित उद्योगामध्ये केले आहे, ते उगीच नाही. अळंब्यांसारखे पसरलेले बाबा आणि तथाकथित चमत्कारिक लॉकेट इत्यादींचे व्यापारी याचे जिवंत उदाहरण आहेत. लोकांना अंधविश्वासाच्या कैदेत जखडून ठेवणे म्हणजे भांडवलशाहीसाठी वरदान आणि जनतेसाठी अभिशाप आहे.

**श्वेता**

●

## अमर हुतात्मा राजगुरू यांच्या १०७ व्या जन्मदिनानिमित्त 'कामगार बिगुल टीम' च्या वतीने क्रांतिकारी सलाम!



स्वातंत्र्यानंतर क्रांतिकारक हुतात्म्यांच्या विचारांना दाबून टाकण्याचे प्रयत्न सर्व सरकारांनी करून आजसुद्धा जनतेच्या मनात त्यांच्या बद्दल अथांग प्रेम व आदर आहे. त्यांचे विचार आजही जनतेचे शोषण करणाऱ्या सरकार व नेत्यांसाठी तितकेच धोकादायक आहेत जितके ते त्यांच्या काळात ब्रिटीश राज्यकर्त्यांसाठी धोकादायक होते. नेमके हेच कारण आहे की वाह्यात जाहिराती आणि भ्रष्टाचारी नेत्यांच्या जयंती-पुण्यतिथी निमित्त त्यांच्या चित्रांनी वर्तमानपत्रांची पानेच्या पाने भरवणाऱ्या मिडियाला मागील महिन्यात अमर हुतात्मा राजगुरुंची जयंती लक्षात राहिली नाही.

पुण्याजवळील खेडेगावात २४ ऑगस्ट १९०८ रोजी जन्मलेले शिवराम हरि राजगुरू वयाच्या केवळ २२व्या वर्षी फाशीच्या तख्तावर गेले. पण ते ज्या स्वप्नांसाठी फाशीच्या तख्तावर गेले ती स्वप्ने आजसुद्धा अपूर्ण आहेत. आजच्या तरुण-तरुणींना त्यांच्या मार्गावर चालण्याचा संकल्प करून हे सिद्ध करावे लागणार आहे की त्यांचे हौतात्म्य व्यर्थ गेलेले नाही. त्यांनी फाशीच्या काही दिवस अगोदरच त्यांच्या एका सहकाऱ्याला सांगितले होते - **"मृत्यूला आव्हान देऊनच मी सत्य काय आहे ते जाणले आहे. तुम्हाला काय वाटते की आता शेवटच्या क्षणी मी मृत्युच्या भयाने त्याच्याकडून पराभूत होईन? आणि मी जे काही केले आहे त्याबद्दल जितका अभिमान तुम्हाला आहे, तितकाच अभिमान मला सुद्धा आहे. आपल्या प्राणांची आहुती देऊन ह्या देशातील करोडो तरुण-तरुणींना ह्या स्वर्गाची दारे आपण उघडून दाखवू शकलो तर राहिलेले कार्य ते स्वतःच तडीस नेतील. अश्या सुंदर मृत्यूवर पश्चाताप करणाऱ्याला मूर्खच म्हटले पाहिजे. क्रांतिकारकांसाठी असा मृत्यू म्हणजे इच्छा केलेले वरदान प्राप्त होण्यासारखेच आहे"**.



## जगभरातील कामगारांचे शिक्षक व चीनी क्रांतीचे महान नेते माओ यांच्या पुण्यतिथि निमित्त

• कम्युनिस्टांनी नेहमीच सत्याची बाजू उचलून धरायला हवी, कारण प्रत्येक सत्य हे जनतेच्या हिताचे असते. कम्युनिस्टांनी सदा सर्वदा आपल्या चुका सुधारण्यास तयार राहिले पाहिजे, कारण चुका जनतेच्या हितांच्या विरुद्ध असतात.

**माओ त्से तुङ (युती सरकारसंबंधी) २४ एप्रिल १९४५**

• कम्युनिस्टांनी दूरद्रष्टे बनायला हवे, आत्मबलिदानासाठी सर्वात जास्तत तयार राहायला हवे, सर्वाधिक खंबीर बनायला हवे, परिस्थिती ओळखण्यात भांडवलदारांहून कणभरही कमी असता कामा नये, तसेच त्यांनी बहुसंख्य सामान्य जनतेवर विश्वास करायला हवा व त्यांचा पाठिंबा मिळवायला हवा.

**माओ त्से तुङ (जपानी आक्रमणाच्या काळात चिनी कम्युनिस्ट पार्टीची कर्तव्ये) ३ मे १९३७**

• प्रत्येक कम्युनिस्ट हा बीजासारखा असतो, आणि जनता भूमीसारखी. आपण जेथे जेथे जाऊ, तेथे जनतेबरोबर एकता निर्माण केली पाहिजे, आपली मुळे त्यांच्यात खोलवर रुजवली पाहिजेत आणि त्यांच्यामध्ये बहरले पाहिजे.

**माओ त्से तुङ (छुङकिङ संधी बोलणीसंबंधी) १७ ऑक्टोबर १९४५**

• सर्वच गोष्टींबाबत जनतेशी एकरूप होण्याची क्षमता आपण कम्युनिस्टांमध्ये अवश्य असली पाहिजे. आपले पार्टी सदस्य जर बंद खोलीत बसून उभे आयुष्य काढणार असतील आणि जगाचा सामना करण्यासाठी व वादळांना तोंड देण्यासाठी कधी बाहेर पडणार नसतील, तर त्याने चिनी जनतेचे काय भले होणार आहे? कणभरसुद्धा नाही, आणि अशा प्रकारचे पार्टी सदस्य आपल्याला नको आहेत. आपण कम्युनिस्टांनी जगाचा सामना केला पाहिजे, वादळांना तोंड दिले पाहिजे, हे जग लोक संघर्षांचे विशाल जग आहे आणि हे वादळ लोक संघर्षांचे जबरदस्त वादळ आहे.

**माओ त्से तुङ (संघटित व्हा) २९ नोव्हेंबर १९४३**

• कम्युनिस्टाने कधीच हेकटी असता कामा नये, त्याने इतरांवर मते लादू नयेत. आपण प्रत्येक गोष्टीत प्रवीण आहोत आणि इतरांना मात्र काहीच येत नाही, असे त्याने कधीच समजू नये, त्याने स्वतःला आपल्या छोट्याशा खोलीता बंद करून घेता कामा नये, मोठमोठ्या बाता मारू नयेत व अधिकार गाजवू नये.

**माओ त्से तुङ (शेनशी कानसू निङ्या सीमान्त क्षेत्रात प्रतिनिधी सभेत भाषण) २१ नोव्हेंबर १९४१**

# अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या झुंझार संघर्षासमोर झुकले केजरीवाल सरकार!

## ‘दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स एंड हेल्पर्स यूनियन’च्या नेतृत्वाखाली अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या संघर्षाचा शानदार विजय

दिल्लीमध्ये ‘आई-सी-डी-इस स्कीम’च्या माध्यमातून काम करत असलेल्या अंगणवाडी सेविका व हेल्पर्सच्या २३ दिवस चाललेल्या झुंझार संघर्षासमोर केजरीवाल सरकारने गुडघे टेकले आहेत. आपल्या मागण्यांसाठी ७ दिवस अनिश्चितकालीन उपोषणास बसलेल्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या सर्व तात्कालिक मागण्या विनाअट मान्य करणे केजरीवाल सरकारला भाग पडले आहे. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना हा विजय ‘दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स एंड हेल्पर्स यूनियन’च्या नेतृत्वाखाली मिळाला आहे. हे संपूर्ण आंदोलन ७ जुलै रोजी अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या स्वतःस्फुर्त विरोधातून जन्मले होते. ७ जुलै पासून दिल्लीतील सिव्हिल लाइन्स स्थित अरविंद केजरीवाल यांच्या घरासमोर अंगणवाडी कर्मचारी मागील ८-९ महिन्यांचे मानधन न मिळाल्यामुळे सातत्याने निदर्शने करत होते. परंतु कुठल्याही आंदोलनाला योग्य दिशा आणि गती देण्याचे काम केवळ एक क्रांतिकारी युनियनच करू शकते आणि अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या संघर्षाला योग्य नेतृत्व देण्याचे काम ‘दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स एंड हेल्पर्स यूनियन’ने केले. अंगणवाडी कर्मचारी ७ जुलै पासून सातत्याने अरविंद केजरीवाल यांच्या घराबाहेर प्रदर्शन करत होते. परंतु केजरीवाल सरकारने ना ह्या महिलांचे प्रश्न-समस्या जाणून घेण्याची तसदी घेतली, ना त्यांच्या सोबत चर्चा करण्याची तयारी दाखवली. ‘बिगुल मज़दूर दस्ता’ने सुरुवातीपासूनच अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या संघर्षाला समर्थन दिले होते.





स्वतःस्फुर्तपणे उभे राहिलेल्या ह्या आंदोलनात सहभागी असलेल्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांमधूनच अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या स्वतःच्या क्रांतिकारी यूनियनचा जन्म झाला, ज्यात ट्रेड यूनियन लोकशाहीच्या सिद्धांतानुसार निवड करण्यात आलेल्या प्रतिनिधींची एक समिती गठीत करण्यात आली. त्यानंतर ह्या आंदोलनाला क्रांतिकारी चेतनेने पुढे नेण्यात आले. सुरुवातीच्या मागण्यांमध्ये अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्या होत्या - त्यांना नोकरीमध्ये स्थायी करण्यात यावे, त्यांची वेतन श्रेणी निश्चित केली जावी आणि प्रोहत्साहन मानधना ऐवजी निश्चित मानधन देण्यात यावे आणि हे मानधन प्रत्येक महिन्याच्या निश्चित तारखेपर्यंत देण्यात यावे, त्याच बरोबर सर्व कर्मचाऱ्यांना ओळखपत्र देण्यात यावे, हिवाळी व उन्हाळी सुट्ट्या देण्यात याव्यात.

आपल्या ह्याच मागण्यांसाठी अंगणवाडी कर्मचारी अरविंद केजरीवाल यांच्या घराच्या समोर प्रदर्शन करत होते. परंतु सरकारने ह्या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची दखल घेतली नाही. आपल्या मागण्या सरकार पर्यंत पोहोचवण्यासाठी अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी १६ जुलै रोजी सिव्हिल लाइन्स पासून विधान सभेपर्यंत एक चेतावणी रैली काढली आणि पुढच्याच दिवशी म्हणजे १७ जुलैला अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी दिल्ली सचिवालयावर एका विशाल प्रदर्शनाचे आयोजन करून केजरीवाल सरकारला आपल्या मागण्यांचे निवेदन सोपवले. पण त्यानंतर सुद्धा सरकारकडून कोणतीही कारवाई करणे तर दूरच अंगणवाडी कर्मचाऱ्यांना कोणतेही आश्वासन सुद्धा देण्यात आले नाही. पण आपला संघर्ष नेटाने पुढे नेत अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी १८ जुलै पासून साखळी उपोषण सुरु करण्याचा निर्णय घेतला आणि त्याच बरोबर आपल्या ताकतीचा योग्य अंदाज घेत यूनियन आणि अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या सार्वत्रिक सहमतीतून निर्णय घेतला गेला कि जोपर्यंत आपल्या युनियनचा विस्तार केला जात नाही व आपली ताकत वाढवली जात नाही तोपर्यंत नोकरीत स्थायी करण्याची आपली मागणी मान्य करण्यास सरकारला भाग पाडणे अवघड होईल. इथूनच ह्या आंदोलनामध्ये स्थायी करण्याच्या दीर्घकालीन मागणी सोबतच तात्कालिक स्वरूपाच्या मागण्या सुद्धा जोडण्यात आल्या आणि त्यासाठी आंदोलक साखळी उपोषणाला बसले. हे साखळी उपोषण ५ दिवस चालले. त्या दरम्यान पत्रक काढून ते केवळ अंगणवाडी कर्मचाऱ्यांमध्येच वाटले गेले नाही तर दिल्लीतील जनतेमध्ये, दिल्लीतील विश्वविद्यालयांमध्ये शिकवणाऱ्या शिक्षकांमध्ये सुद्धा वाटले गेले आणि त्यांना अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या ह्या संघर्षामध्ये त्यांचे समर्थन आणि संभव होईल तितकी मदत करण्याची अपील केली गेली. पत्रके व पोस्टर्सच्या माध्यमातून अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या संघर्षाला दिल्लीतील सामान्य जनतेपर्यंत नेण्यात आले. प्रत्येक दिवसागणिक उपोषण स्थळी म्हणजेच केजरीवाल यांच्या घरासमोर अंगणवाडी कर्मचाऱ्यांची संख्या वाढत चालली होती. परंतु तरीही केजरीवाल सरकारने उपोषण करणाऱ्या आंदोलकांची नोंद घेतली नाही. आपला संघर्ष अजून नेटाने पुढे नेत आणि निर्णायक मार्ग निवडत २३ जुलै पासून अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी अनिश्चितकालीन उपोषण करण्याची घोषणा केली. सातत्याने केजरीवाल सरकारपर्यंत आपले म्हणणे पोहोचवण्यासाठी अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी दिल्ली सचिवालय, विधान सभेपासून केजरीवाल यांच्या घरी भरणाऱ्या जनता दरबार मध्ये सुद्धा आपले निवेदन सोपवले होते. पण प्रत्येक वेळी सरकारच्या वतीने कुठलीच दखल घेतली गेली नाही. त्यामुळे अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी आपले न्याय्य अधिकार मिळवण्यासाठी केजरीवाल यांच्या घरासमोर अनिश्चितकालीन उपोषण करण्याचा निर्णय घेतला. कुठलाही संघर्ष सोपा नसतो, त्याचीच प्रचीती ह्या आंदोलनामध्ये अंगणवाडी कर्मचाऱ्यांना आली आणि त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. ह्या आंदोलनाला सर्वात पहिला धोका होता तो घरभेदी आणि सीटू, एस-यू-सी-आई सारख्या दलाल युनियन्स कडून, जे हे दीर्घ काळ चाललेले आंदोलन तोडण्यासाठी सातत्याने युनियनच्या विरोधात अत्यंत खालच्या पातळीचा कुप्रचार करत होते. इथे लक्षात घेण्याची गोष्ट ही आहे की अंगणवाडी कर्मचाऱ्यांची सर्वात मोठी युनियन ‘सीटू’शी संबंधित असूनही अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा संघर्ष मजबूत करण्या ऐवजी ‘सीटू’च्या दलालांनी अंगणवाडी कर्मचाऱ्यांना उपोषण सोडण्यास सांगितले. ‘सीटू’चे दलाल सातत्याने कर्मचाऱ्यांना २ सप्टेंबर रोजी होणाऱ्या प्रदर्शनामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करत राहिले. ह्या दलालांनी अंगणवाडी कर्मचाऱ्यांना आपले मोहरे बनवून उपोषण तोडण्याचे भरपूर प्रयत्न केले. परंतु अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी ह्या सर्व दगाबाज लोकांना बाहेरचा रस्ता दाखवला. भरपूर प्रयत्न करूनही ह्या दगाबाज लोकांची डाळ शिजली नाही आणि अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी त्यांना त्यांची जागा दाखवून दिली. त्याच बरोबर उपोषणकर्त्यांना त्रास देणे आणि आंदोलन कमकुवत करण्यासाठी सरकार सुपरवाइजर्स आणि ‘सी-डी-पी-ओ’च्या माध्यमातून सातत्याने दबाव बनवण्याचा प्रयत्न करत होते. सरकारकडून कर्मचाऱ्यांना धमकावण्यात येत होते की जर त्यांनी उपोषणामध्ये सहभाग घेतला तर त्यांना नोकरी वरून काढून टाकण्यात येईल, वेग-वेगळ्या केंद्रांवर पोलिसांकडून धमक्यांसोबतच विविध मार्गाने आंदोलनकर्त्यांवर दबाव टाकण्यात येत होता. आंदोलन स्थळी शौचालयाची सोय न करणे, पाण्याचे टैंकर हटवणे, तब्येत बिघडून सुद्धा मेडिकल मदत मिळू न देणे आणि पोलिसांना पाठवून आंदोलनकर्त्यांचे तंबू हटवण्या सारखे प्रयत्न करूनही दलाल व सरकार अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा संघर्ष तोडू शकले नाहीत. अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी आपल्या समस्या दिल्लीचे उप-राज्यपाल नजीब जंग यांच्या समोर सुद्धा मांडल्या. पण नजीब जंग यांनी अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सरकारच्या महिला व बाल विकास विभागच्या सचिवांना भेटण्याची सूचना केली. पण ७ दिवस चाललेल्या अनिश्चितकालीन उपोषण आणि जनतेचा दबाव ह्यामुळे केजरीवाल सरकारला अंगणवाडी कर्मचाऱ्यांसमोर गुडघे टेकावे लागले. जे सरकार २२ दिवस अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करत होते त्याचे नेतृत्व करणाऱ्या अरविंद केजरीवाल यांनीच अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या एका प्रतिनिधी मंडळाला २९ जुलै रोजी चर्चेसाठी आमंत्रित केले. हे तेच सरकार होते ज्याचे महिला व बाल विकास विभाग मंत्री संदीप कुमार आणि सेक्रेटरी अंगणवाडी कर्मचाऱ्यांना भेटण्याची वेळ देण्यास सुद्धा तयार नव्हते. परंतु जनतेची एकजूट आणि अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा झुंझार संघर्षामुळे संदीप कुमार तर अंगणवाडी कर्मचाऱ्यांना भेटायला आलेच, पण खुद्द अरविंद केजरीवाल यांनी अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या सर्व तात्कालिक मागण्या कुठल्याही अटीशिवाय मान्य करत त्यांच्या निवेदनावर सही केली. आणि त्याच बरोबर प्रतिनिधी मंडळाला हमी दिली की ते लवकरच सर्व मागण्यांची अंमलबजावणी सुद्धा करतील. आपल्या शानदार विजयाचा आनंद व्यक्त करत अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी सिव्हिल लाइन्स पासून विधान सभेपर्यंत शानदार विजय मोर्चा काढला ज्यात ३००० हजारांहून अधिक अंगणवाडी कर्मचारी सहभागी झाले होते. विजय मोर्चा मध्ये अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी आपली ‘एकता जिंदाबाद’ आणि ‘दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स एंड हेल्पर्स यूनियन जिंदाबाद’चे नारे दिले. विजय मोर्चानंतर अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी पुन्हा एकदा आपली सभा ‘सिव्हिल लाइन्स’वर सुरु केली. सभेत तात्कालिक मागण्या मान्य होण्याच्या विजयाचे महत्व आणि पुढील संघर्षाबद्दल चर्चा करण्यात आली. महिला व बाल विकास विभागाचे मंत्री संदीप कुमार आणि डेप्युटी डायरेक्टर सौम्या यांनी सभेत येउन अंगणवाडी कर्मचाऱ्यांशी संवाद साधला आणि त्यानंतर ड्राफ्ट केलेल्या आदेशाची एक कॉपी ‘दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स एंड हेल्पर्स युनियन’च्या प्रतिनिधींना सुपूर्त केली. ‘दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स एंड हेल्पर्स यूनियन’च्या सदस्या शिवानी यांनी सांगितले की सध्या सरकारने केवळ आमच्या तात्कालिक मागण्या मान्य केल्या आहेत, ज्यात मागील ८-९ महिन्यांचे थकलेले मानधन तत्काळ करणे, ओळखपत्र देणे, मानधन प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत देणे, सबला स्कीमचे भत्ते देणे आणि प्रत्येक कर्मचाऱ्याचा विमा काढणे ह्यासारख्या मागण्या मान्य केल्या आहेत. आणि त्याच बरोबर वेतनवाढ करण्याविषयीसुद्धा केजरीवाल बोलले आहेत. शिवानी यांनी सांगितले की आपल्या दीर्घकालिक मागण्या - सरकारी कर्मचाऱ्याचा दर्जा मिळवणे, किमान वेतन, ई-एस-आई व पी-एफ इत्यादीसाठी अंगणवाडी कर्मचारी आपला संघर्ष चालूच ठेवतील. पण जसे सर्व सरकारे करतात त्याच प्रमाणे ३ दिवस उलटूनही केजरीवाल सरकारने सर्व कर्मचाऱ्यांचे थकित मानधन दिलेले नाही. त्यामुळे ९ ऑगस्ट रोजी ‘जंतरमंतर’वर ‘दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स एंड हेल्पर्स यूनियन’ने सर्व कर्मचाऱ्यांची एक सभा घेऊन पुन्हा एकदा सरकारवर दबाव बनवण्यासंदर्भात रणनीतीवर चर्चा केली. अंगणवाडी कर्मचारी १६ ऑगस्ट रोजी पुन्हा एकदा ‘जंतरमंतर’वर एकत्र येऊन केजरीवाल सरकारला त्यांच्या द्वारे मान्य केल्या गेलेल्या सर्व तात्कालिक मागण्यांची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्याची मागणी करत आहेत. त्याच बरोबर युनियनची सदस्य संख्या वाढवण्याच्या दिशेने प्रयत्न करण्यात येत आहेत. केवळ २ आठवड्यांत २५०० लोकांनी युनियनची सदस्यता घेतली आहे. ‘दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स एंड हेल्पर्स यूनियन’ अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्षरत आहे. संघर्षात मिळालेल्या विजयामुळे अंगणवाडी कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे आणि सर्व कर्मचारी आपल्या दीर्घकालिक मागण्यांसाठी संघर्ष करण्यासाठी कटिबद्ध आहेत.

**सिमरन**

●


# अजून काही भ्रम बाकी आहे?

पान १ वरून

बिर्ला अंबानीसारख्या धनपशूंच्या हवाली केली जात आहे. कांदे १७ – १८ रुपये प्रतिकिलोच्या दराने विदेशात विकून मग पुन्हा ४५ रुपये किलोग्रमच्या दराने विकत घेतले जात आहेत, जेणेकरून विदेशी भांडवलदारांचे खिसे भरले जाऊ शकतील. त्याचबरोबर, भांडवलदारांवर उधळण्यासाठी सरकारी संपत्तीची बचत करण्याकरिता वेगवेगळ्या कल्याणकारी योजना एक तर रद्द केल्या जात आहेत, किंवा त्यांना प्रभावहीन बनवले जात आहे.

एकीकडे भांडवलदारांना लूट करण्याची खुली सूट देताना दुसरीकडे भाजपचे मंत्री, आमदार आणि खासदार आपले कमिशन विलक्षण उघडपणे आणि बिनधास्त वसूल करीत आहेत. काँग्रेस आघाडी सरकारच्या काळात घोटाळ्यांच्या विरोधात जोरदार गदारोळ माजवणाऱ्या हाफपँटवाल्यांनी सत्तेत येताच घोटाळ्यांची अशी काही मालिका सुरू केली आहे की भारतातील भांडवली लोकशाहीच्या इतिहासातील तो एक मापदंड ठरावा! प्राचीन हिंदू संस्कृती, शुचिता, शुद्धता, सदाचार आणि नैतिकतेचे ढोल बडवणाऱ्या हिंदुत्ववादी फासिस्टांनी आपल्या सात पिढ्यांची सोय करून ठेवण्यासाठी मंत्रीपदी येताच जोरदार घोटाळे केले आहेत. भारताच्या इतिहासातील सर्वांत मोठ्या व्यापमं घोटाळ्यापासून तावडेंचा घोटाळा, पंकजा मुंडेंचा घोटाळा, रमण सिंह घोटाळा, ललित मोदी घोटाळा, वसुंधरा राजेंपासून अगदी सुषमा स्वराज यांचे उघड उघड आणि रंगे हात पकडले जाणे, शिवराज सिंह चौहान सरकारचे एकापाठोपाठ एक कित्येक घोटाळे, मोदी सरकारचा कांदा घोटाळा... यादी इतकी लांबलचक आहे की या अंकाचे संपादकीय आम्ही घोटाळ्यांच्या यादीच्या रूपातही छापू शकलो असतो! या घोटाळ्यांच्या पावसात हिंदुत्ववादी ध्वजधारकांचे तलम कपडे असे चिंब भिजले आहेत की सारे काही दिसू लागले आहे. या घोटाळ्यांबरोबरच, भाजपचे नेते-मंत्री बलात्कारी, अपराधी, चारसोबीस बाबा आणि मातांचा उघड बचाव करण्यात गुंतलेले आहेत. कित्येक भाजपवाले तर आसाराम आणि राधे माँसारख्या धर्माच्या घृणित ठेकेदारांचे भक्त आहेत आणि त्यांना वाचवण्यासाठी जीव तोडून प्रयत्न करीत आहेत. आसाराम प्रकरणातील जेवढे म्हणून साक्षीदार होते त्यांच्या एकानंतर एक खुलेआम हत्या करणे, त्यांना धमकावणे आणि विकत घेणे सुरू आहे. आसाराम प्रकरणातच नव्हे तर व्यापमं प्रकरणात आतापर्यंत ५२ साक्षीदारांचे संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झालेले आहेत. सांप्रदायिक फासिस्ट कोणत्याही प्रकारची लाजलज्जा सोडून घोटाळे आणि हत्या करीत आहेत. आणि आपला बचाव करण्यासाठी हे सांगतात काय? या बाबतीत तर यांनी खरोखर निर्लज्जपणाचे सारे विक्रम मोडीत काढले आहेत. शिवराज सिंह चौहान सरकारचे एक मंत्री बाबूलाल गौड व्यापम घोटाळ्यात होणाऱ्या संदिग्ध मृत्यूंबद्दल (हत्यांबद्दल?) बोलताना म्हणतात, जो येतो, त्याला जावेच लागते. हा तर निसर्गाचा नियम आहे! हे तेच मंत्रीसाहेब आहेत ज्यांनी काही महिन्यांपूर्वी धोतर कसे उतरवायचे ते एका रशियन महिलेला शिकवण्याचा प्रस्ताव ठेवला होता! असे आहेत हे नैतिकतेचे रक्षक! सुषमा स्वराज यांनी कुख्यात कॉर्पोरेट दलाल आणि फरारी आरोपी ललित मोदी यांना ब्रिटनचा विजा मिळवून देण्यासाठी केलेल्या मदतीचे समर्थन करताना सांगितले की त्यांनी ललित मोदी यांच्या कॅन्सरग्रस्त बायकोच्या उपचारांसाठी मानवीय सहकार्याच्या रूपात ही मदत केली होती. आणि ब्रिटनला पळून गेल्यानंतर काहीच दिवसांत ललित मोदी दारूच्या नशेत धुंद आणि अर्धनग्न स्त्रियांसोबत काढलेले आपले फोटो इंटरनेटवर टाकतात. अर्ध्याहून जास्त जनता जिथे सरकारी दारिद्र्य रेषेच्या खाली जगते अशा भारतासारख्या देशामध्ये सरकारचे नेते आणि मंत्री मानवीय मदत एका अब्जाधीशाला देतात! यावरून बरेच काही स्पष्ट होते.

भ्रष्टाचाराच्या चिखलात लडबडलेले मोदी सरकार घोटाळ्यांबरोबरच जो सर्वांत मोठा हल्ला करीत आहे तो म्हणजे कामगारांवर. या बाबतीत आम्ही कामगार बिगुलमध्ये पूर्वीसुद्धा लिहिले आहे. मोदी सरकार श्रम कायद्यांमध्ये अशा काही दुरुस्त्या करण्याच्या तयारीत आहे की ज्यामुळे ठेका प्रथेला पूर्णपणे कायदेशील रूप प्राप्त होईल. अप्रेंटिस आणि ट्रेनी कामगारांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात बेरोजगार कामगारांना १२-१२ तास किमान मजुरीशिवाय, ईएसआई, पीएफ आणि ट्रेड युनियन बनवण्याच्या आणि संघटित होण्याच्या अधिकारांपासून वंचित होऊन गुलामांसारखे राबावे लागेल. ट्रेड युनियन कायद्यामध्ये असे बदल केले जात आहेत की कामगारांसाठी युनियन बनवणेच अशक्य होऊन जाईल. बाल श्रम कायद्यांमध्ये असे बदल केले जात आहेत की ठेकेदार आणि मालक बाल श्रमिकांना आपले नातेवाईक ठरवून त्यांच्या श्रमाचे अमानुष शोषण सुरू ठेवू शकतील. फॅक्टरी ॲक्ट आणि औद्योगिक विवाद कायद्यामध्ये असे बदल केले जात आहेत की अगोदरच जवळपास निष्क्रिय आणि निष्प्रभावी असलेला श्रम विभाग आता पूर्णपणे निष्क्रिय आणि निष्प्रभावी होऊन जाईल! कारखाना मालक आणि ठेकेदारांना उघड उघड श्रमकायद्यांचे आणि पर्यावरण संबंधी कायद्यांचे उल्लंघन करता यावे यासाठी फॅक्टरी इन्स्पेक्टरचे पद बरखास्त करण्यात येत आहे. एकंदर, श्रमकायद्यांमुळे कामगार वर्गाला जे थोडेफार संरक्षण मिळत होते, तेसुद्धा आता संपवले जात आहे. आज एखाद्या ठिकाणी जर कामगारांनी संघटित होऊन लढा उभारला व लोकबळाच्या आधारे सरकारवर श्रमकायद्यांच्या अंमलबजावणीसाठी दबाव निर्माण केला तर मालक आणि ठेकेदारांना ही बाब झोंबते. याच मालक आणि ठेकेदारांनी निवडणूक प्रचारासाठी मोदींना दहा हजार कोटी रुपये दिले होते! त्यामुळे मोदी सरकार या मालकांच्या आणि ठेकेदारांच्या नफेखोरीच्या आणि त्यांनी चालवलेल्या कामगारांच्या अमानुष शोषणाच्या मार्गातील शिल्लक राहिलेले लहान सहान अडथळे दूर करणार, हे स्वाभाविकच आहे. ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी! काँग्रेस आणि आघाडीच्या सरकारनेदेखील टाटा बिर्ला अंबानी यांसारख्या भांडवलदारांचीच सेवा केली होती, आणि यापुढेदेखील जर त्यांचे सरकार आले तर पुन्हा ते त्यांचीच सेवा करतील. मात्र आज आर्थिक मंदीने भांडवलदारांच्या नफ्याचा दर भयंकर पातळीपर्यंत खाली आणलेला असताना आपल्याच सट्टेबाजी आणि नफेखोरीतून निर्माण झालेल्या या मंदीचे ओझे भांडवलदार वर्ग देशातील कामगारांवर लादू पाहत आहे. त्यांना भाजपासारख्या सांप्रदायिक फासिस्ट पक्षाला सत्ता सोपविण्याची गरज होती ती यासाठीच. मे २०१४ च्या निवडणुकांमध्ये भाजपाच्या निवडणूक प्रचारावर अभूतपूर्व पद्धतीने हजारो कोटी रुपये खर्च करून भांडवलदार वर्गाने हेच केले. कामगारांचा प्रत्येक प्रतिरोध निर्दयपणे चिरडून टाकणारा, जनतेला धर्म आणि जातीच्या नावावर फोडणारा आणि भांडवलदारांचा नफा सुगम बनवण्यासाठी यथायोग्य धोरण बनवणारा पक्ष सत्तेत यावा अशीच भांडवलदार वर्गाची इच्छा असते. म्हणूनच भांडवलदार वर्गान भारतातील सांप्रदायकि फासिस्ट पक्षाच्या हाती सत्ता सोपवली. भांडवली निवडणूक म्हणजे फक्त एक नाटक असतं. ज्याच्यापाशी जेवढे धनबल आणि बाहुबल आहे, तोच या नाटकात जिंकू शकतो. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास, ज्याला भांडवलदार वर्गाचा पाठिंबा असतो, तोच अशा निवडणुका जिंकू शकतो.




निवडणुकांच्या अगोदर नरेंद्र मोदींनी देशाच्या जनतेसमोर ज्या प्रकारे चांगल्या दिवसांची घोषणा केली होती तो सारा प्रकार आता इतका विनोदी ठरला आहे की खुद्द मोदी सरकारचे मंत्रीदेखील त्याचा उल्लेख करेनासे झाले आहेत किंवा आपण चांगल्या दिवसांचे आश्वासन कधी काळी दिले होते हेच नाकारण्याचा प्रयत्न करीत आहेत. एके काळी खंडणी आणि वसुलीची गँग चालवणारे (सीबीआईच्या रिपोर्टनुसार) भाजपचे अध्यक्ष अमित शहा यांनी सांगितले आहे की चांगले दिवस येण्यासाठी तर २५ वर्षे लागतील! निवडणुकांच्या अगोदर भाजपा सांगत होती की काँग्रेसला ६० वर्ष दिलीत तर आम्हांला फक्त ६० महिने द्या आणि ते जनतेसाठी चांगले दिवस घेऊन येतील! आता भाजपा अध्यक्ष सांगत आहेत की भाजपाला आणखी पाच वेळा जिंकून द्या म्हणजे चांगले दिवस येतील. आता तर या सगळ्याच गोष्टी जुन्या झाल्या आहेत. कारण नुकतेच भाजपच्या एका मंत्र्याने तर असेही सांगितले की मोदींनी चांगल्या दिवसांचे आश्वासान वगैरे कधी दिलेच नव्हते, हे तर लोकांनीच त्यांच्या तोंडी टाकलेले आहे. म्हणजेच आता देशातील सामान्य लोकांना चांगल्या दिवसांचे आश्वासन विसरून गेले पाहिजे. निवडणुकीच्या अगोदर भाजपने जनतेला आश्वासन दिले होते की ते विदेशातून काळा पैसा घेऊन येतील आणि प्रत्येक भारतीय नागरिकाच्या खात्यात १५ लाख रुपये जमा केले जातील! याबद्दल भाजपच्या अध्यक्षांनी सांगितले की ते तर निवडणुकीतील अलंकारिक बोलणे होते! म्हणजे निर्लज्जपणाची हद्द झाली. आता भाजप सरकार उघड उघड सांगत आहे की त्याची आश्वासने म्हणजे निवडणुकीतील अलंकारिक बोलणे होते जे लोकांना मूर्ख बनवण्यासाठी सुरू होते. खरे काम तर देशातील मालकांची, ठेकेदारांची, नेते-नोकरशहांच्या परजीवी वर्गाची सेवा करणे हे होते.

मोदी यांच्या भाजप सरकारचा घाणेरडा भ्रष्टाचारी, फासीवादी आणि कुजका चेहरा लोकांसमोर उघडा पडू लागल्यापासून देशभरात जनतेमध्ये आक्रोश पसरू लागला आहे. ठिकठिकाणी कामगार आंदोलनांसाठी रस्त्यावर उतरू लागले आहेत. सामान्य कष्टकरी जनता बेरोजगारी आणि महागाईने त्रस्त होऊन रस्त्यावर उतरते आहे. अशा वेळी देशातील संसदीय डावे आणि वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या कामगार युनियन काय करी आहेत? मोदी सरकारच्या श्रमविरोधी धोरणांना नावापुरता विरोध करण्याच्या पुंसत्वहीन कारवाया. राजकीय पक्षांच्या दहा केंद्रिय कामगार युनियननी २ सप्टेंबर रोजी एका दिवसाचा संप पुकारला. यात मुख्यत्त्वे संघटित क्षेत्रातील कामगारांनी भाग घेतला होता. भारतातील ५९ कोटी कामगार जनतेत या संघटित क्षेत्रातील कामगारांची संख्या निव्वळ ६ ते ७ कोटी इतकीच आहे. परंतु कित्येक ठिकाणी त्यांच्यातील असंतोषामुळे असंघटित क्षेत्रातील कामगारसुद्धा उत्फूर्तपणे या संपात सहभागी झाले. परंतु जर या कामगार युनियनना श्रमकायद्यांमध्ये होणारे बदल खरचे थोपवायचे असतील तर मग फक्त एका दिवसाचा संप कशासाठी, हा खरा प्रश्न आहे. श्रमकायद्यांमधील प्रस्तावित बदल मागे घेतले जाईपर्यंत ते अनिश्चितकालीन संप का पुकारत नाहीत? कारण त्यांना असे करायचे नाही. आता काही दिवसांपूर्वीच कोळसा अध्यादेश मागे घेण्याकरिता कामगार युनियनी असाच एका दिवसाचा तमाशा केला होता. आणि नंतर कोळसा अध्यादेश पारित झाल्यानंतर मात्र ते या मुद्द्याचे नावसुद्धा काढायला तयार नाहीत. त्याचप्रकारे कामगारांमधील संताप थोडा शांत करण्यासाठी या कामगार युनियननी श्रमकायद्यांमधील दुरुस्तीला नकली विरोध करण्यासाठी एका दिवसाचा साधारण संप पुकारला. आता तर सरकारसुद्धा अशा एका दिवसाच्या संपाला एक प्रकारे अघोषित सुट्टी मानू लागले आहे. दर वर्षी फेब्रुवारी महिन्यात हे कामगार वर्गाचे गद्दार अशाच प्रकारे एक दिवसीय संपाचे आयोजन करतात. कामगारांच्या काळजात धगधगत असलेला संताप काहीसा शांत करणे हाच या संपाचा हेतू असतो. या संपांना एक प्रकारे सेफ्टी वॉल्व संप म्हटले जाऊ शकते. प्रेशर कुकरच्या सेफ्टी वॉलचे जे काम असते तेच काम हे संपसुद्धा करतात. विस्फोट होऊ नये याकरिता दबाव क्रमशः बाहेर काढणे. कामगार वर्गाच्या आघाडीच्या फळीने या केंद्रिय कामगार युनियन्सपासून वेगळी आपली स्वतंत्र क्रांतिकारी ट्रेड युनियन आज बनवली पाहिजे. तेव्हाच कामगार वर्ग भांडवलदारांची सेवा करणाऱ्या सरकारच्या कामगारविरोधी धोरणांचा प्रभावी प्रतिरोध करू शकेल. ताकीद देण्यासाठी जोपर्यंत एका दिवसाच्या संपाचा वापर होत असतो, तोपर्यंतच असे संप प्रासंगिक ठरतात. परंतु दर वर्षी प्रत्येक कामगार विरोधी सरकारी धोरणाच्या विरोधात एक दिवसीय संप करून गेल्या तीस वर्षांमध्ये देशातील कामगार वर्गाला काय मिळाले आहे? यातून तर केंद्रिय ट्रेड युनियननी भांडवलदार वर्गाचीच सेवा केली आहे आणि कामगारांची दिशाभूल केली आहे. अशा वेळी, देशातील ५० कोटी असंघटित कामगारांना स्वतंत्र आणि क्रांतिकारी ट्रेड युनियनखाली संघटित करणे ही कामगार आंदोलनाची सर्वांत मोठी गरज आहे. कामगार वर्गाच्या तमाम उन्नत तत्त्वांचे आणि आघाडीच्या फळीचे आज हेच कर्तव्य आहे.

●

# पैशाच्या परगण्यात अध्यात्माचा धिंगाणा!

मुख्य प्रवाहातील मिडियाने, म्हणजेच लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभाने आणखी एका गॉडमॅनचे (खरे तर एका गॉडवुमनचे) सत्यस्वरूप देशातील जनतेसमोर उघडे केले आहे. यामागे या प्रसारमाध्यमांचा काही चांगुलपणा वगैरे आहे असे समजण्याचे कारण नाही, कारण आपल्या महान देशातील मिडिया याहून जास्त जोरकसपणे दुध पिणारी एखादी गणेशमूर्तीसुद्धा दाखवू शकतो. बातमीतील चटपटीतपणामुळे ही बातमी आणखी काही काळ चालली असती. पण तेवढ्यात आरक्षणाच्या मुद्द्यावर पटेलांचा तारणहार बनून हार्दिक पटेल साहेबांचे पदार्पण झाले. हा तारणहार आपल्या भूमिकेत रंग भरतो न भरतो तोच शीना- इंद्राणी मिडियामध्ये झळकू लागली. न्यूज चॅनेलचे पत्रकार शिकारी कुत्र्यांसारखे वास काढत जंगलांमध्ये पसरताना दिसू लागले आणि वर्तमानपत्रेसुद्धा हे इंद्राणीजाल भेदण्याची खात्री देऊ लागली. अधूनमधून मोदी आणि त्यांचे परदेश दौरे, नेत्यांची एकमेकांवरची चिखलफेक आणि पाकिस्तानला शिव्याशाप यासारखे मिडियाचे नेहमीचे ताजे तडतडीत मुद्दे होतेच. असो. इतर गोष्टी बाजूला सारून सध्या राधे माँ प्रकरणापासूनच सुरु करू या.

आपल्या प्रिय भारत देशाला कृषिप्रधान म्हणण्याबरोबरच बाबाप्रधान देश म्हटले तर काही अतिशयोक्ती होणार नाही. असे म्हणण्याचे कारण अगदी उघड आहे. इथे आपल्याला डाल डाल पर चिडिया का बसेरा तर कुठे दिसणार नाही पण इथे तिथे सगळीगडे बुवा (आणि बायासुद्धा) निश्चितच दृष्टीस पडतील. यांच्या कपड्यांवरून आपण या सगळ्यांना एका तागडीत तोलण्याचा प्रयत्न कराल तर हमखास घोटाळा होईल. यांचे वेगवेगळे प्रकार आहे आणि हे वेगवेगळे प्रकार एकदुसऱ्यापासून पूर्णपणे भिन्नसुद्धा आहेत. सर्वांचे आपापल्या भक्तांचे वेगळे स्वतंत्र साम्राज्य आहे आणि हे साम्राज्या टिकवून ठेवण्याचे वेगवेगळे डावपेचही आहेत. आपल्याला बाबांच्या या घनदाट जंगलात कुठे बलात्कारी आसाराम बापू किंवा नारायण साई दिसतील, जे स्वतः तुरुंगात आहेत परंतु मुले त्यांच्या जीवनाचा सरकारी पाठ्यपुस्तकांमधून अभ्यास करीत असतात, आणि त्याचवेळी ते तुरुंगातून आपल्या विरोधातील साक्षीदारांवर हल्ले घडवून आणत असतात आणि त्यांच्या हत्या करतात. कुठे आपल्याला रामदास दासांचे दर्शन होईल ज्यांनी भामटेगिरीला एक नवी उंची मिळवून दिलेली आहे आणि ज्यांनी हरयाणा सरकारच्या विरोधात जणू युद्ध छेडले होते. यांचे महत्ता आजसुद्धा अबाधित आहे, आणि यांच्या खटल्याच्या दिवशी रोहतकच्या रस्त्यांवर यांच्या भक्तांच करुण क्रंदन आपल्याला पाहायला मिळेल. कुठे आपल्याला आशुतोष महाराज दिसतील ज्यांचे शिष्य काही दिवसांपूर्वी आपल्या गुरुचा मृतदेह या अपेक्षेने कवटाळून बसले होते की ते आपल्या समाधीतून बाहेर येतील, परंतु खेदाची बाब म्हणजे गुरुजी समाधीतून थेट मोक्षाला गेले आणि भक्तांच्या वाट्याला फक्त निराशाच आली. आपल्याला या पवित्र भूमीत श्रीश्री रविशंकर यांच्यासारखे उच्चवर्गीय बाबासुद्धा दिसतील ज्यांनी खाऊन पिऊन सुखी लोकांना जगण्याची कला शिकवतानाच एक जोड कार्यक्रम म्हणून देशातील भोळ्याभाबड्या गरीब जनतेला पैसा कमावण्याची कला शिकवण्याचाही पुरेपूर प्रयत्न करीत असतात. आपल्याला गुरमीत राम रहीम यांचेही दर्शन होईल, ज्यांच्यावर बलात्कार, साक्षीदारांच्या हत्या, ३०० चेल्यांना नपुंसक बनवण्याचे आरोप आहेत, मात्र हे महाशय अजूनही मॅसेंजर ऑफ गॉड बनलेले आहे. नेहमी नाक पकडून पोट आतबाहेर करताना दिसणाऱ्या बाबा रामदेव यांच्याबद्दल तर काय बालावे! पातंजली ऋषींनी कधी स्वप्नातसुद्धा विचार केला नसणार की त्यांचा एखादा शिष्य कधी योगविद्येचे रूपांतर कामधेनूत करून असे अमाप दुध काढू लागेल. विदेशातील काळ्या पैशावर आकाशपाताळ एक करणाऱ्या बाबा रामदेवांनी मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर जणू मौनव्रतच धारण केले आहे.

कुठे निर्मल बाबा तर कुठे कृपालू महाराज, कुठे मुरारी बापू तर कुठे भीमानंद, कुठे सारथी बाबा तर कुठे प्रेमानंद, कुठे बिंदू बाबा तर कुठे नित्यानंद. ज्यांनी आपले विशाल साम्राज्य स्थापन केले आहे, आणि जे ऐश्वर्यात मनसोक्त लोळत आहेत, असे आपल्याला इतके बाबा सापडतील की त्यांच्या नावांनी कित्येक पाने वाया घालवली जाऊ शकतात. जर काही कमतरता होती तर ती राधे माँची. स्वतःला दुर्गेचा अवतार म्हणवणाऱ्या या महाशया हिंदी फिल्मी गाण्यांवर पाश्चात्य कपडे परिधान करून अश्लील नृत्य करत आपल्या खऱ्या रुपातसुद्धा भक्तांना दर्शन देतच असतात. वेगवेगळे आरोप आणि लहानसहान खटल्यांनंतर सध्या यांचे ग्रह काहीसे फिरले आहेत. परंतु यांच्या भक्तांच्या मनातील श्रद्धा मात्र अढळ आहे. जशी प्रत्येक प्रदेशाचे आपले एक वैशिष्ट्य असते तसेच भारत खंडाचेही आपले एक वैशिष्ट्य आहे. येथे श्रद्धावानम् लभते ज्ञानम् आणि गुरु बिन ज्ञान नहीसारख्या ओळींना भरपूर आदर दिला जातो. एकीकडे तर श्रीमंत आणि गरीबांसाठी वेगवेगळे बाबा असतात तर दुसरीकडे यांची कमतरता भरून काढण्यासाठी आलीशान मंदिर, डेरे, आश्रम आणि कुंभ मेळ्यांचे आयोजन आणि शाही स्नान आहे. एवढे सारे पुण्यात्मा आणि ईश्वराचे एजंट असूनदेखील आपल्याकडे इतकी गरीबी, बेरोजगारी, अज्ञान, कुपोषण आणि दुर्दशा कां म्हणून आहे, हा खरा प्रश्न आहे. जगभरात ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात विलक्षण प्रगीत झालेली असूनदेखील आपल्याकडे लोक पवित्र स्नान, रुढीवादी मूल्ये, अंधश्रद्धा यांतून बाहेर कां पडू शकलेले नाहीत? सुशिक्षित समुदायसुद्धा अतार्किकता आणि कूपमंडुकतेत गटांगळ्या कां खातो आहे?

भांडवली व्यवस्थेने, पैशाच्या ताकदीने आज धर्माचे पूर्णपणे भांडवलीकरण केले आहे. धर्मात पैशाचा मुक्त संचार होतो आहे. आपल्या अडचणींची, समस्यांची खरी कारणे जनतेला कळू नयेत, गरीबी-उपासमार- बेरोजगारी यांच्यासाठी जनतेने व्यवस्थेला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करू नये यासाठी त्यांच्यावर दैववादाचे जोखड लादले जाते. तमाम पाखंडी धार्मिक बाबा, पंडे-पुजारी, मुल्ले मौलवी जनतेच्या जाणीवा धूसर करण्याचेच काम करतात. भांडवली व्यवस्था जनतेवर आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी धर्माचा सहाय्यक म्हणून वापर करते. वेगवेगळ्या प्रकारचे बुवा स्वतः चैनीत जगतात आणि जनतेला त्याग, आत्मोन्नती आणि पारलौकिक जीवनाचे धडे देतात. वर्गजाणीवेच्या अभावामुळे व्यापक कष्टकरी जनता सध्याच्या व्यवस्थेतील गुंतागुंत समजू शकत नाही. समस्यांच्या खऱ्या कारणांचा शोध घेऊन त्यांची सोडवणूक करण्याऐवजी आपल्या भौतिक गरजांच्या पूर्ततेसाठी धार्मिक कर्मकांडांच्या जाळ्यात अडकण्याचा, दैवासमोर नतमस्तक होण्याचा आधार ही व्यवस्थाच पुरवते. असुरक्षितता आणि भीती एका काल्पनिक शक्तीमध्ये श्रद्धा निर्माण होण्यास कारणीभूत ठरते आणि जेव्हा असुरक्षितता आणि भीतीच्या खऱ्या कारणांचा शोध घेऊन त्यांना दूर केले जाईल तेव्हा आपोआप एका काल्पनिक शक्तीमध्ये यांचा तोडगा शोधण्याची आवश्यकतासुद्धा आपोआप संपून जाईल आणि काल्पनिक शक्तीचे अस्तित्त्वसुद्धा संपुष्टात येईल.

पुनर्जागरण-प्रबोधनापासून वंचित राहिलेल्या भारतासारख्या देशामध्ये ज्ञान-विज्ञान-तर्काधारित मूल्ये सामान्य जनतेपासून तर दूर आहेतच, परंतु येथील सुशिक्षित समजला जाणारा समुदायसुद्धा या जीवनमूल्यांपासून बराच दूर आहे. युरोप, अमेरिका, रशिया, चीन अशा कोणत्याही देशाचे उदाहरण घेतल्यास समाजात बदल घडवून आणण्याच्या पहिल्या प्रयत्नांमध्ये मध्यवर्गाची एक सकारात्मक भूमिका होती.

परंतु आपल्याकडचा मध्यवर्ग इतका विसविशीत, कणा नसलेला आणि निस्तेज-भ्याड आहे की या गुणांच्या बाबतीत तो जगासमोर एक उदाहरण ठरावे. भाषेपासून संस्कृतीच्या क्षेत्रामध्ये आजसुद्धा वासाहतिक भूतकाळ आणि गुलामीच्या खुणा सहज पाहायला मिळतात. कला, संस्कृती, साहित्य आणि मिडियासारख्या विविध क्षेत्रांमध्ये पैशासाठी विकले जाणारे भाट बसलेले आहेत. यांना लोकशाही, तार्किकता, आलोचनात्मक विवेक यांसारख्या गोष्टी जणू परग्रहांवरून आल्यासारख्या वाटतात. जनतेच्या गरजा, त्यांच्या अडीअडचणी यांना वाचा फोडायचे दूरच राहिले, उलट त्यांच्याकडे कानाडोळा करण्याची प्रवृत्तीच जास्त पाहायला मिळते. इतकेच नाही तर जनतेच्या बाजूने बोलणाऱ्या बुद्धिजीवींच्या कट्टरतावाद्यांकडून हत्या केल्या जातात तेव्हासुद्धा वेगवेगळ्या न्यूज चॅनेलवर राशीफल सांगितले जात असते, भूतप्रेतांचे किस्से-कहाण्या सुरू असतात किंवा टीआरपीसाठी एखाद्या नव्या चटपटीत विषयाचा शोध सुरू असतो. अलीकडेच नरेंद्र दाभोळकर, गोविंद पानसरे, एम.एम. कलबुर्गी यांच्या निर्घृण हत्या झाल्या, तरी जनतेतील एका मोठ्या संख्येला याचा काहीच थांगपत्ता लागलेला नाही, असे दिसून येते. ठराविक वर्तुळामध्ये विरोध व्यक्त होऊन बातमी गायब झाली. सिनेमा, क्रिकेटर, नेता यांच्या फडतूस बातम्या मात्र राष्ट्रीय बातम्या ठरतता.

भारतीय समाज आपल्या वासाहतिक भूतकाळामुळे फक्त सरंजामी-अतार्किक मूल्यांना चिकटून राहिला असे नाही तर लोकशाही क्रांतीच्या अभावामुळे ज्ञान, तर्क, विवेकावर आधारित विचारांपासूनही जवळजवळ वंचित राहिला. म्हणूनच इथे बाबा-बुवांच्या रुपात धर्माचे वेगवेगळे दुकानदार सहजासहजी आपले दुकान थाटू शकतात. भांडवली व्यवस्था आणि तिच्यातील स्पर्धा माल-अंधभक्ती आणि दुसऱ्यांना चिरडून पुढे जाण्याची प्रवृत्ती निर्माण करते. जनता आपले अज्ञान आणि वर्गजाणीवेच्या अभावामुळे अलौकिक शक्तींवर विश्वास ठेवते, तर पैसेवाले लोक माल अंधभक्ती आणि उत्पादन व्यवस्थेमधील अस्थिरता-अनिश्चिततेमुळे.

आजचा काळ एकीकडे अंधकाराचा-निराशेचा काळ आहे, तर दुसरीकडे तो आव्हानांनी भरलेला काळ आहे. प्रत्येक समाज बदलतो आणि बदल सोडून दुसरे काहीच शाश्वत नाही. परंतु समाज आपोआप बदलत नाही हेदेखील तेवढेच खरे आहे. कुठल्याही समाजाला बदलतो माणूस. नफाकेंद्रित भांडवली व्यवस्थेच्या जागी एक मानवकेंद्रित व्यवस्था स्थापन केली जाईल, तेव्हाच हे बुवा आणि त्यांना जन्म देणारी आधारभूमी नष्ट करता येऊ शकेल. लोकांच्या भौतिक गरजा पूर्ण होतील तेव्हा अलौकिक शक्तींचा भौतिक आधारसुद्धा हळूहळू नाहीस होत जाईल. परंतु व्यवस्था बदलेपर्यंत हाताची घडी घालून वाट बघून चालणार नाही. सचोटी आणि धैर्यासह ज्ञान-विवेक-तर्क आणि लोकशाही मूल्यांचा सतत अथकपणे प्रचार प्रसार करावा लागेल. आपली शक्ती प्रभावीपणे वापरून आपल्या हक्कांसाठी मुठी आवळाव्या लागतील. अंधकाराच्या शक्तींशी अनवरत झुंज घ्यावी लागेल. आणि सत्य वारंवार जनतेसमोर घेऊन जावे लागेल.

**अरविंद**

●

# तर्कवादी विचारवंत कलबुर्गी यांची हत्या

**पान ३ वरून**

इतर भाषांमध्येसुद्धा त्यांचा अनुवाद करून घेतला. कलबुर्गी यांनी एकूण १०३ पुस्तके लिहिली आणि ४०० हून अधिक प्रबंध सादर केले. कलबुर्गी त्यांच्या मार्ग पुस्तक मालिकेसाठी विशेष ओळखले जातात, व मार्ग ४ साठी त्यांना साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १२ व्या शतकातील तर्कवादी संत बसवेश्वर यांनी कलबुर्गी यांच्या संशोधनावर आपला प्रभाव पाडलाच, त्याचबरोबर त्यांनी लिहिलेल्या कित्येक नाटकांच्या केंद्रस्थानीसुद्धा बसवेश्वरच होते. या नाटकांच्या माध्यमातून कलबुर्गी यांनी मूर्तिपूजा, जातियवाद, काल्पनिक ईश्वराची अवधारणा, जुन्या सडलेल्या परंपरा, धर्म आणि त्याचे पाखंडी एजंट यांच्यावर कठोर प्रहार केले व महिलांवरील, दलितांवरील अत्याचार व सांप्रदायिकतेच्या विरोधात एक दीर्घ मालिका निर्माण केली.

लिंगायत समुदाय व शैव पंथाचे संस्थापक संत चेन्नाबसव यांचा जन्म वास्तविक बसव यांची बहिण नागलंबिका आणि एक दलित कवी दोहारा कक्कया यांच्या विवाहातून झाल्याचे त्यांनी मार्ग मालिकेतील पहिल्या पुस्तकात मांडल्यापासून त्यांना हिंदुत्त्ववादी संघटना आणि प्रामुख्याने आक्रमक लिंगायत समाजाच्या रोषाचे लक्ष्य व्हावे लागले. हा निष्कर्ष लिंगायत समाजाला आपल्या उच्च जातीय रक्ताच्या बदनामीचे कारस्थान वाटले. लिंगायत जात ही कर्नाटकातील मोठ्या शेतकऱ्यांची व जमिनदारांची जात आहे, हे लक्षात घ्यायला हवे. त्याचबरोबर धार्मिक कट्टरतावाद्यांनी बहिष्कार घातलेले व धार्मिक कर्मकांडांवर प्रहार करणारे यू. आर. अनंतमूर्ती यांचे पुस्तक नग्न पूजा कां चुकीची आहे ची प्रशंसा केल्यामुळे व आपल्या व्याख्यानांमधून व प्रबंधांमधून या पुस्तकात दिलेल्या तथ्यांचे संदर्भ दिल्यामुळे त्यांना विश्व हिंदू परिषद, राम सेना आणि बजरंग दलसारख्या फासिवादी संघटनांच्या हल्ल्यांना तोंड द्यावे लागले.

एक संशोधक, शिक्षणतज्ञ, एक तर्कवादी साहित्यिक आणि बुद्धिजीवी म्हणून त्यांचा जीवनसंघर्ष आणि फासिवाद्यांनी केलेली त्यांची हत्या, फासिवाद्यांना सगळ्यात जास्त कशाचे भय वाटते, याचीच साक्ष देतात. ते तर्काला घाबरतात, विज्ञानाला घाबरतात, संशोधनाला घाबरतात, सत्याच्या शोधाला घाबरतात आणि ज्ञानाला घाबरतात. कलबुर्गींची हत्या म्हणजे तर्कवाद्यांच्या हत्यांच्या साखळीतील आणखी एक हत्या होय. या अगोदर महाराष्ट्रात नरेंद्र दाभोळकर, कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या अशाच हत्या झालेल्या आहेत. फासिवाद्यांनी सत्तेत आल्यानंतर बिनधोकपणे हत्यांची मालिका सुरू केलेली आहे. कलबुर्गी यांची ज्या दिवशी हत्या झाली त्याच दिवशी बजरंग दलाच्या मेंगळुरू विभागाचे संयोजक भुवित शेट्टी यांनी उघडपणे ट्विटरवर या हत्येचे स्वागत केले व त्याचबरोबर तर्कवादी साहित्यिक एस भगवान यांनासुद्धा जिवे मारण्याची धमकी दिली, यावरून फासिवाद्यांचा सध्याचा बेडरपणा दिसून येतो. स्वतःला संसदेत आणि विधानसभेत भगव्या टोळीच विरोधक म्हणवणाऱ्या कॉंग्रेसने हिंदुत्त्वाची नवीन प्रयोगशाळा बनलेल्या कर्नाटकबद्दल फक्त सौम्य भूमिका घेतली आहे असे नाही तर त्यांना संरक्षणसुद्धा दिलेले आहे. आज जनतेची मुस्कटदाबी करण्याचे कारस्थान देशभरात सुरू असताना अभिव्यक्तीचे धोके पत्करणे आणि अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठी झुंजार संघर्ष उभारणे ही काळाची पहिली मागणी आहे.

**पावेल पराशर**

●

# समाजवादी रशिया आणि चीनने व्यसनबाजीचे उन्मूलन कसे केले?

**आपल्या समाजात दारूबाजी अगदी महामारीसारखी पसरलेली आहे. जगभरात दर वर्षी दारूशी संबंधित कारणांमुळे ३० लाख लोक आपला जीव गमावतात. आपल्या देशाची अवस्था तर अत्यंत चिंताजनक आहे. आपल्याकडे दर वर्षी हजारो मृत्यू तर फक्त विषारी दारूमुळेच होतात. अलीकडेच मुंबईच्या मालवणी भागात बेकायदेशीरपणे विकल्या जाणाऱ्या विषारी दारूमुळे १५० माणसे मरण पावली. या घटनेने एकीकडे गरीब जनतेच्या जखमांवर मीठ चोळले तर दुसरीकडे प्रशासन आणि पोलिसांचे खरे रूपसुद्धा उघडे पाडले. प्रशासनाने या घटनेनंतर वस्त्यांमध्ये दारूबाजी बंद करण्यासाठी ठिकठिकाणी पोस्टर बॅनर लावले, परंतु परिस्थिती काही बदललेली नाही. मालवणीची घटना फक्त एक उदाहरण आहे. खरे तर दर वर्षी अशा शेकडो घटनांमध्ये हजारो लोकांचे जीवन नष्ट होते, काही घटना काही दिवसांसाठी मिडिया, प्रशासन आणि जनतेमध्ये चर्चेचा विषय बनतात, गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्याचे नाटक केले जाते आणि प्रकरण थंड झाल्यानंतर पुन्हा पोलिस, प्रशासन, माफिया आणि राजकारणी यांच्या साट्यालोट्यांतून दारूचे बेकायदेशीर अड्डे पुन्हा खुलेआम सुरू होतात. शिवाय, स्वस्तात मिळणारी खराब दारू पिणारी देशातील बहुसंख्य गरीब जनता स्वतःला हळूहळू मृत्यूच्या दाढेत ढकलत असते. जगातील सगळे भांडवलदारी देश आज या समस्येने ग्रस्त आहेत. भांडवली सरकार आणि प्रशासनाने केलेले कोणतेही दारुबाजी विरोधी प्रयत्न या समस्येच्या मूळ कारणापर्यंत कधी पोचतच नाहीत. दुसरीकडे, रशिया आणि चिनने आपल्या समाजवादी काळात दारुबाजीचे उन्मूलन करून जगासमोर एक आदर्श ठेवला होता.**




व्यसनबाजी ही आपल्या समाजाची प्रदीर्घ काळापासूनची समस्या आहे. आज ह्या समस्येने आपल्या पिढीभोवती अजगर मिठी घातली आहे. एकट्या पंजाब मध्येच जवळपास ७३.५ टक्के तरुण व्यसनांच्या आहारी गेले आहेत. पंजाब मधील ग्रामीण भागात जवळपास ७६.४७ टक्के लोक दररोज दारू पितात. जागतिक आरोग्य संघटनेच्या एका रिपोर्ट नुसार जगात दर वर्षी ३० लाखांहून अधिक लोक दारू पिल्यामुळे मरतात.

समाजाला व्यसनमुक्त करण्याचे प्रयत्न वेळोवेळी करण्यात आले आहेत. परंतु नशेच्या ह्या दलदलीत समाज अधिकच आत ओढला जात आहे. वेगवेगळ्या देशांमधील सरकारे, समाजसेवी संस्था आणि ह्या नफा-केंद्रित व्यवस्थेच्या सेवेत गुंतलेले बुद्धीजीवी या समस्येवर ह्याच व्यवस्थेच्या चौकटीमध्ये राहून विविध उपाय सुचवत असतात. त्या उपायांची अंमलबजावणीसुद्धा करण्यात आली आहे. परंतु समाजातील व्यसनांचा प्रादुर्भाव रोखण्यात हे सर्व मार्ग अपयशी ठरले आहेत.

परंतु मानवी समाजाच्या इतिहासामध्ये एक सुवर्णकाळ असाही होता ज्यात व्यसन आणि शरीर-विक्रय यांसारख्या सामाजिक समस्या पूर्णपणे संपवण्यात आल्या होत्या. हा काळ होता रशिया आणि चीन मधील समाजवादी काळ. मानवी समाजाच्या इतिहासातील तो असा काळ होता जेव्हा शेकडो वर्षांपासूनच्या शोषणाच्या जोखडातून मुक्त होत सर्वहारा वर्गाने सत्तेची जबाबदारी आपल्या खांद्यांवर घेतली होती. तिथे केवळ आर्थिक प्रगतीचीच नवीन शिखरे पादाक्रांत केली गेली नाहीत तर नफाकेंद्रित व्यवस्थेतील सर्व विकृतींचा समूळ नायनाट करण्यात आला. ह्या लेखामध्ये आपण समाजवादी रशिया आणि चीनमधील व्यसन विरोधी प्रयोगांची चर्चा करणार आहोत, जेणे करून आपण आजच्या जगभरातील सरकारांची ह्या प्रश्नावरील दुतोंडी भूमिका, साम्राज्यवादी फंडिंगवर चालणारे धंदेवाईक एनजीओ आणि त्याच बरोबर व्यसनाधीन-व्यसन विक्रेत्या लोकांना दिल्या जात असलेल्या धार्मिक व नैतिक उपदेशांचे फसवे धुके साफ करू शकू.

### रशिया मधील दारुबाजी विरुद्धची लाट

रशिया मध्ये १९१७ च्या ऑक्टोबर क्रांतीच्या अगोदरच्या काळाची आणि त्यानंतरच्या दारूबाजी, वेश्यावृत्ती, स्त्रियांची खरेदी-विक्री, भ्रूण हत्या इत्यादी विरुद्धच्या लाटेची चर्चा अमेरिकी पत्रकार डायसन कार्टर यांच्या 'पाप आणि विज्ञान' ह्या पुस्तकात वाचावयास मिळते. डायसन कार्टर यांनी स्वतः क्रांती पश्चातच्या रशियामध्ये जाऊन बदललेल्या परिस्थितीचा अभ्यास केला आणि त्याच बरोबर त्या वेळी अमेरिका-युरोपमध्ये ह्या समस्येवर उपाय म्हणून उपयोगात आणल्या गेलेल्या (अपयशी) प्रयत्नांची चर्चा सुद्धा केली आहे. आपण आपली चर्चा दारुबाजी विरुद्धच्या प्रयत्नांपुरती मर्यादित ठेवणार आहोत.

### क्रांतीच्या अगोदरचा काळ :

ऑक्टोबर क्रांतीच्या आधी रशिया मध्ये दारू ही आयुष्याचा सामान्य भाग होती. जवळपास सर्व रशियन्स दारू पीत असत. रस्त्यांवर दारूच्या नशेत झोकांड्या घेत चालणारे लोक हे सामान्य चित्र होते. दारूबाजीचे हे वाढते प्रस्थ रोखण्याच्या प्रयत्नांची सुरुवात झाली ती १८१९ मध्ये. झार सरकारने दारूबाजी कमी करण्यासाठी जी प्रतिबंधात्मक पाऊले उचलली होती ती खालील प्रमाणे आहेत:

**दारू विक्रीला सरकारी नियंत्रणात ठेवणे :** ह्यामुळे दारूच्या विक्रीमध्ये तरी कमी आली नाही पण त्यातून झारच्या उत्पन्नामध्ये मात्र नक्कीच भरघोस वाढ झाली. हे प्रस्थ ८ वर्षे चालले. त्याची अंमलबजावणी करणे दिवसेंदिवस अवघड होत गेल्यामुळे दारू विक्री पुनश्च खाजगी हातांमध्ये सुपूर्त करण्यात आली.

**दारूवर कर :** ह्या मागे झार सरकारचा हेतू सामान्य जनतेसाठी दारू महाग व्हावी, परंतु दारूच्या माध्यमातून मिळणारा पैसा कायम राहावा हा होता. ह्या उपायामुळे दारुविक्री मध्ये कुठलीही कमी आली नाही, कारण जनतेने खाण्यावरील खर्च कमी करून पिण्यावरती खर्च करण्यास सुरुवात केली.

**लाइसेंस व्यवस्था :** तीस वर्ष रशियामध्ये दारूचे व्यसन वाढतच गेले. धर्मगुरुंनी उपदेश करूनही लोकांनी दारू पिणे सुरूच ठेवले. त्यानंतर लाइसेंस व्यवस्था लागू करण्यात आली, जेणे करून दुकानांची संख्या कमी करता यावी. त्यानंतर रशियामध्ये दारू विक्री करणाऱ्या दुकानांची संख्या २,५०,५०० वरून १,१५,००० पर्यंत खाली आली पण दारूची विक्री अजूनच वाढली.

**व्यसन विरोधी संघटना :** झार सरकारकडून नशामुक्तीसाठी जे प्रयत्न केले जात होते त्यामागची चालक शक्ती रशियातील उद्योगपती होते. कामगार दारूच्या नशेमध्ये काम करत. त्यामुळे त्यांच्या उत्पादकतेमध्ये प्रचंड फरक पडत असे. दुसऱ्या बाजूला जमीनदारांचा समर्थक झारचा चुलत भाऊ अलेक्सान्द्र (जो स्वतः सुद्धा एक श्रीमंत जमीनदार होता) याचे मत होते की शेतकऱ्यांमधील वाढत्या दारूच्या व्यसनामुळे शेतीमधील उत्पादकतेमध्ये सुद्धा प्रचंड खालावते आहे. त्यातून त्याने स्वतःला झारपासून वेगळे केले आणि स्वतःचीच व्यसन विरोधी संघटना उभी केली. व्यसनाचा विळखा रोखण्यासाठी ह्या संघटनेने खालील मार्ग अवलंबले:

ह्या संघटनेने मोठ्या प्रमाणावर बाग-बगीचे, आराम-गृह यांची सोय केली. मनोरंजन केंद्र, नाटक गृह इत्यादींची स्थापना केली. अशा ठिकाणी बहुतेक वेळा लोकांचा जास्त पैसा खर्च होत नसे. ह्या ठिकाणी भाषणे दिली जात असत. त्यात दारूमुळे होणाऱ्या नुकसानाचे वैज्ञानिक दाखले देण्यात येत असत. १९०३ पर्यंत ह्या संघटनेचे काम जोरात चालू होते. परंतु ह्या सगळ्या प्रयत्नाचा परिणाम हा झाला की लोक ह्या ठिकाणी मोफतचे मनोरंजन करून घेत असत आणि वाचलेल्या पैश्यांची दारू पीत.

**दारुबंदी :** व्यसन विरोधी आंदोलन सुरु झाल्यापासून १९१४ पर्यंत रशिया मधील 'वोडका'ची विक्री ५०० टक्क्यांनी वाढली होती. शाळांमधील ८० टक्क्यांहून अधिक मुले वोडका पीत असत. त्याच वेळी पूर्व आघाडीवर युद्ध सुरु झाले होते तर दुसरीकडे औद्योगिक व कृषी क्षेत्रातील उत्पादन घटले होते. रशियातील उद्योगपतींनी झार सरकारवर व्यसनमुक्तीसाठी दबाव वाढवला. परिणामतः १९१६ मध्ये झार सरकारने ही समस्या सोडवण्यासाठी दारूवर पूर्णपणे बंदी आणली. दारू विक्री करणारी व बनवणारी दुकाने नष्ट करण्यात आली.

परिणामी १९१६ च्या सुरुवातीचे काही महिने दारू बंद झाली. पण अचानकच पुन्हा सबंध रशियातील जनता पुनश्च दारूच्या आहारी गेली. एका बाजूने युद्धात होत असलेले मृत्यू आणि दुसरीकडे गरिबी, भूकबळी ह्यामध्ये रशियातील जनता अडकली होती. ह्या पासून सुटका करून घेण्यासाठी रशियन जनता दारूकडे वळली. रशियात घराघरात अवैध्य दारू बनवली जाऊ लागली. लोकांनी धान्यापासून दारू बनवून विकण्यास सुरुवात केली.

आतापर्यंत आपण झार सरकारने व्यसनावर नियंत्रण मिळवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा परिणाम उलटा झालेलाच बघितला. आता आपण १९१७ च्या ऑक्टोबर क्रांतीनंतरच्या सोवियत समाजवादी काळात व्यसनमुक्ती साठी केलेल्या उपायांचा विचार करूयात, जेणे करून ह्या दोन्ही मधील फरक स्पष्ट करत व्यसनाधिनतेच्या समस्येचे मूळ काय हे ध्यानात येईल.

### क्रांती पश्चातचा काळ

१९१७च्या ऑक्टोबर क्रांतीनंतर रशियामध्ये कामगारांची सत्ता स्थापन झाली. खाजगी मालकीवर आधारलेली व्यवस्था नष्ट करून समाजवादी व्यवस्था स्थापन करण्यात आली. परंतु त्या वेळी रशियामध्ये दुष्काळाची परिस्थिती होती. लोक धान्य गोदामांमध्ये जमा करण्याऐवजी त्यापासून दारू बनवत होते. धान्यापासून बनवलेली ही दारू अत्यंत विषारी असे. सोवियत सरकारसाठी सर्वप्रथम ह्या दारूची विक्री थांबवणे आवश्यक बनले जेणे करून धान्याचा तुटवडा कमी होईल. सोवियत अधिकाऱ्यांनी सर्वप्रथम बटाट्यापासून दारू बनवणे कायदेशीर घोषित केले. सोवियत सरकारने तोपर्यंतच्या दारुविरोधी अभियानाचे रिपोर्ट अभ्यासले. ह्या रिपोर्ट्समधील तथ्य अभ्यासल्यानंतर सोवियत अधिकाऱ्यांनी दारुबाजीच्या समस्येचा नव्याने अभ्यास करण्याचे काम हाती घेतले. ह्या अभ्यासाच्या दरम्यान हे तथ्य समोर आले की दारुबाजीची समस्या ही सामाजिक आणि आर्थिक समस्यांशी जोडलेली समस्या आहे. लोक दारूकडे तेव्हाच वळतात जेव्हा ते बेकारी, गरिबी, भूक ह्या समस्यांमध्ये भरडले जातात. त्यांना आपले दुखः विसरण्याचा एकमेव आधार दारूमध्ये दिसतो. दुसऱ्या बाजूला सरकार टॅक्सच्या माध्यमातून महसूल गोळा होत असल्यामुळे तिला प्रोत्साहन देते. झार सरकारला एकूण उत्पन्नापैकी एक चतुर्थांश भाग दारूच्या महसुलामधून मिळत असे.

ही समस्या निकालात काढण्यासाठी सोवियत सरकारने खालील पाऊले उचलली :

**घरगुती व विषारी दारू बनवणाऱ्यांचा नायनाट :** सोवियत अधिकाऱ्यांनी घरगुती दारू बनवणाऱ्यांना बाजारातून बाहेर करण्यासाठी दारूवरील टॅक्स काढून टाकला आणि बाजारातील दारूंच्या किमती कमी केल्या. त्याच बरोबर झार सरकारची दारूच्या व्यापारामध्ये किती हिस्सेदारी होती ह्याचे आकडे सुद्धा जाहीर केले. त्यामुळे लोकांना हे समजले की सोवियत सरकार दारू विक्रीपासून लाभ कमवू इच्छित नाही. दारूच्या किमती कमी झाल्यामुळे लोकांच्या आनंदाला पारावर उरला नाही. डायसन कार्टर यांच्या शब्दांमध्ये – "तो दिवस आपोआपच राष्ट्रीय उत्सवाचा दिवस बनला होता. त्या दिवशी सर्वांनीच मनसोक्त नवी-जुनी, उत्कृष्ट प्रतीची वोडका पिली. परंतु त्यामुळे झाले हे की घरगुती दारू बनवणारे नष्ट झाले".

**दारू विक्रीशी संबंधित नियम :** दारू स्वस्त केल्यानंतर सोवियत अधिकाऱ्यांनी तिच्या विक्रीसंदर्भात काही नियम बनवले. हे नियम पुढील प्रमाणे होते : कारखान्यांच्या आसपासच्या परिसरात दारू विकली जाणार नाही, सुट्टी आणि पगाराच्या दिवशी सुद्धा तिथे दारू विकली जाणार नाही, तरुणांना आणि दारूच्या नशेत असलेल्यांना दारू विकणाऱ्यास कडक शिक्षा देण्यात येईल.

पान ९ वर

# समाजवादी रशिया आणि चीनने व्यसनबाजीचे उन्मूलन कसे केले?

पान ८ वरून

**दारूबाजीच्या विरोधात प्रचार मोहीम** : रशियातील एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत दारूबाजीच्या विरुद्ध जबरदस्त प्रचार मोहीम चालवण्यात आली. दारूबाजीच्या विरुद्ध ह्या नवीन प्रचाराच्या माध्यमातून जनतेला दारूशी संबंधित वैज्ञानिक तथ्य अगदी स्पष्ट शब्दांत सांगण्यात आले. त्यांना सांगितले गेले की दारूच्या अतिसेवनामुळे मेंदूच्या शिरांना गंभीर नुकसान पोहोचते. त्यांना सांगण्यात आले की दारू पिणे गरजेचे नाही. रशियातील लोकांमध्ये हे तथ्य नाट्यगृह व टेलीविजन सारख्या नवनवीन माध्यमांमार्फत पोहोचवण्यात आले. हे तथ्य लोकांसाठी केवळ भाषणापुरते मर्यादित नव्हते. कारण आता रशियामधील परिस्थिती बदलली होती. आता रशियातील जनतेला हे माहिती होते की आता त्यांची सत्ता आली आहे आणि त्यांच्याद्वारे निर्माण केल्या जाणाऱ्या वस्तूंवर आता जमीनदार-कारखानदारांची मालकी नसून त्या वस्तू आता संपूर्ण समाजाच्या सामूहिक हितासाठी आहेत. त्यामुळेच जनतेला दारूच्या शारीरिक दुष्परिणामाबरोबरच हे सुद्धा सांगितले गेले की दारूच्या सेवनामुळे देश निर्माणावरती काय दुष्परिणाम होतो. शेत-कारखाने-खाणी मध्ये काम करणाऱ्या कामगारांना सांगितले गेले की दारू पिल्यामुळे त्यांच्या कामामध्ये काय फरक पडतो. लोकांना दारू सोडण्यासाठी ना नैतिक उपदेश दिले गेले, ना दारू पिणाऱ्यांना पापी समजले गेले. पण त्यांना समाजाला नुकसान पोहोचवणाऱ्यांच्या रूपात मात्र चित्रित करण्यात आले.

**सामाजिक दबाव**: रशियामध्ये असे दारुडेसुद्धा अर्थातच होते ज्यांनी वोडकाच्या बाटलीसाठी दारू विरोधी अभियानाच्या प्रचाराकडे दुर्लक्ष केले. ह्या दारुड्यांसाठी सोवियत अधिकाऱ्यांनी वेगळा मार्ग अवलंबला. हा मार्ग होता सामाजिक दबावाचा मार्ग. जिथे जिथे दारूची समस्या गंभीर होती तिथे दारू-विरोधी-केंद्र सुरू करण्यात आले. जेव्हा केव्हा एखादा दारुडा मिळत असे, त्याला अशा केंद्रांमध्ये भरती केले जात असे. त्याला स्वच्छ आंघोळ घालून त्याची काळजी घेतली जात असे, त्यानंतर त्याचे नाव, पत्ता आणि कामाची जागा ह्याबद्दल माहिती काढून त्याला तिथे पाठवण्यात येत असे. त्यानंतर तो जिथे काम करतो तिथल्या कामगार सभेला त्याची संपूर्ण रिपोर्ट पाठवली जात असे. अश्या लोकांशी निपटण्यासाठी खास सिमिती बनवण्यात आल्या. जेव्हा तो दारुडा पुन्हा कामावर पोहोचत असे, तेव्हा समितीचे लोक हातात दारूच्या बाटल्या आणि त्याचे व्यंगचित्र घेऊन स्वागत करत असत. दारुडा जर पुन्हा दारू प्याला तर त्याची अजूनच नाचक्की करण्यात येत असे. काही हाताबाहेर गेलेल्या दारुड्यांच्या विरोधात कडक कारवाईसुद्धा करण्यात येत असे. ही पद्धत खूपच यशस्वी झाली कारण आता दारुड्यांवर प्रचंड सामाजिक दबाव होता. लोक त्याला देशाच्या प्रगतीमध्ये अडसर समजतील, अशी भीती त्याला वाटत होती.

**खाण्या-पिण्याच्या ठिकाणी दारू** : सोवियत मनोवैज्ञानिकांनी सुचिवल्याप्रमाणे खाण्या-पिण्याच्या जागी दारूचा उपयोग वाढवण्यासाठी एक मोहीम चालवण्यात आली. वरवर बघता हा दारूला प्रोहत्सान देणारा प्रयोग वाटेल, परंतु ह्या मागे वैज्ञानिक कारण होते. एक तर हे की लोकांनी अश्या दारू अड्ड्यांवर दारू पिणे सोडून द्यावे जिथे फक्त दारू मिळते. कारण केवळ दारू पिणे शरीरास अपायकारक असते. दुसरे म्हणजे जुन्या अनुभवावरून हे लक्षात आले होते की लोक गरीबीमुळेच दारूच्या आहारी जात असत. त्यांना दारू किंवा जेवण ह्यापैकी एकाची निवड करावी लागत असे. त्यातून ते साहजिकच दारूची निवड करत असत. सोवियत सरकारने बनवलेल्या नवीन कायद्यानुसार दारू केवळ अश्या खाण्यापिण्याच्या ठिकाणी मिळत असे जिथे परिवार जेवण्यास येत असत आणि जिथे संपूर्णपणे पारिवारिक वातावरण असेल. ह्यामुळे लोकांच्या सवयींमध्ये आणि व्यवहारामध्ये मोठे बदल घडून आले. आता लोक कमी दारू पीत असत कारण सोबत जेवणही करावे लागत असे. अश्या उपायांच्या माध्यमातून सोवियत रशियामध्ये दारूबाजी खूप वेगाने कमी झाली.

### सोवियत रशियामधील व्यसन विरोधी अभियानानंतरच्या २० वर्षांनंतरची परिस्थिती

डायसन कार्टर व त्यांची पत्नी सोवियत रशियामधील दारूबाजी संबंधित तथ्य अभ्यासण्यासाठी गेले तेव्हा त्यांनी व्यसन विरोधी अभियानानंतरच्या परिस्थितीचे वर्णन पुढील शब्दात केले आहे –

“आम्ही बघितले की साधारणपणे पाहुण्यांच्या स्वागताला जे लोक येत असत ते पाण्याचा किंवा ज्यूसचा ग्लास घेऊन उभे असत. त्यानंतर वाढपी जेव्हा वेगवेगळे पदार्थ वाढू लागे तेव्हा लोक स्पष्ट इशारा करीत की ते बीयर किंवा हल्की दारू घेऊ इच्छितात”

… “आम्ही भोजनालयांमध्ये आणि छोट्या-मोठ्या हॉटेल्समध्ये जेवण केले. त्यापैकी अर्ध्या पेक्षा जास्त ठिकाणी दारू सादर केली गेली. आम्ही हजारो सोवियत नागरिकांना खात-पित असताना बघितले. परंतु एकदासुद्धा आम्ही जेवण करतेवेळी किंवा रस्त्यांवर चालत असताना एकही व्यक्ती नशेमध्ये झुलत असताना बघितला नाही.”

…“वीस-तीस वर्षांचे बहुतेक तरुण तेथे एखाद्या विशिष्ट वेळी दारू पीत. बहुतेक तरुण तर दारूच पीत नसत.”

### समाजवादी चीनने व्यसनांचे उन्मूलन कसे केले?

१९४९च्या क्रांतीच्या अगोदर चीनमधील लोक गरिबी, दारिद्र्यामध्ये आयुष्य व्यतीत करीत होते. मुठभर जमीनदार, सरदार आणि वसाहतवाद्यांकडून चीनी जनतेचे प्रचंड शोषण करण्यात येत असे. क्रांती अगोदर व्यसनांचा विळखा इतका घट्ट होता की ७ कोटी लोक गांजा, मॉर्फिन आणि हेरोइनच्या आहारी गेले होते. भुकेले-गरीब लोक आपले दुखः-कष्ट विसरण्यासाठी गांजाची मदत घेत असत. दुसरीकडे श्रीमंत आणि जमीनदार आपला रिकामा वेळ घालवण्यासाठी व्यसन करीत असत. परिस्थिती ईतकी वाईट होती की मादक पदार्थ छोट्या-छोट्या बाटल्यांमध्ये भरून रस्त्यांवर आईसक्रीम विकावेत तसे विकले जात असत. परिणामी लोक मादक पदार्थ खरेदी करण्यासाठी आपली मुलंसुद्धा विकत असत वा महिलांना वेश्यावृत्ती करायला भाग पाडीत.

### चीनमध्ये व्यसनांची सुरुवात कशी झाली?

चीनवर अमली पदार्थ यूरोप आणि अमेरिकेच्या वसाहतदांकडून लादण्यात आले. चीनने ब्रिटनकडून गांजाची निर्यात कबूल करावी यासाठी आणि चीनमध्ये गांजा कायदेशीर ठरवण्यासाठी १८३९ मध्ये युद्ध लादण्यात आले, जे इतिहासातील प्रसिद्ध ‘गांजा युद्ध’ म्हणून ओळखले जाते. ब्रिटनकडून मोठ्या प्रमाणात चीनमध्ये गांजाची निर्यात करणात आली, जेणेकरून प्रचंड नफा मिळवला जाऊ शकेल. चीनी जनतेवर गांजाचे व्यसन लादण्यात आले, व गांजाच्या माध्यमातून मिळालेला नफा पुन्हा चीनी जनतेला गुलाम बनवण्यासाठी उपयोगात आणला गेला. अमेरिकेमध्ये राष्ट्राध्यक्ष रीगनच्या कार्यकाळात सीआईए द्वारा कित्येक टन कोकेन अमेरिकेमध्ये आणण्यात आली, तसेच हे होते. जिच्याकडे आला दिवस ढकलण्यापलीकडे प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी कुठलाही मार्ग शिल्लक नव्हता अशी अमेरिकेतील गरीब बेरोजगार जनता कोकेनच्या आहारी गेली. त्यानंतर अमेरिकन सरकारने ‘व्यसन विरोधी लढाई’च्या नावाखाली ह्या जनतेवर आणि खास करून कृष्णवर्णीय लोकांवर अमानुष अत्याचार करण्यास सुरुवात केली. यालाच ‘क्रैक कोकेन महामारी’ म्हटले जाते. दुसरीकडे अमेरिकन सरकार कोकेन विक्रीतून होणाऱ्या नफ्यातून निकारागुआ मधील साम्यवादी सरकार विरुद्धच्या गुप्त युद्धाला आर्थिक सहाय्य करत होते.

वर सांगितलेल्या तथ्यांमधून एक गोष्ट स्पष्ट आहे की विद्यमान व्यवस्था व्यसने संपवू शकत नाही.

### चीनमधील व्यसन विरोधी अभियान

चीनमध्ये अमली पदार्थांचे उत्पादन, विक्री आणि सेवन रोखण्यासाठी जनतेच्या भागीदारीचा मार्ग निवडण्यात आला. व्यसनांच्या आहारी गेलेल्या लोकांना व्यसन सोडण्यास प्रेरित करण्यात आले. व्यसन सोडलेले लोक, त्यांचे कुटुंबीय, शाळेतील मुले आणि वृत्तपत्रे, रेडियो इत्यादींना व्यसन विरोधी अभियानासाठी एकजूट करण्यात आले.

दुसरीकडे, अमली आवक कमी व्हावी यासाठी क्रांतीकारकांकडून लोकांना अमली पदार्थांचा व्यापार संपवण्यासाठी संघटित करण्यात आले. अमली पदार्थांची आवक घटल्यामुळे लोकांना अमली पदार्थांचे सेवन करणे अवघड झाले. व्यसनविरोधी अभियान, ज्यामध्ये प्रत्येक वर्गातील लोकांची सक्रिय भूमिका होती, ते सर्व लोक जुन्या व्यवस्थेद्वारे निर्माण केली गेलेली सामाजिक समस्या मुळापासून उघडून टाकण्यासाठी एकजूट झाले होते. ह्या व्यसन विरोधी मोहिमेने जनांदोलनाचे रूप घेतले होते.

चीन सरकारने व्यसनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी दोन प्रकाराचे उपाय अमलात आणले : लोकांना सांगितले गेले की व्यसनांच्या आहारी गेलेले लोक हे जुन्या शोषणावर आधारलेल्या व्यस्थेचे बळी आहेत, त्यामुळे व्यसनांतून त्यांची मुक्तता करण्यासाठी त्यांना मदत केली जावी. अमली पदार्थ विक्री करण्याच्या धंद्यात गुंतलेल्या गरीब लोकांनासुद्धा ह्या धंद्यातून बाहेर पडण्यासाठी दुसऱ्या संधी देण्यात आल्या आणि व्यसन विरोधी अभियानामध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. कोणत्याही व्यक्तीशी व्यसन मुक्तीसाठी ना जबरदस्ती केली गेली ना त्याला शिक्षा देण्यात आली. लोकांना व्यसनापासून मुक्त होण्यासाठी पूर्ण वेळ देण्यात आला. व्यसनाच्या विळख्यातून बाहेर येण्यासाठी व्यसनी माणसाला त्याच्या कुटुंबीयांसोबतच संपूर्ण समाजाचे सहकार्य मिळत असे.

लोकांच्या दुःखांचा-कष्टांचा फायदा घेऊन श्रीमंत बनणाऱ्या अमली पदार्थांच्या मोठ्या क्रांतिकारकांनी वेगळे धोरण स्वीकारले. त्यांची नावे ‘लोकांचे शत्रूच्या’ यादीमध्ये टाकण्यात आली. ज्या हजारो लोकांचे आयुष्य अशा नफेखोर व्यापाऱ्यांनी बरबाद केले होते, त्यांच्यासमोर या व्यापाऱ्यांना उभे करण्यात आले. बहुतेक गुन्हेगारांना जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली. आणि ज्यांचे अपराध अक्षम्य होते त्यांना मृत्युदंडाची शिक्षा देण्यात आली.

१९५१ पर्यंत उत्तरी चीनमध्ये व्यसनबाजी पूर्णपणे संपुष्टात आणली गेली. दक्षिण चीनमध्ये यावर नियंत्रण मिळवण्यासाठी अजून १-२ वर्षांचा कालावधी लागला.

१९५३ मध्ये रशियात स्टालिन आणि १९७६ मध्ये चीनमध्ये माओच्या मृत्युपश्चात भांडवलशाहीची पुनर्स्थापना झाली. शोषणावर आधारलेली व्यवस्था पुनश्च कायम झाली. त्याचबरोबर ही व्यवस्था व्यसनबाजी सारख्या जुन्या समस्या पुन्हा घेऊन आली. परंतु रशिया आणि चीनमधील समाजवादी काळातील अनुभवांनी हे सिद्ध केले आहे की जर नफाकेंद्रित व्यवस्था नष्ट करून जिच्या केंद्रस्थानी माणूस आहे अशी क्रांतिकारी व्यवस्था निर्माण केली गेली तर जनतेच्या विराट शक्तीला आर्थिक शिखरे पादाक्रांत करीत एका निरोगी समाजाचे सृजन करण्याच्या दिशेने वळवले जाऊ शकते.

**मूळ लेख : तजिंदर**
**मराठी अनुवाद : अमित शिंदे**

●

# इमारती कोसळून दरवर्षी होणाऱ्या शेकडो मृत्यूंना जबाबदार कोण?

पान १६ वरून

की महाराष्ट्र सरकारच्या माहिती नुसार २०१० मध्ये केवळ ठाणे जिल्ह्यात ५ लाख बेकायदेशीर इमारती किंवा घरे होती. कित्येक वेळा अश्या बेकायदेशीर इमारती बांधकामाच्या टप्प्यातच कोसळतात, ज्यात शेकडो बांधकाम कामगार आपले प्राण गमावतात.

अशी स्वस्त घरे विकण्यासाठी वर्तमानपत्रे, लोकल ट्रेन्स व टी.व्ही.यांच्या माध्यमातून जाहिरातींचा भडीमार केला जातो. कमी आर्थिक उत्पन्न असलेले लोक अशा जाहिरातींकडे आकर्षित होतात आणि त्यांच्या जाळ्यात अडकतात. घरात राहायला गेल्यापासूनच्या पहिल्या दिवसापासूनच छतामधून पाणी गळणे, भिंतींमध्ये ओलसरपणा निर्माण होणे, भिंतींचा रंग उडणे किंवा प्लास्टर गळून पडणे यांसारख्या समस्या सुरु होतात. बांधकामामध्ये निकृष्ट प्रतीचा माल वापरल्यामुळे व सदोष बांधकामामुळे अश्या इमारती मोठ्या पावसामध्ये कोसळतात. बांधकामाच्या सुरक्षितता मापदंडानुसार इमारतींची बांधणी अशी केली गेली पाहिजे की कुठल्याही कारणामुळे इमारत कोसळली तर त्यात राहणाऱ्या लोकांना इमारतीमधून बाहेर पडण्यासाठी पुरेसा वेळ व मार्ग मिळावा. चुकीच्या पद्धतीने बनवलेली अशी घरे त्यात राहणाऱ्या लोकांना दुर्घटनेच्या परिस्थितीमध्ये बाहेर पडण्यासाठी पुरेसा वेळ न देताच जमीनदोस्त होतात. त्यामुळे अश्या दुर्घटनांमध्ये मरणाऱ्या लोकांची संख्या वाढते. अश्या प्रकारे शेकडो लोक कंत्राटदार व बांधकाम व्यावसायिकांच्या नफ्याच्या हव्यासाचे बळी ठरतात. अश्या इमारती कोसळल्यानंतर जर एखाद्या बांधकाम व्यावसायिकाला अटक करण्यात आली तरी प्रकरण शांत होताच पैसे खाऊन त्याला सोडण्यात येते.

आज तंत्रज्ञान अशा पातळीवर पोहोचले आहे की भूकंप व अन्य दुर्घटनांपासून संरक्षण करता येऊ शकेल अशी घरे बनवता येणे शक्य झाले आहे, पण दुसरीकडे काही लोकांची घरे नफ्याच्या हव्यासामुळे पाऊस सुद्धा झेलू शकत नाहीत, ही निश्चितच विचार करण्यासारखी गोष्ट आहे! आज उच्च तंत्रज्ञानाचा उपयोग करून प्रत्येक कुटुंबासाठी एक सुंदर-टिकावू-मजबूत घर व सुविधा पुरवल्या जाऊ शकत असताना लोकांना अश्या घरात राहावे लागत आहे जे कधीही त्यांच्या मृत्यूचे कारण बनू शकते!

**नितेश शुक्ला**

●

क्रांतिचे शास्त्र

# समाजवादाची मुळाक्षरे (भाग - १)

लिओ ह्यूबरमॅन

समाजवाद म्हणजे कामगारांचे राज्य. कामगारांचे राज्य असे आपण म्हणतो, त्याचा नेमका अर्थ काय? ऐण उत्पादन, संपूर्ण शासन प्रशासनावर कामगारांचा ताबा असलेली व्यवस्था म्हणजेच कामगारांचे राज्य. आज आपण एका भांडवली समाजात जगतो आहोत. म्हणजेच अशा समाजात जेथे उत्पादनावर, एकूण शासन प्रशासनावर मूठभर धनिकांचा, भांडवलदारांचा ताबा आहे. ही अशी व्यवस्था आहे जिच्यामध्ये कामगार हर तऱ्हेचे कष्ट उपसतात आणि सगळा फायदा मालक लाटतात. काहीच न करता मालक चैनीत राहतात आणि कामगार दिवसभर घाम गाळूनसुद्धा दरिद्रीच राहतो. अशी व्यवस्था संपायला नको का? अशी लुटारू व्यवस्था नक्कीच नष्ट झाली पाहिजे. हे ऐकायला फार गोड वाटते, पण खरोखरच अशी व्यवस्था नष्ट केली जाऊ शकते? हो नक्कीच नष्ट केली जाऊ शकते. तिला नष्ट करण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे क्रांती. मात्र बघता बघता क्रांती करून टाकली, असे काही कधी होऊ शकत नाही. त्यासाठी आपल्याला क्रांतीच्या शास्त्राची गरज आहे. हे शास्त्र आत्मसात केल्याशिवाय आपण समाज बदलू शकत नाही. आजपासून सुमारे १०० वर्षांपूर्वी रशियामधील कामगारांनी १९१७ साली हे शास्त्र आत्मसात करून आपल्या देशात समाजवादाची स्थापना केली होती. चिनमधील कामगारांनीसुद्धा १९४९ साली क्रांती करून राज्य आपल्या हाती घेतले होते. हे दोन्ही मागासलेले देश होते परंतु त्यांनी समाजवादाच्या काळामध्ये वेगाने प्रगती केली. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे त्यांनी मालकांनी चालवलेली लूट थांबवली आणि सामूहिकतेवर आधारित एका नव्या समाजाची निर्मिती केली. दोन्ही देशांमध्ये २५-३० वर्षे समाजवाद राहिला, परंतु तो जास्त काळ टिकू शकला नाही. आज मालकवर्ग आपल्याला सांगत असतो की समाजवाद अपयशी ठरला आहे आणि तो फार दिवस टिकून राहू शकत नाही. परंतु हे खरे नाही, समाजवाद अपयशी ठरला नाही तर त्याने आपल्या काळात लोकांच्या जीवनात विलक्षण परिवर्तन घडवून आणले. समाजवाद जास्त काळ रशिया आणि चिनमध्ये का टिकून राहू शकला नाही, हेसुद्धा आपण क्रांतिचे शास्त्र समजून घेतल्यानंतर जाणून घेऊ शकतो.

तसे पाहता हे शास्त्र समजून घेण्यासाठी मोठमोठी पुस्तके उपलब्ध आहेत. ती आपण नक्कीच वाचली पाहिजेत, परंतु सुरुवात आपण समाजवादाची मुळाक्षरे या लहानशा पुस्तिकेपासून करू या. अमेरिकेतील एक समाजवादी लिओ ह्यूबरमॅन यांनी लिहिलेली ही पुस्तिका भांडवलशाहीचे वेगवेगळे पैलू आणि समाजवाद म्हणजे काय हे अतिशय साध्या सोप्या शब्दांमध्ये समजावते. ही पुस्तिका १९६७ मध्ये प्रकाशित झाली होती आणि प्रामुख्याने अमेरिकेतील कामगारांना डोळ्यांसमोर ठेवून ती लिहिण्यात आली होती. बहुतके आकडेवारीसुद्धा अमेरिकेतील आहे. परंतु ही पुस्तिका जेवढी अमेरिकेतील कामगारांसाठी प्रासंगिक आहे तेवढीच भारतातील कामगारांसाठीसुद्धा.

नियमित अभ्यास करण्यासाठी एक मालिका सुरू करणे गरजेचे आहे. म्हणूनच क्रांतिचे शास्त्र या शिर्षकासह आम्ही ही मालिका सुरु करीत आहोत. आपले जीवन बदलण्यासाठी आवश्यक असे लिखाण आम्ही नियमितपणे येथे प्रसिद्ध करू.

## भांडवलशाहीचे समाजवादी विश्लेषण

### १. वर्ग-संघर्ष

माणसे गरीब असोत वा श्रीमंत, दुर्बळ असोत वा बलिष्ठ, गोरी, काळी, सावळी वा गव्हाळ असोत, ती प्रत्येक ठिकाणी अशा वस्तूंचे उत्पादन आणि वितरण करतात ज्या जीवनासाठी अत्यावश्यक किंवा आवश्यक असतात. अमेरिकेमध्ये उत्पादन आणि वितरणाच्या या व्यवस्थेला भांडवलशाही म्हणतात. जगातील बहुतेक देशांमध्ये अशाच पद्धतीची व्यवस्था अस्तित्त्वात आहे. अन्न, वस्त्र, निवारा, ऑटो, रेडिओ, वर्तमानपत्रे, औषधे, शाळा इत्यादींच्या उत्पादन आणि वितरणासाठी मूलतः दोन गोष्टी आवश्यक आहेत.

१. जमीन, खनिज, कच्चा माल, मशीन, कारखाना ज्यांना अर्थशास्त्रज्ञ उत्पादनाची साधने असे म्हणतात.

२. कष्टकरी कामगार जे आपले श्रम आणि कौशल्य उत्पादनांच्या साधनांसोबत कामी आणतात आणि आवश्यक वस्तूंचे उत्पादन करतात.

इतर भांडवलशाही देशांप्रमाणेच संयुक्त राष्ट्र अमेरिकेमध्येसुद्धा उत्पादनांची साधने ही सार्वजनिक संपत्ती नाही आहे. जमीन, कच्चा माल, मशीन यांवर व्यक्तींची मालकी असते. हे एक महत्त्वपूर्ण सत्य आहे. कारण तुमची उत्पादनांच्या साधनांवर मालकी आहे अथवा नाही, यावरून तुमचे समाजातील स्थान ठरत असते. जर तुम्ही उत्पादनांच्या साधनांवर मालकी असलेल्या लहान वर्गाशी – भांडवलदार वर्गाशी – संबंधित असाल, तर तुम्ही काम न करतासुद्धा जगू शकता. जर तुम्ही उत्पादनांच्या साधनांवर मालकी नसलेल्या फार मोठ्या वर्गाशी, म्हणजेच कष्टकरी वर्गाशी – श्रमिक वर्गाशी- संबंधित असाल, तर तुम्ही काम न करता जिवंत राहू शकत नाही.

एक वर्ग शासन करून जिवंत राहतो आणि दुसरा वर्ग कष्ट करून. भांडवलदार वर्गाची मिळकत इतरांना आपल्यासाठी कामाला लावून पैदा होते, तर कष्टकरी वर्गाची कमाई त्याने केलेल्या कामाच्या मोबदल्यात त्याला मिळणाऱ्या पगाराच्या स्वरूपात होत असते.

आपल्याला जिवंत राहण्यासाठी ज्या आवश्यक वस्तूंची गरज असते त्यांच्या उत्पादनासाठी श्रम आवश्यक असतात. कष्ट करणाऱ्या श्रमिक वर्गाला भरपूर मोबदला मिळत असेल, असे तुम्हांला वाटू शकते. पण प्रत्यक्षात तसे होत नाही. भांडवलदारी समाजामध्ये जे सर्वांत जास्त श्रम करतात त्यांचे उत्पन्न सर्वांत जास्त असतेच असे नाही. या उलट, ज्यांच्याकडे सर्वांत जास्त मालकी असते, ते सर्वांत जास्त कमाई करतात.

नफा भांडवलदारी समाजामध्ये चक्र फिरतं ठेवण्याचे काम करतो. जो कुठलीही वस्तू विकत घेण्यासाठी कमीत कमी किंमत देतो, आणि जी वस्तू विकायची आहे तिची जास्तीत जास्त किंमत वसूल करतो, तोच हुशार व्यापारी असतो. खर्च कमी करणे हे जास्तीत जास्त नफा कमावण्याच्या मार्गातील पहिले पाऊल आहे.

श्रमिकांना मिळणारा पगार हासुद्धा उत्पादनातील एक खर्च आहे. श्रमिकांना शक्य तेवढा कमी मोबदला देण्यात मालकाला म्हणजेच भांडवलदाराला रस असतो. त्याच प्रकारे, श्रमिकांकडून जास्तित जास्त काम करून घेण्यासही तो उत्सुक असतो.

उत्पादन सांधनांच्या मालकांच्या आणि त्यांच्यासाठी काम करणाऱ्या माणसांच्या, म्हणजेच श्रमिकांच्या, आकांक्षा पूर्णपणे भिन्न असतात. भांडवलदारांसाठी संपत्तीचे स्थान पहिले तर माणुसकीचे स्थान दुय्यम असते. श्रमिक हा माणसाला म्हणजेच स्वतःला पहिल्या स्थानी ठेवतो तर संपत्तीला दुसऱ्या स्थानी. त्यामुळे भांडवलदारी समाजात या दोन वर्गांमध्ये नेहमी संघर्ष सुरू असतो. वर्ग समाजामध्ये दोन्ही पक्ष ज्या कारवाया करतात त्या त्यांच्यासाठी आवश्यक असतात. भांडवलदार हा भांडवलदार म्हणून टिकून राहण्यासाठी नफा मिळवण्याचा यथाशक्ती प्रयत्न करतो. श्रमिक जिवंत राहण्यासाठी योग्य मजुरी मिळावी यासाठी जोरदार प्रयत्न करतो. दोन्ही पक्ष परस्परांचे मोल देऊनच यशस्वी होऊ शकतात.

श्रम आणि भांडवल यांमधील सहिष्णुतेच्या सर्व बाता म्हणजे निव्वळ फसवणूक आहे. भांडवलदारी समाजात कसलीही सहिष्णुता असू शकत नाही, कारण जी गोष्ट एका वर्गाच्या फायद्याची आहे ती दुसऱ्या वर्गासाठी नुकसानीची आहे.

गळ्याशी चाकूचा जो संबंध असतो, तोच संबंध भांडवलदारी समाजात उत्पादनाच्या सांधनांचे मालक (भांडवलदार) आणि श्रमिक यांच्यामध्ये असणे बंधनकारकच आहे.

### २.अतिरिक्त मूल्य

भांडवलदारी समाजामध्ये व्यक्ती वस्तूंचे उत्पादन आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी करीत नाही तर वस्तू इतरांना विकण्यासाठी त्यांचे उत्पादन करते. पूर्वी लोक स्वतःच्या वापरासाठी वस्तूंचे उत्पादन करायचे, आता बाजारात विकण्यासाठी वस्तूंचे उत्पादन केले जाते.

भांडवली व्यवस्थेला मालाच्या उत्पादनाची आणि वितरणाची चिंता असते.

श्रमिक उत्पादन साधनांचे मालक नसतात. ते फक्त एका मार्गाने आपली उपजीविका प्राप्त करू शकतात – मजुरीसाठी स्वतःला अशा व्यक्तीकडे गहाण ठेवून जी त्यांना विकत घेऊ शकते. ते एकच माल बाजारात आणून विकतात, तो म्हणजे त्यांची काम करण्याची क्षमता म्हणजेच श्रमशक्ती. हीच गोष्ट ग्राहक त्यांच्याकडून विकत घेतो. यासाठीच तो त्याला मजुरी देतो. श्रमिक आपल्या मालकाकडून मिळणाऱ्या मजुरीसाठी आपला माल, म्हणजेच आपली श्रमशक्ती विकतो.

तो किती मजुरी मिळवणार? आणि या मजुरीचा दर कोणती गोष्ट ठरवते?

श्रमिक जी वस्तु विकतो (म्हणजेच त्याची श्रमशक्ती) तोसुद्धा एक माल आहे, या सत्यामध्ये वरील प्रश्नाचे उत्तर दडलेले आहे. कोणत्याही अन्य मालाप्रमाणे, श्रमशक्तीचे मूल्यसुद्धा तिच्या उत्पादनात खर्ची पडलेल्या सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकालाच्या प्रमाणावरून निर्धारित होते. श्रमिकाच्या श्रमशक्तीचे मूल्य त्याला जिवंत राहण्यापुरते आवश्यक अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याच्या बरोबर असते. (त्याचप्रमाणे, ते त्याच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठीसुद्धा पुरेसे असावे लागते, कारण श्रमाचा नियमित पुरवठा होणे आवश्यक आहे.)

दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास, जर कोणा फॅक्टरी, गिरणी किंवा खाणमालकाला ८० तास श्रमकाळ हवा असेल तर जो कुणी हे करू शकतो किंवा करतो त्याला एवढी मजुरी देणे आवश्यक आहे की तो स्वतः जिवंत राहू शकेल तसेच त्याच्या म्हातारपणी अथवा मृत्यूनंतर त्याची जागा घेण्याकरिता त्याच्या मुलाला लहानाचा मोठा करू शकेल.

आपल्या श्रमशक्तीच्या मोबदल्यात कामगार जिवंत राहण्यापुरती मजुरी मिळवतो. काही देशांमध्ये तर ती इतकी कमी असते की तो एखादा टेप रेकॉर्डर किंवा फ्रिजसुद्धा विकत घेऊ शकत नाही, किंवा एखाद दिवशी सिनेमाचे तिकीट विकत घेणेसुद्धा त्याला परवडत नाही.

जे आर्थिक नियम कष्टकऱ्यांची मजुरी जेमतेम त्यांच्या उदरनिर्वाहापुरती मर्यादित करून ठेवतात, त्यांचा अर्थ असा समजायचा का की कष्टकऱ्यांच्या राजकीय संघटना आणि ट्रेड युनियम निरुपयोगी आहेत? नाही, असे नक्कीच नाही. आपल्या युनियनच्या माध्यमातून श्रमिक आपली मजुरी उदरनिर्वाहाच्या स्तराहून अधिक वाढवून घेऊ शकतात. काही देशांमध्ये हे शक्य झाले आहे. त्यात अमेरिका देशाचाही समावेश होतो. आणि हा असा एकमेव उपाय आहे ज्याद्वारे श्रमिक त्या आर्थिक नियमाला नेहमी कार्यशील ठेवू शकतात, हे लक्षात ठेवले पाहिजे.

#### नफा कुठून येतो?

मालाच्या वितरणाच्या प्रक्रियेत नफा निर्माण होत नाही, तर वास्तविक आपल्याला उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये या प्रश्नाचे उत्तर मिळू शकते. उत्पादनाच्या प्रक्रियेमध्येच नफा निर्माण होतो, व तो भांडवलदार वर्गाकडे जातो.

श्रमिक कच्च्या मालाला तयार मालामध्ये बदलून त्याचे रूपांतर एका नवीन संपदेमध्ये करतात. त्यातून एक नवीन मूल्य तयार होते. श्रमिकाला मजुरीच्या रूपात दिली गेलेली रक्कम आणि कच्च्या मालात जोडले गेलेले अधिकचे मूल्य, या दोन्हींमधील फरक मालक आपल्याकडे ठेवतो. यातूनच त्याचा नफा येतो.

श्रमिक ज्यावेळी स्वतःला एखाद्या मालकाकडे गहाण ठेवतो त्यावेळी जी वस्तू तो निर्माण करतो ती वस्तू तो विकत नाही, तर तो आपली उत्पादनाची क्षमता (मालकाला) विकतो. मालक श्रमिकाला आठ तासांत त्याने तयार केलेल्या मालासाठी मजुरी देत नाही तर त्याच्या आठ तासांच्या श्रमासाठी पैसे देतो.

श्रमिक संपूर्ण दिवसासाठी (म्हणजे आठ तासांसाठी) आपली श्रमशक्ती विकतो.

समजा, श्रमिकाला मिळणाऱ्या मजुरीच्या मूल्याएवढे उत्पादन करण्यासाठी लागणारा वेळ ४ तास आहे. तरी, ४ तासांनंतर तो काम बंद करून घरी जात नाही. अजिबात नाही. कारण त्याला ८ तास काम करण्यासाठी विकत घेतले गेले आहे. त्यामुळे तो राहिलेले चार तास काम सुरूच ठेवतो. हे चार तास तो स्वतःसाठी नाही तर मालकासाठी काम करतो. त्याच्या श्रमाच्या एका भागासाठी त्याला मोबदला दिला जातो. दुसऱ्या भागासाठी दिला जात नाही. आणि मालकाचा नफा याच मोबदला न दिल्या गेलेल्या श्रमामधून येत असतो.

श्रमिकाला दिला गेलेला मोबदला आणि त्याच्या द्वारे उत्पादित मूल्य यामध्ये फरक असणे आवश्यक आहे. नाहीतर मालक त्याला विकत घेणार नाही. श्रमिकाला दिला जाणार मोबदला आणि त्याच्या द्वारे उत्पादित मालाचे मूल्य यांमधील जो फरक आहे, त्याला अतिरिक्त मूल्य असे म्हणतात.

अतिरिक्त मूल्यच तो नफा आहे जो मालकाकडे जातो. तो श्रमशक्तीला एका विशिष्ट किंमतीला विकत घेतो आणि श्रमाने केलेले उत्पादन त्याहून जास्त किंमतीला विकतो. याच फरकाला, म्हणजे अतिरिक्त मूल्याला तो आपल्यापाशी ठेवतो.

.....उर्वरीत पुढील अंकात

अनुवाद - पुष्कर सराड

●

# कोळी आणि माशी

विल्हेल्म लाइबनिख्ट



**विल्हेल्म लाइबनिख्ट (29 मार्च 1826 - 7 ऑगस्ट 1900) हा जर्मन कामगारांचा एक प्रख्यात नेता होता. आयुष्यभर त्याने कामगार वर्गाच्या लढ्यासाठी व क्रांतिसाठी तनमनधन अर्पण करून कार्य केले. हे पत्रक १८८१ साली त्यांनी कामगारांना भांडवलशाही सत्ता उपटून फेकण्याचे आवाहन करण्यासाठी लिहिले. भांडवलदार वर्ग कामगार वर्गाचे शोषण कशा प्रकारे करतो, व याच्या विरोधात लढण्याचा मार्ग कामगारांची एकता हाच आहे, हे त्यांनी या पत्रकाद्वारे दाखवून दिले आहे. जगभरातील कामगारांमध्ये हे पत्रक आजही लोकप्रिय आहे.**

तुम्ही त्याला ओळखता! चिकट, केसाळ अंगाचा तो ढेरपोट्या किडा. उजेडापासून शक्य तितक्या दूर अंधाऱ्या जागी दबा धरून बसणारा, आणि आपलं भयानक जाळं विणत बसणारा. याच जाळ्यात बिचारी निष्काळजी आणि अडाणी माशी पकडली जाते आणि प्राणाला मुकते. तो विद्रूप किडा तुमच्या माहितीचा आहे. त्याचे बटबटीत कवडयांसारखे डोळे आणि शिकार पकडून तिचा गळा दाबण्यासाठी उपयोगी पडणाऱ्या वेड्यावाकड्या वाळकुडया तंगड्या - त्याही तुम्ही पाहिल्या आहेत. हा किडा म्हणजे आपला कोळी!

तो बघा, तिथं कोपऱ्यात शांतपणे बकध्यान करत तो पडून आहे. भक्ष्य तावडीत सापडण्याची वाट पहात. कधी कधी तो तुम्हाला दिसेल तो एखाद्या दुबळ्या माशीला जाळ्यात अडकवून टाकण्यासाठी निर्दयपणे आपल्या सापळयाचे धागे वरखाली करत असताना. हा हावरा कीटक फार डोकं वापरून आपलं जाळ विणतो. पहिल्यांदा एक धागा, मग दोन आणि तीन-असे अनेक धागे तो गुंफतो. आडवे उभे धागे बांधतो. आणि जाळं असं काही पक्क बनवतो की माशीनं जिवाच्या आकांताने केलेल्या धडपडीनेसुद्धा ते तुटत तर नाहीच, पण नुसतं थरथरत सुद्धा नाही!

अन अखेर जाळं तयार होतं. सापळा लावला जातो. आता त्यातून सुटका नसते. कोळी आपल्या लपायच्या जागी परत जातो आणि भुकेने तडफडणारी एखादी साधीभोळी माशी अन्नाच्या शोधात येऊन जाळयात सापडण्याची वाट बघत राहतो.

माशी येण्यासाठी त्याला फार वाट पहावी लागत नाही. अन्नातचा कण शोधणारी ती बिचारी डकडे तिकडे बघत अगदी सहजपणे जाळ्याच्या पसरलेल्या धाग्यांमध्ये बरोबर सापडते. ती घाबरून धडपडते आणि आणखीनच गुंतते. जीव वाचवायला जाळ्यालाच धरू बघते आणि मग संपलंच सगळं!

भक्ष्य पकडलं गेल्याचं दिसलं रे दिसलं की कोळी जागेवरून उठतो. आपली अधाशी नजर माशीवर टाकत आणि हातपायाच्या आकड्या सरसावून हळूहळू पुढे सरकू लागतो. त्याला मुळीच घाई नसते. एकदा जाळ्यात सापडलेली ती दुर्दैवी माशी आता निसटणे शक्यच नाही हे या राक्षसाला पक्के माहीत असते. तो आणखी जवळ येतो. थंडगार बटबटीत डोळ्यांनी भक्ष्याचा अंदाज घेतो. त्या नजरेनंच माशीचं भान सुटतं. अंगावर चालून येणाऱ्या मृत्यूकडे पाहून ती भीतीने थरथर कापू लागते. चिकट धाग्यांमधून स्वतःला सोडवून घ्यायचा आकांताने प्रयत्न करते, आणि तिची पार दमछाक होते.

पण तिचे प्रयत्न फुकट असतात, धडपड वाया जाते. ती जास्तजास्तच जाळ्यात गुंतत जाते आणि कोळी जवळ जवळ येतच असतो. आणखी आणखी धागे तिच्याभोवती वेढले जातात. जाळ्यातून सुटण्याचा जितका प्रयत्न करावा तितकी अधिकच ती जाळ्यामध्ये गुंतत जाते. त्याचे बारीक पण चिवट धागे तिला पुरते अडकवून ठेवतात. अखेर तिला दमछाकीने धाप लागते, आणि सगळा प्रतिकार संपून जातो. आता ती तिच्या शत्रूसमोर, तिला जिंकून घेणाऱ्या त्या राक्षसासमोर असहाय बनलेली असते.

त्यानंतर कोळी आपल्या केसाळ आकड्यांनी माशीला पकडतो आणि मरणमिठीत बंदिस्त करतो. मग तो दुबळ्या भक्ष्याच्या थरथर करणाऱ्या शरीराचे चावे घेऊ लागतो. एकदा, दोनदा - त्याची पाशवी वासना आणि भूक संपेपर्यंत कितीतरी वेळा. जराशी त्याची रक्ताची तहान भागली की माशीला तो अर्धमेले ठेवून दूर जातो. मग तो परत येतो आणि आणखी रक्त शोषतो. ती दुर्दैवी माशी संपेपर्यंत, तिच्या अंगातले सगळे रक्त आणि जीवनरस संपेपर्यंत त्याच्या त्या फेऱ्या चालू रहातात. या हालांमधून तिला सोडवायला मृत्यूला वेळ लागतो. खूप वेळ लागतो.

बिचाऱ्या माशीच्या अंगात थोडीसुद्धा धुगधुगी शिल्लक दिसतीय तोवर हे रक्तपिपासू पिशाच्च तिची पाठ सोडत नाही. ते तिचा जीव शोषून घेतं, तिची शक्ती खच्ची करतं, तिचं रक्त पितं. आणि शोषून घ्यायला काही, अगदी काही उरलं नाही अशी खात्री पटल्यावरच तिच्यापासून दूर होतं.

शोषलं गेल्यानं शुष्क आणि पिसासारखं हलक बनलेलं माशीचं शरीर मग जाळ्यातून टाकून दिलं जातं. वाऱ्याच्या पहिल्याच झुळूकीसरशी ते कुठल्याकुठं जातं. आणि सगळं शांत होतं.

पण कोळी मात्र तृप्त मनानं आपल्या आरामगृहात जाऊन बसतो. स्वतःच्या पराक्रमावर अन एकंदर जगावर तो खूष असतो. सभ्य अन प्रतिष्ठित लोकांना जगात अजून सुखात रहाता येतं याचं त्याला समाधान वाटत असतं.

तुम्ही, शहरातले व खेड्यांमधले कामगार म्हणजे ही माशी आहात. जिचं शोषण होतं आणि प्राण जातात अशी माशी! जिचं सगळं हडप होतं अन जिचं रक्त पिऊन इतर जगतात. तुम्ही, दडपल्या गेलेल्यांनो, बुद्धिवंतानों, कारखान्यातल्या कामगारांनो, भीतीनं थरथरणाऱ्या तरुण कुमारिकांनो आणि हक्कांसाठी झगडण्याचाही धीर नसणाऱ्या तुडवलेल्या बायकांनो, लष्करी बुटांच्या टाचांखाली बळी जाणाऱ्या दुर्दैवी लोकांनो, थोडक्यात सगळ्या गरीब व पिळल्या जाणाऱ्यांनो, तुम्ही ही माशी आहात! तुमचेही असेच बळी जात असतात. तुमच्या शरीरातला सगळा जीवनरस संपेपर्यंत तुमचं शोषण होतं आणि मग तुम्हाला कस्पटासारखं फेकून देण्यात येतं. देशाची सर्व संपत्ती घाम गाळून निर्माण करणाऱ्यांनो, देशाचं हृदय, मेंदू, जीवनशक्ती असणाऱ्यांनो, आज हुकुमाची तामिली करणं व एखाद्या कोपऱ्यात झिजून झिजून निमूटपणे मरणं याशिवाय दुसरा कोणताही हक्क तुम्हाला नाही. आणि यावेळी तुमचं रक्त, तुमचा घाम, तुमचे श्रम, तुमची बुद्धी, तुमचं सारं जीवनच इतर काहींना मोठं आणि बलवान करण्यासाठी खर्ची पडत आहे. तुमच्या मालकांना व तुम्हाला पिळणाऱ्यांना : या हावरट किळसवाण्या कोळ्यांना.

कोळी म्हणजे साहेब, थैलीशहा, शोषण करणारे, सट्टेबाज, भांडवलदार, धर्मगुरू आणि पुजारी, स्त्रियांना भ्रष्ट करणारे! कोळी म्हणजे ही सगळी तुमच्या जिवावर पोसली जाणारी बांडगुळं, आपल्याला टाचेखाली भरडणारे जुलमी सत्ताधारी, अन्याय व दडपशाही पोसणारे कायदे बनवणारे पंडित, आपल्याला गुलाम करणारे हुकुमशहा, इत्तर माणसांच्या जिवावर जगणारा प्रत्येक जण कोळी आहे. आपल्याला पायदळी तुडवणारा, आपल्या दुःखांकडे व आपल्या धडपडीकडे निर्दयपणे बघणारा कोळी आहे.

माशी म्हणजे कामगार, मालकाच्या मन मानेल तशा अन्यायी कायद्यांपुढे त्याला नमावे लागते, कारण स्वतःचे आणि स्वतःच्या कुटुंबाचे पोट भरण्याकरता बिचाऱ्याकडे दुसरे साधनच नसते. कोळी म्हणजे प्रत्येक कामगाराच्या श्रमावर रोज सहाआठ रूपये कमवणारा अन् तरीही कामगाराला बाराचैदा तासांच्या कामाचे दोनतीन रूपये हातावर टिकवण्याचे धैर्य - नव्हे दयाबुद्धी (!) दाखवणारा बडा कारखानदार.



माशी म्हणजे एखादा खाण कामगार - तो खाणीच्या तळाशी विषारी वायूमध्ये काम करून जमिनीच्या पोटातून संपत्ती बाहेर काढतो, पण स्वतः ती उपभोगत नाही. कोळी म्हणजे कंपनीचा शेअरहोल्डर - त्या शेअर्सची किंमत दुप्पट, तिप्पट होते. पण तरी त्याचे कधी समाधान होत नाही. त्याला अधिकाधिक नफ्याचा भाग हवा असतो. तो कामगारांच्या श्रमाच्या फळांवर दरोडा टाकतो. आणि जर त्यांनी थोडीसुद्धा मजुरीत वाढ मागण्याचे धाडस केले तर तो या 'बंडखोरांना' मृत्यूचे दर्शन घडवण्यासाठी लष्कर बोलवतो.

माशी म्हणजे एखादे लहान मूल - ज्याला कोवळ्या वयापासूनच कारखान्यात किंवा घरी पोटाची खळगी भरण्यासाठी गुलामासारखे राबावे लागते. मात्र या मुलाचे गरीब आईबाप म्हणजे कोळी नव्हेत. कारण गरजेपोटी ते आपल्या मुलाचा असा बळी देत असतात. नैसर्गिक भावनांना असे विकृत रूप येण्याला व माणसांना स्वतःच्या कुटुंबाचा नाश करायला लावायला जबाबदार कोण आहे? तर नरकासमान असणारी परिस्थिती.

माशी म्हणजे सामान्य माणसाची एखादी सत्प्रवृत्त मुलगी. तिला प्रामाणिकपणे जगायची इच्छा असते, पण मालकाच्या आणि मॅनेजरच्या पाशवी वासनांना शरण गेल्याशिवाय तिला काम मिळू शकत नाही. हा मालक तिला वापरतो आणि मग, बहुतेकवेळी तिला दिवस गेल्यावर, क्रूरपणे व निर्दयपणे स्वतःची बदनामी होऊ नये म्हणून तिला फेकून देतो. कोळी म्हणजे तो रंगेल तरुण, 'प्रतिष्ठित' घरामधला तो रिकामटेकडा मवाली. निष्पाप मुलींना तो मजेखातर वाकड्या मार्गाला लावतो आणि त्यांची गटारातून फरफट करतो. किती जास्त बायकांना आपण भ्रष्ट केले आहे यातच त्याला मोठी धन्यता वाटत असते.

तू! नांगर धरणाऱ्या शेतकऱ्या, तू माशी आहेस. श्रीमंत जमीनमालकाकरता तू शेत करतोस. तू पीक पेरतोस पण तुझ्या पदरात ते पडत नाही. तू फळं पिकवतोस पण त्यांची चव तुझ्याकरता नसते. श्रीमंत जमीनदार हा कोळी. तो कुळांना आणि शेतमजुरांना क्षणभरही उसंत घेऊ न देता घाम गाळायला लावतो. आणि त्यावर स्वतः आरामाचे सुखासीन जीवन जगत असतो. कोळी म्हणजे दरवर्षी खंड वाढवणारा आणि प्रामाणिक श्रमांची किंमत कमी करणारा जमीनदार.

माशी म्हणजे आपण सगळे गरीब, साधेभोळे लोक. जे युगानुयुगे देवाच्या कोपाला घाबरत आलो, पुजाऱ्यांच्या पायांचे तीर्थ घेत आलो. धर्म-संस्थानांच्या फायद्याकरता व करमणुकीकरता आपण एकमेकांशी भांडलो व एकमेकांना गुलाम करत आलो. आपण इतके दिवस गुडघे टेकून राहिलो, अन्यायाने मिळवलेली फळं चाखणाऱ्यांपुढे नमलो, कारण आपल्या बुद्धीला धर्माच्या शिकवणीने विष पाजून पांगळे बनवले होते. कोळी म्हणजे ढोंगी व लोभी चेहऱ्याचे हे भगव्या वस्त्रातले धर्मगुरू. साधाभोळ्या माणसांच्या मनात हे आपल्या शिकवणीने गोंधळ माजवतात. सबंध देशाच्या आत्म्याला हे पोखरतात आणि समाजाला रसातळाला पोचवतात.

थोडक्यात, माशी म्हणजे दडपले गेलेले, गुलाम झालेले, पिळले जाणारे. कोळी म्हणजे स्वार्थी शेटजी किंवा जुलमी सत्ताधीश-मग त्यांनी कोणताही बुरखा पांघरलेला असो.

पूर्वी कोळी मोठमोठ्या किल्ल्यांमध्ये व राजवाड्यांमध्ये बसून जाळे विणत असे. आज तो उद्योगधंद्याच्या केंद्रामध्ये, पैश्याचा ओघ वाहणाऱ्या विभागांमध्ये राहाणे जास्त पसंत करतो. बहुतेक वेळा तो तुम्हाला औद्योगिक शहरांमध्ये आढळेल, पण कधी तो लहान शहरांमध्ये वा गावांमध्येही सापडेल. जिथंजिथं पिळवणूक करता येते, जिथं कामगार, कफल्लक मजूर, लहान कारागीर, शेतमजूर आणि कर्जाखाली वाकून गेलेले गरीब शेतकरी भांडवलदारांच्या अनावर लोभापुढे उघडे पडले आहेत तिथंतिथं त्यांचं वास्तव्य असतं.

कुठेही नजर टाका, शहरात असो की खेड्यात, सगळीकडे तुम्हाला गरीब कीटक त्यांच्या शत्रूंच्या जाळ्यांमध्ये व्यर्थ झगडत असतांना दिसतील. तुम्हाला हे हळूहळू थकून जातांना दिसतील. शेवटी शुष्क होऊन मरताना दिसतील.

दुबळ्या भित्रट माशा आणि क्रूर रक्तपिपासू कोळ्यांमध्ये ही लढाई गेली शेकडो वर्षे चालू आहे. केवढी प्रचंड दुःखानी भरलेली ही गाथा आहे! यातनांची ही एक राक्षसी कहाणी आहे. मग ती परतपरत कशाला सांगायची? झालं गेलं होऊन गेलं, आपण आता सध्याच्या व पुढे येणाऱ्या काळाविषयी बोललं पाहिजे.

आपण माशी व कोळी यांच्यात आज चालू असलेल्या संघर्षाकडे जरा बारकाईने पाहूया. परिस्थिती कशी आहे हे यथार्थपणे कळून घेऊया. आपण सगळ्या माशांनी आपल्या शत्रूंनी लावलेल्या सापळ्याची नेमकी माहिती करून घ्यायला पाहिजे. त्यांच्या फसव्या युक्त्या-प्रयुक्त्यांचे खरे स्वरूप ध्यानात घ्यायला पाहिजे. आणि सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे आपण एकजूट करू या. आपल्याला अडकवणारे जाळे तोडणे एकट्याला जमणार नाही. आपली एकजूट हेच आपले बळ आहे. आपल्याला बंधनांमध्ये ठेवणाऱ्या साखळ्या आपण तोडून टाकू, आपल्या शत्रूंना त्यांच्या लपण्याच्या जागांतून हुसकावून लावू, ज्ञानाचा प्रकाश आपण सगळीकडे पसरवू. म्हणजे मग त्या धूर्त, पापी प्राण्याला कारस्थाने रचण्याकरता कधीही कुठे अंधारी जागा शिल्लक रहाणार नाही.

तुम्हा माशांना जर हे करायची इच्छा असेल, खरोखरीची इच्छा असेल, तर तुमचा विजय होणारच! हे खरं आहे की आज कोळ्याची ताकद जास्त आहे. पण ते मूठभर आहेत. तुम्ही जरी दुबळे आणि एकट्याने काही करायला असमर्थ असला तरी तुम्ही संख्येने अगणित आहात. तुम्हीच जीवनाचा आधार आहात, हे जग तुमचे आहे - जर तुम्हाला खरोखरच नवं जीवन जगण्याची इच्छा असेल तर. जर तुम्ही फक्त एकत्र आलात तर पंखांच्या एका फटकाऱ्यातच तुम्ही सगळे धागे तोडून टाकाल, तुम्हाला आज गुलाम करणारी, भुकेने तडफडवून तुमचा जीव घेणारी सगळी जाळी तुम्ही नष्ट कराल. गरीबी व गुलामगिरी तुम्ही कायमची नष्ट कराल - जर तुम्हाला हे करायची इच्छा असेल तर.

म्हणून खूप मोठ्या इच्छा करायला शिका!

●

## याकूबच्या फाशीचा अंधराष्ट्रवादी गदारोळ

# जनतेच्या मूळ मुद्द्यांवरून लक्ष विचलित करण्याचे षडयंत्र

३० जुलै रोजी नागपूर कारागृहात याकूब मेमनला फाशी देण्यात आली. याकुबला दिली गेलेली फाशीची शिक्षा बराच काळ चर्चेचा विषय ठरली आणि पुढेही बराच काळ यावर उलटसुलट चर्चा होत राहील. बहुसंख्य जनता ह्या फाशीवर आनंद व्यक्त करत आहे तर दुसरीकडे मुसलमान समाजाचा मोठा भाग ह्या फाशीमुळे नाराज आहे. याकूबला दिली गेलेली फाशी न्यायाच्या दृष्टीकोनातून योग्य होती किंवा नाही, हा मुद्दा धर्मांध प्रतिक्रिया आणि राष्ट्रवादी लाटेत निर्माण झालेल्या ‘आतंकवादावरील विजया’च्या उन्मादामध्ये दबला गेला आहे. याकूब गुन्हेगार होता, यात शंकाच नाही. त्यामुळे त्याला शिक्षा व्हायलाच हवी होती, हेदेखील ओघानेच आले. परंतु शिक्षेचे स्वरूप काय असावे, हा न्यायदानाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे, आणि न्यायाच्या दृष्टीने विचार करता याकूबवर अन्याय झाला, असे निःसंदिग्धपणे म्हणावे लागेल.

पहिली गोष्ट म्हणजे याकूब १९९३ च्या मुंबई बॉंब स्फोटातील मुख्य आरोपी नव्हता. मुख्य आरोपी दाऊद इब्राहिम आणि याकूब मेमनचा भाऊ टाइगर मेमन हे होते. आजपर्यंत ह्या दोघांना अटक झालेली नाही. याकूबचा मुख्य गुन्हा ‘अबेटिंग’ म्हणजेच गुन्ह्यात साहाय्य करणे हा होता. याकूबच्या विरोधात जे पुरावे उपलब्ध होते, जवळपास तसेच पुरावे ह्या कटातील संजय दत्त व इतर अनेक आरोपींच्या विरोधातही उपलब्ध होते. त्यांना फाशीची शिक्षा देण्यात आलेली नाही. दुसरी गोष्ट, ज्या बॉंबस्फोटाचा कट रचण्याच्या आरोपावरून त्याला फाशीवर लटकवण्यात आले, त्यासंबंधात त्याच्या विरोधात एकही पुरावा उपलब्ध नव्हता. जो एकमेव पुरावा उपलब्ध होता, तो होता याकुबचा कबुलीजबाब! पोलीस कोठडीत कबुलीजबाब कसे घेतले जातात हे सर्वांनाच बऱ्यापैकी माहीत आहे! तिसरी आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे ज्या प्रकारे याकूबने आत्मसमर्पण केले आणि ह्या संपूर्ण प्रकरणात पोलिस व सरकारशी सहकार्य केले, ते बघता त्याला फाशीची शिक्षा देणे निश्चितपणे अन्यायकारक होते. याकूबच्या अकटकेचे एकूण प्रकरण हाताळणारे ‘रिसर्च एण्ड ॲसनालिसिस विंग’चे बी. रमन म्हणतात की याकुबला ऑगस्ट १९९४ ला दिल्लीतून अटक केल्याचा पोलिसांचा दावा चुकीचा आहे, याकूबने जुलै १९९४ मध्येच आत्मसमर्पण केले होते. त्याने आत्मसमर्पण करून सरकार व तपास यत्रणांना ह्या प्रकरणी सहकार्य केले तर त्याला फाशी दिली जाणार नाही, असा भरवसा त्याला भारतीय इंटेलिजन्सने दिलेला होता. याकूबने सरकार व पोलिसांना सर्वतोपरी मदत व सहकार्य केले. त्याने मोठ्या प्रमाणात वीडियो, छायाचित्रे व अन्य पुरावे उपलब्ध करून दिले. आपल्या घरातील अन्य ६ सदस्यांनासुद्धा त्याने आत्मसमर्पणासाठी तयार केले. आत्मसमर्पण केल्यानंतर अशा प्रकारे तपासात सहकार्य करणे आणि स्फोटांतील मुख्य आरोपी नसणे, हे त्याला देण्यात आलेली फाशीची शिक्षा चुकीची ठरवण्यासाठी पुरेसे आहेत. दाऊद आणि टाइगर मेमनला पकडण्यात अपयशी ठरलेल्या सरकारने व पोलिसांनी एक प्रकारे याकूबलाच मुख्य आरोपी बनवून फाशी दिली. याकूब गुन्हेगार होता यात काहीच शंका नाही. परंतु त्याच्या गुन्ह्याचे स्वरूप व नायालयाच्या प्रक्रियेतील वर्तन पाहता असे म्हटले जाऊ शकते की त्याला फाशी देणे न्यायोचित नव्हते. मोठ्या संख्येने लोकांनी ह्या फाशीवर आनंद व्यक्त केलेला आहे, मिठाई वाटलेली आहे, फटाके फोडून जल्लोष केलेला आहे. पण त्याला फाशी देणे हा अन्याय होता, हे सत्य आहे, आणि ते प्रांजळपणे स्वीकारावे लागेल!

इतक्या निर्लज्जपणे याकुबला फाशी देण्यामागचे शासक वर्गाचे राजकारण समजून घेतल्याशिवाय हे प्रकरण समजून घेता येणार नाही. याकूबला फाशी देण्यामागचा सत्ताधाऱ्यांचा हेतू आता बऱ्यापैकी साध्य होताना दिसत आहे. महागाई, बेकारी, जनतेवर करावयाच्या खर्चातील कपात हे मुद्दे विसरून आता बहुसंख्य जनता सरकार आणि न्यायव्यवस्थेच्या कौतुकात आकंठ बुडाली आहे. ह्या मुद्द्यावरून होणारे सांप्रदायिक धृवीकरण पाहता सरकार पुन्हा एकदा ‘फुट पाडा आणि राज्य करा’ची रणनीती अत्यंत कुशलपुर्वक लागू करण्यात यशस्वी ठरत आहे, असेच म्हणावे लागेल. ह्या मुद्द्याला धार्मिक रंग देण्यात सरकारने कोणतीही कसर बाकी ठेवलेली नाही. ह्या फाशीमागची सामाजिक-राजकीय कारणे आणि ह्यावर व्यक्त झालेल्या विविध प्रतिक्रियांच्या मागची कारणे समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे.

हे फाशीचे प्रकरण म्हणजे आर्थिक संकटाच्या काळात राज्यकर्ते किती कुशलतेने आपले वर्चस्व कायम ठेऊ शकतात, त्याचा अगदी उत्तम नमुना होय. मिडिया व अन्य माध्यमांद्वारे पूर्वग्रह निर्माण करून जनतेच्या जाणिवा शासकक वर्ग कशा प्रकारे नियंत्रित करतो, ते ह्या प्रकरणाने पुन्हा एकदा दाखवून दिले. सर्वप्रथम राज्यकर्ते जनतेमध्ये धर्मांध भावना आणि बेगडी राष्ट्रवादी उन्माद निर्माण करतात आणि त्यानंतर गरज पडेल तेव्हा त्याची लाट निर्माण करून जनतेच्या जगण्या-मरण्याशी संबंधित प्रश्न बाजूला सारतात. सत्तेत कॉंग्रेस असो वा भाजप, किंवा अन्य कुणाचेही सरकार असो, ही गोष्ट सर्वांना सारखीच लागू पडते. जगण्याच्या शोचनीय परिस्थितीमुळे बहुसंख्य जनतेमध्ये शासक वर्गाविरुद्ध प्रचंड असंतोष असतो. ह्या असंतोषावर नियंत्रण मिळवण्यासाठीच राज्यकर्ते विविध उपाय योजीत असतात. सततच्या प्रचाराच्या माध्यमांद्वारे राज्यकर्ते अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने जनमानसात एक फसवी राष्ट्रवादी जाणीव निर्माण करतात. गरिबी, बेकारी, महागाईने त्रस्त झालेली जनतेमध्ये ज्यावेळी सरकार व व्यवस्थेच्या विरोधात असंतोष निर्माण होतो त्यावेळी राज्यकर्ते त्यांचे लक्ष ह्या मुद्द्यांवरून इतरत्र वळवण्यासाठी विविध सांस्कृतिक-राजकीय माध्यमांतून त्यांना नाना प्रकारच्या खोट्या गोष्टी सांगतात. दहशतवाद, पाकिस्तान, चिन यांपासूनन सगळ्यात मोठा धोका आहे, अशा प्रकारच्या गोष्टी लोकांना सांगितल्या जातात. या सगळ्याचे सार म्हणजे सर्वात आधी आपला देश आहे! अशा वेळी जर एखादा दहशतवादी हल्ला झाला तर तो राज्यकर्त्यां साठी संजीवनीचे काम करतो. राज्यकर्ते जनतेचे संपूर्ण लक्ष ह्या मुद्द्याकडे वळवतात आणि दहशतवाद ही देशासमोरील सर्वात मोठी समस्या आहे, हे जनतेच्या मनावर बिंबवण्यात यशस्वी होतात. दुसऱ्या कुणी असे हल्ले केले नाहीत तर राज्यकर्ते स्वतःसुद्धा असे हल्ले घडवून आणण्यास मागेपुढे पाहत नाहीत याची इतिहासात बरीच उदाहरणे आहेत. देशात गरिबी, भूकबळी, कुपोषण इत्यादी कारणांमुळे, अत्यंत खराब आरोग्य सुविधांमुळे, कारखान्यांतील भयंकर परिस्थितीमुळे दररोज कित्येक लोक आपले जीव गमावतात. ही संख्या दर दिवशी हजारांमध्ये असते. पण तरीही दहशतवाद ही सर्वात मोठी समस्या असल्याचे सांगितले जाते. खऱ्या मुद्द्यांवरून जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी दहशतवादाचे बुजगावणे उभे करणे राज्यकर्त्यां च्या फायद्याचे असते. हा तथाकथित दहशतवाद जर आजच संपवण्यात आला तर राज्यकर्त्यां च्या पायाखालची जमीन सरकेल, असे म्हटल्यास त्यात कोणतीच अतिशयोक्ती होणार नाही!

आज राज्यकर्त्यां ना त्यांची सत्ता कायम राखण्यासाठी धार्मिक उन्मादाची सुद्धा तेवढीच गरज आहे. जनता हिंदू-मुस्लिम यांसारख्या गटांमध्ये विभागली गेली की राज्यकर्त्यां चे फावते. भारतातील राज्यकर्ते ही गोष्ट पुरेपूर जाणतात. मागील कित्येक वर्षापासून धार्मिक कट्टरतावाद्यांना इतकी सूट देण्यात आली आहे ती यासाठीच की त्यांनी जनतेमध्ये धार्मिक उन्मादाचे विष कालवत राहावे. संघ व अन्य हिंदुत्त्ववादी संघटनांनी बऱ्याच काळापासून धार्मिक अल्पसंख्यांकांच्या विरोधात चालवलेल्या प्रचारामुळे समाजात विविध धर्मांच्या लोकांमध्ये फूट पडल्याचे स्पष्टपणे दिसून येते. मग याची प्रतिक्रिया दुसऱ्या बाजूनेसुद्धा उमटू लागते. अनेक कट्टरतावादी मुसलमान संघटनासुद्धा अस्तित्वात आल्या आहेत, आणि त्यामुळे सामाजिक दुफळी वाढत चालली आहे. हिंदुत्ववाद्यांनी बहुसंख्य हिंदू जनतेमध्ये मुसलमानांच्या विरोधात भयंकर पूर्वग्रह निर्माण केले आहेत. मुसलमान हे सामान्यतः देशद्रोही आणि दहशतवादी असतात, अशी धारण बनवण्यात आली आहे. दुसरीकडे सामान्य मुसलमानांध्ये धार्मिक रुढीप्रियता वाढलेली आहे. (अर्थातच, समाजातील अल्पसंख्यांक समुदाय असणे हे यामागचे एक कारण आहेच). मुसलमान समाजाचा एक मोठा भाग याकूबला पूर्णपणे निर्दोष सिद्ध करण्याची खटपट करण्यात गुंतला आहे, याची कारणे या सांप्रदायिक दुफळीमध्येच आहेत. याकूबला मुसलमान जनतेकडून मिळत असलेली सहानुभूती ही हिंदुत्ववाद्यांच्या धर्मांध राजकारणाचाच परिणाम आहे. डिसेंबर १९९२ मध्ये बाबरी मशीद पाडल्यानंतर देशभरात व मुंबईमध्येसुद्धा दंगल भडकली होती. त्यात मारले गेलेले बहुतेक मुसलमान होते. ह्या नरसंहारामुळे त्यांच्या मनात बहुसंख्य हिंदूंबद्दल प्रचंड तिरस्काराची भावना निर्माण झाली. मार्च, १९९३ मध्ये जेव्हा मुंबईमध्ये साखळी बॉम्बस्फोट झाले तेव्हा त्या घटनेला एका सूडाच्या रुपात पाहिले गेले. अर्थात, ते खरेसुद्धा होते. दाऊदला मुसलमानांकडून मिळालेल्या समर्थनाचे कारणसुद्धा हेच होते. त्याला ‘धर्माचा बदला घेणाऱ्या’च्या रूपात बघितले जाते. बऱ्याच मुसलमानांना याकूबबद्दल सॉफ्ट कॉर्नर होता तोसुद्धा यामुळेच. बाबरी मशीदीचे पतन आणि त्याची प्रतिक्रिया म्हणून देशभरात झालेल्या दंगली म्हणजे हिंदुत्ववाद्यांच्या धर्मांध राजकारणाचा परिणाम होता. हिंदुत्वाद्यांनी पहिल्यांदाच संपूर्ण समाजाचे धार्मिक धृवीकरण करण्यात यश मिळवले, ते याच काळात. १९४७ नंतर हिंदू व मुस्लिमांमधील परस्पर तिरस्काराची भावना कधीच इतकी टोकाला गेलेली नव्हती. जनतेत फूट पाडण्याच्या धार्मिक राजकारणाच हा एक अभूतपूर्व आणि कुशल प्रयोग होता. आज याकूबला फाशी दिल्यानंतर त्याविरोधात उमटलेल्या प्रतिक्रियांचे धार्मिक चारित्र्य आपण ह्या राजकारणाच्या पार्श्वतभूमीवरच समजून घेऊ शकतो.

याकूबला इतक्या घाई-घाईत फाशी देण्याचे कारण काय? कारण आपल्या समोर आहे. बहुसंख्य जनतेच्या ‘आंतरिक समाधाना’साठी याकूबला बळी देण्यात आले. बहुसंख्य जनतेचे ह्या फाशीमुळे आंतरिक समाधान कसे होते? राज्यकर्ते आपले हित जपण्यासाठी, सत्ता कायम ठेवण्यासाठी जनतेचे लक्ष तिच्या जगण्याच्या शोचनीय परिस्थितींच्या खऱ्या कारणांपासून विचलित करण्यासाठी धर्मांध राजकारणाचा आधार घेतात आणि एका बेगडी राष्ट्रवादी भावनेला जन्म देतात, याकूबच्या फाशीसारख्या मुद्द्यांच्या आधारे अंध-राष्ट्रवादी लाट निर्माण करतात आणि एका विशिष्ट धर्माच्या लोकांना लक्ष्य बनवण्यात येते. धार्मिक अल्पसंख्याकांना विशेषत्त्वाने लक्ष्य बनवण्यात येते. त्यामुळे बहुसंख्य लोकांच्या अंध-राष्ट्रवादी भावनेला धर्मांधतेचा तडका लावून खोट्या जाणिवांनी व्यापलेल्या त्यांच्या अंतर्मनाच्या समाधानासोबतच समाजामध्ये धार्मिक आधारावर फूट पाडता येते. ‘देशाच्या सामूहिक अंतःकरणाच्या तुष्टीकरणा’चे बळी खरे गुन्हेगार असू शकतात किंवा मग निरपराधसुद्धा! एकाच प्रकारच्या गुन्ह्यांसाठी धार्मिक आधारावर वेग-वेगळ्या शिक्षा देणे, यावरुनसुद्धा हेच दिसून येते की ह्या व्यवस्थेमध्ये न्याय गुन्ह्याच्या स्वरूपानुसार दिला जात नाही, तर राज्यकर्त्यांचे हित बघून दिला जातो. माया कोडनानी आणि बाबू बजरंगीसारख्या नराधमांना सूट देणे आणि कुठल्याही पुराव्याशिवाय अफजल गुरुसारख्यांना गैर-लोकशाही पद्धतीने फाशी देणे न्यायव्यवस्थेवर प्रश्न चिन्ह उपस्थित करते. पूर्णपणे नग्न झालेल्या न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास पुनर्स्थाशपित करण्यासाठीसुद्धा राज्यकर्त्यां साठी याकूबला फाशी देणे गरजेचे बनले होते. पण याकूबच्या फाशीने न्यायव्यवस्थेला अधिकच नागडे करत आहे. आतंकवादाचे बुजगावणे उभे करून राज्यकर्ते सर्व प्रकारच्या आतंकवादाचा जनक असलेल्या राजकीय आतंकवादावर अत्यंत हुशारीने पडदा टाकण्याचे काम करतात. याकूब आणि अफज़ल गुरू सारख्या ‘आतंकवाद्यां’ना राज्यकर्ते फाशी देतात पण दहशतवाद समूळ नष्ट करण्याचा एकमेव मार्ग आहे म्हणजे सर्व प्रकारच्या आतंकवादाचा जनक असलेला राज्यकर्त्यां चा दहशतवाद - म्हणजेच राजकीय दहशतवाद - मुळापासून नष्ट करणे. ह्या राजकीय आतंकवादाच्या सूत्रधार गुन्हेगारांचा निवाडा कधी होईल, हा खरा प्रश्न आहे? ह्या गुन्हेगारांसाठी फाशीचा दोर कधी तयार होईल?

**मनोज भुजबल**

---

**“ज्या पृथ्वीवर प्रत्येक पुढच्या मिनीटाला एक बालक भूखेने वा आजाराने मरते, तेथे सत्ताधाऱ्यांच्या वर्गांच्या दृष्टिने सर्व बाबी समजून घेण्याची सवय लावली जाते- लोकांनी ही परिस्थिति म्हणजे एक नैसर्गिक व स्वाभाविक परिस्थिति आहे असे समजावे म्हणून त्यांना त्याप्रमाणे विचार करण्यास शिकविले जाते- लोकानां असे वाटते की ही व्यवस्था म्हणजेच देशभक्ति आहे व म्हणून जो कोणी या व्यवस्थेस विरोध करेल त्यास देशद्रोही व परकीयांचा दलाल समजण्यांत येते- जंगली कायद्यांस पवित्र स्वरूप देण्यांत येते व याद्वारे पराभूत झालेली माणसे स्वतःच्या परिस्थितीस नियती समजू लागतात”**

**एदुआर्दो गालियानो (अर्जेंटीनाचे प्रसिद्ध लेखक)**

# धर्मांध दंगली व त्यावरील उपाय

## शहीद भगतसिंग यांच्या जन्मदिवसाच्या (28 सप्टेंबर) निमित्ताने त्यांचाच एक अत्यंत महत्वाचा व प्रासंगिक लेख

**जालियनवाला बागेतील १९१९ च्या हत्याकांडानंतर ब्रिटिश सरकारने धर्मांध दंगलींचा खूप प्रचार सुरू केला. त्यामुळे १९२४ ला कोहाटमध्ये भयानक हिंदू-मुस्लीम दंगली झाल्या. यानंतरच्या काळात राष्ट्रीय-राजकीय विचारात दंगलीवर प्रदीर्घ चर्चा झाल्या. हे दंगे संपुष्टात आणण्याची गरज सर्वांनाच वाटली; पण काँग्रेस नेत्यांनी हिंदू-मुसलमान नेत्यांमध्ये तह करून त्याद्वारे दंगली थांबवण्याचे प्रयत्न केले. क्रांतिकारी चळवळीने ही समस्या कायमस्वरूपी नष्ट करण्यासाठी आपले विचार पुढे ठेवले. भगतसिंहांनी या संदर्भात लिहिलेला हा लेख जून, १९२८ मध्ये 'किरती'च्या अंकात प्रसिद्ध झाला होता.**

भारताची स्थिती आज अत्यंत दयनीय बनली आहे. एका धर्माचे अनुयायी दुसऱ्या धर्माच्या अनुयायांचे कट्टर शत्रू बनले आहेत. आता तर एका धर्माचे असणे म्हणजे दुसऱ्या धर्माचे हाडवैरी असणे असेच होऊन बसले आहे. यावर अजून विश्वास बसत नसेल तर लाहोरमधील ताज्या दंगलीकडे पाहा. या दंगलीत कशाप्रकारे मुसलमानांनी निर्दोष शिखांची आणि हिंदूंची हत्या केली, आणि शिखांनीही कशाप्रकारे संधी मिळताच कसलीच कसर सोडली नाही ते पाहा. अमूक व्यक्ती दोषी आहे म्हणून ही कापाकापी केली गेली नाही, तर अमूक व्यक्ती हिंदू आहे, शीख आहे, वा मुसलमान आहे म्हणून ती केली गेली. एखाद्या व्यक्तीला मारण्यासाठी ती व्यक्ती फक्त शीख अथवा हिंदू असणे हे मुसलमानांना पुरेसे होते. अशाच प्रकारे एखादी व्यक्ती मुसलमान असणे हेच त्याचा जीव घेण्यासाठी पुरेसे कारण होते. स्थिती जर अशी असेल तर हिंदुस्थानला ईश्वरच तारू शकेल.

**अशा परिस्थितीत हिंदुस्थानचे भविष्य अत्यंत अंधःकारमय झाले आहे. या 'धर्मांनी' हिंदुस्थानला संकटाच्या खाईत लोटले आहे. या धर्मांध दंगली भारताची पाठ कधी सोडतील, हे आज सांगता येणे कठीण आहे.** जगाच्या नजरेत या दंगलींनी भारताला बदनाम केले आहे. या अंधविश्वासाच्या प्रवाहात सर्वजण वाहत चालल्याचे चित्रच आपल्याला दिसत आहे. थंड डोक्याने विचार करणारा हिंदू-मुसलमान अथवा शीख आज अपवादानेच दिसतो. बाकी सगळे हातात लाठ्या-काठ्या, तलवारी व सुरे घेऊन परस्परांची डोकी फोडून मरून जात आहेत. यातून वाचणारे काही फासावर जातात, तर बाकीच्यांना तुरुंगात डांबले जाते. एवढा रक्तपात झाल्यानंतर या 'धार्मिक' लोकांवर इंग्रज सरकारचा बडगा बसतो आणि मग त्यांच्या डोक्यातील किडा वळवळायचा थांबतो.

**असे दिसते की, या दंगलींच्या पाठीमागे धर्मांध नेते आणि वर्तमानपत्रे यांचा हात आहे. आज हिंदुस्थानामधील नेत्यांनी अशी काही घाण केली आहे, की त्याविषयी न बोललेलेच बरे!** ज्या नेत्यांनी भारताला स्वतंत्र करण्याचा विडा उचलला होता आणि जे 'समान राष्ट्रीयता' आणि 'स्वराज्य-स्वराज्य' म्हणून बढाया मारताना थकत नव्हते; ते एक तर आज घरात तोंड लपवून बसले आहेत किंवा धर्मांधतेच्या प्रवाहात वाहवत चालले आहेत. घरात तोंड लपवून बसणाऱ्यांची संख्यादेखील काय कमी आहे? पण धर्मांध आंदोलनांमध्ये जाऊन सामील झालेल्या नेत्यांसारखे नेते तर जराही जमीन उकरली तरी शेकड्यांनी बाहेर येतात. मनापासून ज्यांना भले व्हावेसे वाटते असे नेते फारच कमी आहेत. असा धर्मांधतेचा माहपूर आला आहे, की तेही त्याला थांबविण्यास असमर्थ आहेत. असे वाटू लागले आहे की भारतात नेतृत्वाचे दिवाळे निघाले आहे.

**वृत्तपत्रवाले हे धर्मांध दंगली भडकविण्यात विशेष भाग घेणारे दुसरे सद्गृहस्थ आहेत.**



एके काळी अत्यंत उच्च व पवित्र समजला जाणारा पत्रकारितेचा व्यवसाय आज अत्यंत किळसवाणा झाला आहे. हे लोक एकमेकांच्या विरोधात मोठे-मोठे मथळे देऊन लोकांच्या भावना भडकवतात आणि परस्परांची डोकी फोडण्याचे काम करवून घेतात. स्थानिक वृत्तपत्रांतून भडक लेख प्रसिद्ध झाल्यामुळे एक-दोनच नाही, तर अनेक ठिकाणी दंगली झाल्या आहेत. अशा काळातही डोके व मन शांत ठेवून लिहिणारे लेखक फार कमी आहेत.

**लोकांना शिक्षण देणे, त्यांच्यामधील संकुचित प्रवृत्ति दूर करणे, धर्मांध भावना दूर करणे, परस्पर मिळून-मिसळून राहण्याची वृत्ती वाढविणे आणि भारताची सामूहिक एकता घडवणे हे वृत्तपत्रांचे आद्य कर्तवय आहे. पण आज त्यांनी अज्ञान वाढविणे, संकुचितता वाढवणे, धर्मांध बनविणे, मारामाऱ्या घडवून आणणे आणि भारताची सामूहिक राष्ट्रीयता नष्ट करणे हेच आपले प्रमुख कर्तव्य मानले आहे.** यामुळेच भारताच्या सद्यःस्थितीचा विचार करता डोळ्यांतून रक्ताश्रू वाहू लागतात आणि हृदयात प्रश्न उभा राहतो की, 'भारताचे होणार तरी काय?'

असहकार आंदलेनाच्या दिवसातील जोष व उभारी ज्या लोकांनी अनुभवली आहे, त्यांना ही स्थिति पाहून रडू येते. कुठे ते दिवस, जेव्हा स्वातंत्र्याची झलक समारे दिसत होती, आणि कुठे हे आजचे दिवस जिथे स्वराज्य केवळ एक स्वप्नच बनून गेले आहे. या दंगलींमुळे अत्याचारी शासकांना मिळालेला हाच एक तिसरा फायदा आहे. ज्या नोकरशाहीच्या अस्तित्वाला ती आज जाईल की उद्या जाईल असा धोका निर्माण झाला होता; ती आज आपले पाय इतके घट्ट रोवून उभी राहिली आहे की तिला हलवणे हे काही सोपे काम राहिलेले नाही.

**या धर्मांध दंगलींचे जर मूळ शोधले तर त्यामागचे कारण आर्थिक आहे असेच दिसून येते.** असहकार चळवळीच्या काळात नेत्यांनी व पत्रकारांनी प्रचंड त्याग केले. त्यांची आर्थिक अवस्था विपन्न झाली होती. असहकार आंदोलन शिथिल पडल्यामुळे नेत्यांबद्दल अविश्वास वाटू लागला. त्यामुळे आजकालच्या अनेक धर्मवादी नेत्यांचे धंदे डबघाईस आले. जगात जे काही काम होते त्याच्या मुळाशी पोटाचा प्रश्न नक्कीच असतो. कार्ल मार्क्सच्या तीन प्रमुख सिद्धान्तांपैकी हा एक मुख्य सिद्धान्त आहे. याच कारणामुळे 'तबळीग', 'तनकीम', 'शुद्धी' इत्यादी संघटना सुरू झाल्या. आणि त्यामुळेच आज आपली ही सांगू नये अशी लाजिरवाणी दुर्दशा झाली आहे.

बस्स्! सर्व प्रकारच्या दंगलींवर जर काही उपाय केला जाऊ शकत असेल, तर तो भारताची आर्थिक स्थिती सुधारण्यातूनच होऊ शकतो. कारण भारतातील सामान्य लोकांची आर्थिक स्थिती इतकी वाईट आहे, की एक व्यक्ती दुसऱ्याला चवली देऊन तिसऱ्याला अपमानित करायला लावू शकते. भूक आणि दुःख यामुळे व्यथित झालेला मनुष्य सर्व प्रकारची तत्त्वे खुंटीला टांगून ठेवतो. 'मरता क्या न करता' हेच खरे!

पण सध्याच्या स्थितीत आर्थिक सुधारणा होणे अत्यंत कठीण आहे. कारण सरकार हे परकीय आहे आणि ते लोकांच्या अवस्थेत सुधारणा होऊ देत नाही. म्हणूनच लोकांनी हात धुऊन त्याच्या पाठीमागे लागले पाहिजे. आणि जोवर सरकार बदलत नाही तोपर्यंत विसावा घेता कामा नये.

**लोकांचे परस्परांशी होणारे झगडे थांबविण्यासाठी लोकांमध्ये वर्ग भावना रुजणे आवश्यक आहे. गरीब, कष्टकरी व शेतकरी यांना हे स्पष्टपणे समजावून सांगितले पाहिजे, की तुमचे खरे शत्रू भांडवलदार आहेत. म्हणून तुम्ही त्यांच्या हातचलाखीपासून स्वतःला शाबूत ठेवले पाहिजे. त्यांच्या तावडीत सापडून काहीही करता कामा नये. जगातील सर्व गोरगरिबांचे, मग ते कोणत्याही जातीचे, वर्णाचे, धर्माचे वा राष्ट्राचे असोत, अधिकार सारखे आहेत. धर्म, वर्ण, वंश आणि राष्ट्रियतेचे भेदभाव संपवून तुम्ही एकजूट व्हावे आणि सरकारची शक्ती आपल्या हाती घेण्यासाठी प्रयत्न करावेत, यातच तुमचे भले आहे. या प्रयत्नांमुळे तुमचे काही एक नुकसान होणार नाही. उलट एक ना एक दिवस तुमच्या बेड्या तुटून पडतील आणि तुम्हाला आर्थिक स्वातंत्र्य मिळेल.**

जे लोक रशियाचा इतिहास जाणतात त्यांना हे माहीत आहे, की झारच्या काळात तेथेदेखील अशीच परिस्थिती होती. तेथेही कित्येक समुदाय परस्परांशी भांडत होते. पण जेव्हापासून तेथे श्रमिक शासन अस्तित्वात आले आहे तेव्हापासून तिथले एकूण चित्र बदलले आहे. आता तिथे कधीही दंगली झालेल्या नाहीत. आता तिथे प्रत्येकाला कोणा धर्माचा अनुयायी नव्हे तर 'माणूस' मानले जाते. झारच्या काळात लोकांची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची होती. त्यामुळे दंगली-भांडणे होत असत. पण आता रशियाची आर्थिक स्थिती सुधरली आहे आणि त्यांच्यामध्ये वर्गभावना विकसित झाली आहे. त्यामुळे आता तिथून कधी कुठला दंगा झाल्याची बातमी आलेली नाही.



अशा दंगलींमध्ये तशा तर अनेक निराशाजनक बातम्या ऐकायला येतात, पण कलकत्त्यातील दंगलींमध्ये मात्र एक चांगली बातमी ऐकण्यात आली. ती ही की तेथे झालेल्या दंगलींमध्ये ट्रेड युनियनच्या कामगारांनी भाग घेतला नाही. ते परस्परांशी मारामाऱ्या करण्यात अडकले नाहीत. उलट तेथील कारखान्यांमध्ये सर्व हिंदू-मुसलमान अत्यंत प्रेमाने उठबस करत होते, आणि दंगल थांबविण्यासाठीही प्रयत्न करत होते. त्यांच्यामध्ये असलेल्या वर्गभावनेमुळेच हे शक्य झाले. ते आपले वर्गहित चांगल्या प्रकारे समजू शकत होते. म्हणूनच धर्मांध दंगली थांबविण्यासाठी वर्गभावना हा एक उत्तम मार्ग आहे.

अलीकडे एक चांगली बातमी ऐकण्यात आली. ती अशी की जे धर्म परस्पर संघर्ष करण्यास, घृणा करण्यास शिकवितात; त्यांच्यावर वैतागून भरतातील नवयुवक आता त्यांच्यापासून परावृत्त होत आहेत. त्यांच्यामध्ये आता एवढा खुलेपणा आला आहे, की ते भारतातील लोकांना धर्माच्या चष्म्यातून हिंदू, मुसलमान, शीख या रूपात न पाहता सर्वांना प्रथम माणूस मानतात आणि नंतर भारतवासी. भारतामधील युवकांमध्ये असे विचार निर्माण होत आहेत, यावरून भारताचे भविष्य अत्यंत उज्ज्वल दिसते. म्हणून भारतवासीयांनी या दंगलींमुळे घाबरून जाता कामा नये, तर दंगलीसाठी पोषक वातावरणच निर्माण होणार नाही, यासाठी सज्ज होऊन प्रयत्न केले पाहिजेत.

१९१४-१९१५ च्या हुतात्म्यांनी धर्माला राजकारणापासून वेगळे केले होते. त्यांना हे चांगले कळले होते की धर्म ही व्यक्तीची वैयक्तिक बाब आहे. त्यामध्ये इतरांनी ढवळाढवळ करण्याचे काहीएक कारण नाही. यामध्ये राजकारण आणता कामा नये. कारण त्यामुळे सर्वांना एकत्र करून एकजुटीने काम करणे अशक्य होते. गदर पार्टीसारखी आंदोलने एकजुटीने व एकजीव राहू शकली ती यामुळेच. यामध्ये अनेक शीख आघाडीवर राहून हसत हसत फासावर चढले व त्यात हिंदु-मुसलमानही मागे राहिले नाहीत.

धर्माला राजकारणापासून वेगळे करण्यासाठी प्रयत्न करणारे काही भारतीय नेते आज रणमैदानात उतरले आहेत. तंटेबखेडे मिटविण्याचा हा एक चांगला मार्ग आहे आणि आम्ही त्याला पाठिंबा देतो. धर्माला जर वेगळे ठेवले गेले तर राजकारणाबाबत आपण सर्व एक होऊ शकतो, मग धार्मिकदृष्ट्या भले आपण वेगवेगळे असू.

आम्हांला वाटते की भारताविषयी खरीखुरी आस्था असणारे लोक आम्ही सांगितलेल्या उपायांवर जरूर विचार करतील. भारताचा आज जो आत्मघात होत आहे, त्यापासून ते आपल्याला वाचवतील.


●

# जगातील सर्वात मोठा युद्ध गुन्हेगार - संयुक्त राज्य अमेरिका

ऑगस्ट १९४५, दुसरे जागतिक महायुद्ध जवळपास संपल्यात जमा आहे. जर्मनीला पूर्णपणे पराभूत करण्यात आले आहे आणि फासिस्ट नाझींनी, ज्यांचे नेतृत्व हिटलर कडे होते, शरणागती पत्करली आहे. हिटलरचा मित्र असलेला इटलीचा फासिस्ट नेता मुसोलिनीला अगोदरच जनतेने चौकात फासावर लटकावले आहे. करोडो बलिदानांच्या जोरावर सोवियत संघाच्या लाल-सेनेने जर्मनीची राजधानी बर्लिनवरती विजय मिळवला आहे आणि जर्मनीची संसद असलेल्या राइशस्टाग वर लाल झेंडा अभिमानाने फडकत आहे. जर्मन हल्ल्यांमुळे फ्रांस, ब्रिटेन सहित संपूर्ण युरोपची राखरांगोळी झाली आहे. जपानची बहुतांश शहरेसुद्धा उध्वस्त झाली आहेत. आणि त्यांचा पराभव सुद्धा अटळ आहे. जपानची ६८ मुख्य शहरे बॉम्बवर्षक विमानांनी उध्वस्त केली आहेत. उत्तरेकडून सोवियत संघ अंतिम प्रहार करण्याच्या तयारीत आहे आणि त्यामुळे जपान शरणागती पत्करण्यास जवळपास तयार झाला आहे. त्याच वेळी ६ ऑगस्ट रोजी जपानच्या हिरोशिमा शहरावर अमेरिकेचा अणुबॉम्ब हल्ला... सेकंदांमध्ये शहराचा जवळपास दोन तृतीयांश हिस्सा राखेत रुपांतरीत झाला आहे. जवळपास एक लाख लोकांचे मृतदेह राख बनून ह्या राखेत मिसळले आहेत. अमेरिकेच्या व्हाईट हाउसमध्ये विजयाचा उन्माद पसरलेला आहे. तीन दिवसांनंतर ९ ऑगस्ट रोजी जपानचे आणखी एक शहर नागासाकीवर अजून एक अणुबॉम्ब हल्ला. ८०,००० लोक राखेत रुपांतरीत. व्हाईट हाउस मधील विजयोन्माद अजूनच किळसवाण्या पातळीवर पोहोचलेला. हा विजयोन्माद जपानवरील विजयामुळे निर्माण झालेला नाही, कारण जपान तर अगोदरच शरणागती पत्करण्यास तयार होता. अणुबॉम्ब टाकून अमेरिका आता भांडवली राष्ट्रांचे नेतृत्व करण्यास सज्ज झाली आहे आणि हा विजयोन्माद त्याचाच आहे.

अगदी हेच चित्र होते जेव्हा दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या शेवटी अमेरिकेने जपानवर दोन अणुबॉम्ब टाकले आणि त्याच बरोबर जपानच्या तत्काळ शरणागतीच्या घोषणेसोबतच दुसऱ्या महायुद्धाचा शेवट झाला. **बहुतांश लोकांचा हाच समज असतो की जपानने अणुबॉम्ब हल्ल्यांमुळे शरणागती पत्करली. पण हे पूर्ण सत्य नाही. जपानमधील अधिकांश शहरे अणुबॉम्ब हल्ल्यांच्या अगोदरच जवळपास उद्ध्वस्त झाली होती आणि त्यांची केवळ १० महत्वाची शहरे तोपर्यंत सुरक्षित राहिली होती. हे निश्चितपणे म्हटले जाऊ शकते की त्या वेळी जपानच्या विजयाच्या सर्व शक्यता संपुष्टात आल्या होत्या आणि जरी अणुबॉम्ब टाकले गेले नसते तरी जपान शरणागतीच्या उंबरठ्यावर उभा होता** आणि हा केवळ एक अनुमान वा तर्क नाही. जपान तोपर्यंत शस्त्रसंधी करण्यास तयार नव्हता कारण त्यांना बिनशर्त शरणागती पत्करायची नव्हती. त्याच बरोबर जपान त्याच्या अधिपत्याखालील भूभाग शाबूत ठेऊ इच्छित होता. स्टालिनच्या नेतृत्वाखालील सोवियत संघ जर तटस्थ राहून शस्त्रसंधी करण्यास तयार झाला तर काही अटी मान्य करून शस्त्रसंधी करण्यावर त्यांच्या आशा केंद्रित झाल्या होत्या. पण जेव्हा सोवियत संघाने उत्तरेकडून हल्ल्याच्या हालचाली सुरु केल्या तेव्हा जपानपुढे विनाअट शरणागती पत्करण्याशिवाय अन्य मार्ग उरला नव्हता. अमेरिकेला ही परिस्थिती समजत होती आणि ह्या परिस्थितीचा लाभ उचलण्यासाठीच अणुहल्ला केला गेला, जेणेकरून विजयाचे श्रेय अमेरिकेला मिळावे. ब्रिटेन अगोदरच अत्यंत कमकुवत झाले होते आणि आता ते जागतिक भांडवलशाहीचे नेतृत्व करण्याची कुवत गमावून बसले होते. दुसरीकडे युद्धादरम्यान अमेरिकेचे सर्वात कमी नुकसान झाले होते. त्याच बरोबर हे महायुद्ध त्यांच्या उद्योगांसाठी वरदान ठरले होते. शस्त्रास्त्रे व अन्य युद्धसामग्री यांच्या विक्रीतून अमेरिकन अर्थव्यवस्थेने प्रचंड नफा कमावला होता. अश्या परिस्थितीत जागतिक भांडवलशाहीचे नेतृत्व करण्यासाठी अमेरिका अव्वल व निर्विवाद दावेदार ठरण्याच्या मार्गावर होती. खरे तर १९४४ मधील ब्रेटन-वुड्स संधीच्या वेळीच तिचे स्थान भक्कम झाले होते परंतु जपानवरील अणुहल्ल्यांमुळे तिच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब झाले. हे हल्ले एक प्रकारचे शक्ती प्रदर्शन होते. ह्या शक्ती प्रदर्शनाची किंमत लाखो जपानी लोकांनी त्यांच्या मृत्यूने चुकवली आणि आजही वेगवेगळ्या विकारांच्या रुपात चुकवत आहेत. ह्या हल्ल्यांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या लोकांव्यतिरिक्त हल्ल्यातून जे रेडियेशन्स वातावरणात पसरले त्याचा प्रभाव आजही कायम आहे आणि तेथील जनतेसाठी तो शाप ठरला आहे. जपानमधील हा विध्वंस पार पाडल्यानंतर तेथील पुनर्निर्माणाची कंत्राटेसुद्धा अमेरिकेनेच मिळवली व त्याद्वारे अमेरिकन अर्थव्यवस्था अजूनच मजबूत झाली. युरोपमधील पुनर्निर्माण कार्याची कंत्राटे अमेरिकेनेच मिळवली. अश्या प्रकारे युद्ध काळात शस्त्रास्त्रे आणि युद्धोत्तर काळात पुनर्निर्माण कार्याची कंत्राटे मिळवून अमेरिका एक जागतिक महासत्ता बनली. तेव्हा पासून आजपर्यंत अमेरिकेने मानवतेविरुद्ध जेवढे अपराध केले आहेत त्यांची यादी देणे अशक्य आहे.

**'दहशतवादाविरुद्ध लढाई'च्या नावाखाली अमेरिकेने जगभरात जेवढी युद्धे छेडली आहेत, व त्यातून अमेरिकेला जो नफा होतो त्याचे मोजमाप करणेसुद्धा अवघड आहे. जगात युद्धे सुरु ठेवणे हे अमेरिकेला त्यांच्या अर्थव्यवस्थेच्या मंदीच्या काळात अत्यंत गरजेचे आहे. महाशक्ति बनल्यानंतर जी असंख्य युद्धे अमेरिकेने जगातील जनतेवर लादली त्यातून अमेरिकेचा प्रचंड फायदा झाला, पण हेसुद्धा सत्य आहे की जनतेच्या अदम्य प्रतिकारासमोर अमेरिकेला नेहमीच पराभव पत्करावा लागला.** १९५५ मध्ये अमेरिकेने जेव्हा व्हिएतनामवर साम्राज्यवादी युद्ध लादले त्यावेळी अमेरिकाला तिच्या सैन्य शक्तीचा प्रचंड अभिमान होता. परंतु लवकरच तिला ह्या गोष्टीची जाणीव झाली की आपल्या सैन्य शक्तीपेक्षाही झुंझार कष्टकरी जनतेची ताकत जास्त आहे. २० वर्षे चाललेल्या ह्या युद्धात अमेरिकेने अमानवीय युद्ध अपराध केले. व्हिएतनामवर कार्पेट बॉम्बिंग केली गेली आणि संपूर्ण युद्धात तब्बल ४० लाख व्हिएतनामी नागरिकांना जीव गमवावा लागला. परंतु जनतेच्या अभूतपूर्व संघर्षापुढे अमेरिका टिकू शकली नाही आणि शेवटी ह्या युद्धात तिचा अत्यंत लाजीरवाणा पराभव झाला. तत्पूर्वी, १९५३ मध्ये उत्तर कोरियाने सुद्धा जनतेच्या अदम्य साहसाचे दर्शन घडवीत अमेरिकेला पाणी पाजले होते.




**जगभरात जिथे जिथे जनतेने गुलामगिरीचे जोखड फेकून देण्याचे प्रयत्न केले, त्या प्रत्येक ठिकाणी अमेरिका तिथल्या शासकवर्गाच्या बाजूने उभी राहिली.** जिथे कुठे जनतेने विद्रोह केले, त्या सर्व ठिकाणी अमेरिकेने ते विद्रोह चिरडून टाकण्यात आपले योगदान दिले. मग ते क्युबामधील क्रांती विफल करण्याचे प्रयत्न असोत, चिलीमधील लोकनिर्वाचित अलेंदे सरकार उलथवून टाकण्यातील मध्यवर्ती भूमिका असो, समाजवादी चीनमध्ये प्रतिक्रांतीकारी शक्तींना बळ देणे असो किंवा 'चे' गव्हेरा सारख्या क्रांतीकारकांची हत्या करणे असो, ह्या प्रत्येक जनविरोधी कृत्यांमध्ये अमेरिकेने मध्यवर्ती भूमिका बजावली. इराक व अफगानिस्तान विरुद्धच्या युद्धांमध्ये सुद्धा अमेरिकेने लाखो लोकांचे जीव घेतले आहेत.

**आज इस्लामिक आतंकवाद संपवण्याच्या नावाखाली अमेरिका संपूर्ण अरब जगतात, आफ्रिका व अफगानिस्तान मध्ये युद्ध चालवत आहे. कदाचित आपल्याला हे ऐकून आश्चर्य होईल की ह्या दहशतवादाला अमेरिकेनेच निर्माण केले आहे.** १९८० च्या दशकात अमेरिकेनेच अफगानिस्तानमध्ये सोवियत साम्राज्यवादाचा सामना करण्यासाठी आणि तेथील डाव्या विचारांच्या सरकारला उलथवून टाकण्यासाठी मोठ्या प्रमाणात मुजाहिदीन तयार केले. अमेरिकेने त्यासाठी अमाप पैसा आणि शस्त्रास्त्रे त्यांना पुरवली. पुढे चालून जेव्हा हे मुजाहिदीन तिच्या कामाचे राहिले नाहीत तेव्हा अमेरिकेने अफगानिस्तानमध्ये आपला साम्राज्यवादी विस्तार करण्याचे प्रयत्न सुरु केले. तेव्हा हे मुजाहिदीन अमेरिकेचेच शत्रू बनले. जे धार्मिक कट्टरपंथी मुजाहिदीन अमेरिकेने स्वतःचे हित जपण्यासाठी तयार केले, तेच आता तिचे सर्वात मोठे शत्रू बनले होते. त्यानंतर अमेरिकेने दहशतवाद संपवण्याच्या नावाखाली अफगानिस्तानमध्ये लष्करी प्रवेश केला. इस्लोमिक स्टेट सारख्या अत्यंत क्रूर दहशतवादी संघटनेला तयार करण्यात सुद्धा अमेरिकेचाच मोठा हात आहे. सीरिया आधील असद सरकार उलथवून लावण्यासाठी अमेरिकेनेच इस्लामिक स्टेट(इसीस)ला प्रचंड प्रमाणात शस्त्रास्त्रे व पैसा उपलब्ध करून दिला. असद सरकार उलथवून लावणे अमेरिकेला शक्य झाले नाही पण ह्या धार्मिक कट्टरपंथी संघटनेची ताकत मात्र मिळालेल्या आधुनिक शस्त्रास्त्रे व पैश्यामुळे प्रचंड वाढली. त्या जोरावरच आज 'इस्लामिक स्टेट'ने इराक, सीरिया व अरब जगतातील अन्य ठिकाणी अमानुषतेचा कहर माजवला आहे. सुरुवातीला अमेरिकेने त्यांना वाढवले आणि आज तेच अमेरिकेचे मोठे शत्रू झाले आहेत. इतर अनेक दहशतवादी संघटना अमेरिकेच्या आणि अन्य साम्राज्यवादी शक्तींच्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पाठींब्यावर अस्तित्वात आल्या आहेत. उदाहरणार्थ पॅलेस्टाइनमध्ये झालेला 'हमास'चा उदय हा अमेरिका व इसराइल कडून पॅलेस्टाइनच्या जनतेचे जे भयंकर दमन व अत्याचार केले गेले त्या विरुद्धच्या प्रतिकाराच्या रुपात झाला आहे. त्याच बरोबर अमेरिका आज जगभरात दहशतवाद संपवण्याच्या नावाखाली जगभरातील निरपराध जनतेवर ड्रोन हल्ले करत आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने अमेरिकाच जागतिक दहशतवादाचा निर्माता आणि दहशतवादी राष्ट्र आहे.

**जगभरात युद्ध उभारून अमेरीकेने प्रचंड नफा कमावला आहे. युद्ध सामग्री व शस्त्रास्त्रांच्या निर्मिती मधील जगातील १० सर्वात मोठ्या कंपन्यांपैकी ७ कंपन्या अमेरिकेतील आहेत!** ह्या कंपन्यांचा अमेरिकन राजकारणावर प्रचंड प्रभाव व दबदबा आहे. ह्या कंपन्यांचा नफा कायम राहण्यासाठी युद्ध होणे अत्यंत गरजेचे आहे, जेणे करून त्यांच्या शस्त्रास्त्रांच्या उत्पादनाला मागणी कायम रहावी. त्याच बरोबर ह्या युद्धांच्या माध्यमातून अमेरिका विविध देशांमध्ये सरळ घुसखोरी करून तिथले बाजार स्वतःच्या नियंत्रणात आणू इच्छिते. मंदीच्या काळात जेव्हा भांडवलदारांचा माल विकला जात नाही त्यावेळी त्यांना नवीन नवीन बाजारपेठांची गरज भासू लागते. संपूर्ण अरब जगावर अमेरिका यासाठी युद्ध थोपत आहे कारण तिची नजर तिथल्या बाजारपेठेवर आहे. लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही आहे की अरब जगातील बहुतांश देशांनी त्यांच्या बाजारपेठा अमेरिकन भांडवलासाठी बंद ठेवल्या होत्या. ह्याच कारणामुळे अमेरिका 'लोकशाही आणि शांती'च्या स्थापनेसाठी ह्या देशांमधील तिच्या विरोधातील सरकारे उलथवून त्यांच्या ठिकाणी तिला अपेक्षित असलेले बाहुले सरकार आणू इच्छिते, जे तिच्या इशाऱ्यांवर काम करेल. इराकमध्ये सद्दाम व लीबियामध्ये गद्दाफीची राजवट उलथवून टाकण्यामागे अमेरिकेचा हाच हेतू होता, जो पूर्णत्वास गेला. अरब जगतात युद्ध चालवण्यामागे अजून एक अत्यंत महत्वाचे कारण म्हणजे तिथे उपलब्ध असलेले कच्च्या तेलाचे प्रचंड साठे! आपण बघू शकतो की जगभरात युद्ध चालू ठेवण्यात अमेरिकेचा फायदाच फायदा आहे.


जापानमधील हिरोशिमा पासून इराक- अफगानिस्तान पर्यंत अमेरिकेने असंख्य निरपराध लोकांचा बळी घेतला आहे आणि अजूनही घेतच आहे. भांडवली देशांच्या नेतृत्वकारी देशाची आपली घृणास्पद भूमिका अमेरिका तिच्या पूर्ण शक्तीनिशी पार पाडत आहे. ह्यापेक्षा मोठे दुर्दैव काय असू शकते की आपली ही अमानुष कृत्ये अमेरिका 'जागतिक शांतते'च्या नावाखाली पार पाडते आहे? परंतु दुसऱ्या महायुद्धापासून आजपर्यंतच्या इतिहासावरून एक गोष्ट अगदीच स्पष्ट आहे की जनतेच्या दुर्दम्य इच्छाशक्ती व शौर्यापुढे अमेरिकेला नेहमीच पराभूत व्हावे लागले आहे. मग ते व्हिएतनाम असो, पॅलेस्टाइन असो, इराक असो वा अफगानिस्तान असो. हा इतिहास आहे की जनतेने कुठेही अमेरिकेसमोर शरणागती पत्करलेली नाही. जगभरातील विविध देशांमधील शासनकर्ते भलेही अमेरिकेच्या सोबत असोत, पण प्रत्येक ठिकाणी जनता तिच्या विरोधात प्रतिकाराची तलवार घेऊन उभी राहिलेली आहे आणि आपण ही गोष्ट विसरता कामा नये की इतिहास जनता बनवते, शासक नव्हे!

**विराट**

●

# ‘निकारागुआ’चे महाकवी अर्नेस्टो कार्देनाल यांची कविता

## सेलफोन



अनुवाद : नारायण खराडे

तुम्ही तुमच्या सेलफोनवर बोलता,
बोलता, बोलत राहता
आणि हसता तुमच्या सेलफोनवर,
तो कसा बनला आहे याची काहीच माहिती
नसताना,
आणि तो काम कसा करतो याची त्याहूनही
कमी माहिती असताना
पण त्याने फरक काय पडतो,
अडचण ही आहे की तुम्हांला माहीत नाही,
जसे माहीत नव्हते मलाही
की कित्येक माणसे कांगोमध्ये मरतात
हजारो हजार
त्या सेलफोनपायी.
कांगोमध्ये मरतात,
त्याच्या डोंगरांमध्ये आहे कोल्टन
(सोने आणि हिरे तर आहेतच)
जे वापरले जाते सेलफोन कंडेन्सर्ससाठी
या खनिजावर ताबा मिळवण्यासाठी
बहुराष्ट्रीय कार्पोरेशन्स
लादतात हे अंतहीन युद्ध
पाच वर्षांत पन्नास लाख मृत्यूमुखी
आणि हे बाहेर माहित झालेले त्यांना नको आहे
प्रचंड संपत्तीचा देश
दारिद्र्याने गांजलेल्या लोकांचा
जगातील ८० टक्के कोल्टन साठे आहेत
कांगोमध्ये
कोल्टन तेथे पडून आहे
तीन हजार दशलक्ष वर्षांपासून
नोकिया, मोटोरोला, कॉंपॅक, सोनी
खरेदी करतात कोल्टन
पेंटागॉनदेखील, आणि दि न्यू यॉर्क टाईम्स
कार्पोरेशनसुद्धा
आणि हे बाहेर माहित झालेले नको आहे त्यांना
तसेच हे युद्ध थांबलेले त्यांना नको आहे
जेणेकरून कोल्टनवर डल्ला मारणे सुरू राहील
सात ते दहा वर्षांची मुले काढतात कोल्टन
कारण त्यांची इवली शरीरे लहानशा ढोलींमध्ये
शिरू शकतात
रोज २५ सेंटसाठी
आणि असंख्य मुले मरतात
कोल्टन पावडरमुळे
किंवा त्या पत्थराखाली चिरडून
जो कोसळतो त्यांच्यावर

दि न्यू यॉर्क टाईम्ससुद्धा
ज्याला हे बाहेर कुणालाही कळलेले नको आहे
आणि अशा प्रकारे ते राहते अज्ञात
ही सामूहिक गुन्हेगारी
बहुराष्ट्रीय कंपन्यांची...
बायबल मांडते
सत्य आणि न्याय
आणि प्रेम आणि सत्य
सत्याचे महत्त्व जे देईल आपल्याला मुक्ती
सत्य कोल्टनचेसुद्धा
कोल्टन तुमच्या सेलफोनमध्ये
ज्यावर तुम्ही बोलता आणि बोलत राहता
आणि हसता तुमच्या सेलफोनमध्ये.

## वृत्तपत्र आणि कामगार

अन्तोनियो ग्राम्शी


सध्याचा काळ हा सदस्यता मोहिमांचा काळ आहे. भांडवली वर्तमानपत्रांचे संपादक आणि प्रशासक रस्त्याने जाणाऱ्यांचे, म्हणजेच वाचकांचे, लक्ष आपल्या मालाकडे वेधून घेण्यासाठी आपली डिस्प्ले विण्डो सजवतात, आपल्या दुकानांच्या साइनबोर्ड्सची रंगरंगोटी करून वाचकांना माल खरेदी करण्याचे आवाहन करतात. त्यांचा माल म्हणजे चार किंवा सहा पानी वर्तमानपत्रे. वृत्तपतांचे मालक आणि व्यापारी यांच्यासाठी उपयुक्त अशा वर्तमान राजकीय तथ्यांची ओळख करून देणे आणि ही तथ्ये समजून घेण्याच्या पद्धती वाचकांच्या डोक्यात भरवणे यासाठीच दररोज सकाळी वा संध्याकाळी ही वृत्तपत्रे निघतात.

वर्तमानपत्राची सदस्यता घेण्यासारख्या वरकरणी अत्यंत सध्या वाटणाऱ्या गोष्टीचे महत्व आणि त्यामागील गांभीर्य यावर आपणाशी आणि विशेष करून कामगारांसोबत आम्ही चर्चा करू इच्छितो. ही एक फसवी आणि धोकादायक निवड आहे, जी काटेकोर पारखून सारासार विचार करून जाणतेपणी केली पाहिजे.

कामगारांनी भांडवली वर्तमानपत्रासोबत कुठल्याही प्रकारची संलग्नता दृढपणे नाकारली पाहिजे. भांडवली वर्तमानपत्रे (मग त्याचा रंग कोणताही असो) त्यांचे स्वतःचे विचार व हित आणि त्यांच्या विरोधात काम करणारे विचार व हितसंबंध यांच्यामधील संघर्षातील एक उपकरण असते. ह्यात छापल्या जाणाऱ्या गोष्टी एकाच विचाराने प्रभावित झालेल्या असतात, व तो म्हणजे वर्चस्वशाली वर्गाची सेवा करणे, जो वेळप्रसंगी कामगार वर्गाच्या विरोधात रुपांतरित होतो. वास्तविक, भांडवली वर्तमानपत्राच्या प्रत्येक ओळीमध्ये हा पूर्वग्रह दिसून येतो.

परंतु मजेदार गोष्ट – खरे तर ती अत्यंत हिणकस आहे – अशी की भांडवली वर्गाच्या बाजूने केल्या जाणाऱ्या ह्या क्रूर कामासाठी भांडवलदार वर्गाकडून पैसा उभा करण्याऐवजी भांडवली वर्तमानपत्रे त्याच कष्टकरी जनतेकडून पैसा उभा करतात ज्यांचा ते नेहमी विरोध करीत असतात. कामगार वर्ग त्याचा मोबदला वेळोवेळी आणि उदारपणे चुकवत राहतो.

लाखो कामगार भांडवली वर्तमानपत्रांना नियमितपणे आपले पैसे देतात, आणि त्याद्वारे त्यांची ताकद वाढवण्यास हातभार लावतात. का? ट्राम वा रस्त्यावर एखादे भांडवली वर्तमानपत्र विकत घेणाऱ्या पहिल्या कामगाराला तुम्ही हा प्रश्न जर विचारला, तर तुम्हाला उत्तर मिळेल : ‘कारण मला हे जाणून घेण्याची इच्छा आहे की माझ्या आजूबाजूला काय काय चालले आहे’. ही गोष्ट मात्र त्यांच्या लक्षात येत नाही की बातम्या आणि त्या बनवण्यासाठी वापरलेली



सामग्री अशा कलात्मक पद्धतीने मांडली जाते की वाचकांचे विचार एका निश्चित दिशेने नेता येणे शक्य व्हावे आणि त्यांच्या अंतर्मनाला प्रभावित करता यावे. तरीही त्याला हे मात्र माहित आहे की हे वर्तमानपत्र संधिसाधू आहे, दुसरे वर्तमानपत्र श्रीमंतांसाठी आहे, तिसरे, चौथे, पाचवे वर्तमानपत्र राजकीय पक्षांशी संबंधित आहे, ज्यांचे हितसंबंध त्याच्या हितसंबंधांच्या बिलकुल विरुद्ध आहेत.

भांडवली वर्तमानपत्रे अत्यंत साध्या-साध्या गोष्टी कशा प्रकारे भांडवली वर्गाच्या बाजूने व कामगार वर्गाच्या व त्याच्या राजकारणाच्या विरोधात छापतात, ते कामगार दर दिवशी बघत असतात. काय, संप झाला? जिथवर भांडवली वर्तमान पत्रांचा प्रश्न आहे, कामगार नेहमीच चूक असतात. काय, कुठे तरी निदर्शने झाली? निदर्शक नेहमीच चूक असतात. फक्त ह्यासाठी की ते कामगार आहेत आणि त्यांचे डोके नेहमीच गरम असते, ते हिंसक होतात, उपद्रव निर्माण करणारे असतात. सरकारने नवीन कायदा पारित केला आहे? तो नेहमीच चांगला, उपयोगी व न्याय्य असतो, जरी प्रत्यक्षात तसे नसेल तरी. आणि एखादी निवडणूक, राजकीय वा प्रशासकीय संघर्ष आहे? तेव्हा सगळ्यात चांगला कार्यक्रम आणि उमेदवार भांडवली पक्षाचेच असतात.

ज्या तथ्यांबाबत भांडवली वर्तमानपत्रे एकतर मुग गिळून गप्प असतात किंवा कामगारांची दिशाभूल करतात, त्यांना भ्रमित करण्यासाठी, त्यांना अज्ञानी ठेवण्यासाठी ज्यांची खिल्ली उडवतात व ज्यांना खोटे सिद्ध करतात, अशा तथ्यांबाबत आपण येथे बोलतसुद्धा नाही आहोत. असे असूनही भांडवली वर्तमानपत्रांना कामगारांकडून मिळणारी आपराधिक मौन स्वीकृती खरोखर अतुलनीय आहे. आपल्याला याच्या विरुद्ध उभे राहावे लागेल आणि कामगारांना ह्याविषयी वास्तवाचे भान करून द्यावे लागेल. आपल्याला पुन्हा पुन्हा हे सांगावे लागेल की भांडवली वर्तमानपत्र विक्रेत्याच्या हातात गोंधळलेल्या अवस्थेत पैसे टेकवणे हे भांडवली वर्तमानपत्राच्या हातात तोफेचे गोळे देण्यासारखे आहे, ज्यांचा उपयोग ते योग्य वेळी कामगार वर्गाच्या विरोधातच करतील.

जर कामगार वर्गाला ह्या मूलभूत सत्यांची जाणीव करून दिली असती तर ते त्याच एकजुटीने आणि शिस्तीने भांडवली वृत्तपत्रांवर बहिष्कार टाकायला शिकले असते, अगदी त्याच प्रमाणे, जसे भांडवलदार समाजवादी वृत्तपत्रे असलेल्या कामगारांच्या वर्तमानपत्रांचा बहिष्कार करतात. आपली विरोधक असलेल्या भांडवली वृत्तपत्रांना सहयोग देऊ नका. सर्व भांडवली वर्तमानपत्रांच्या सदस्यता अभियानांच्या ह्या काळात आपला नारा हाच असला पाहिजे. बहिष्कार करा, बहिष्कार करा, बहिष्कार करा!

**अनुवाद - अमित शिंदे**

●

# ‘फॉक्सकॉन’ची महाराष्ट्रातील भांडवल गुंतवणूक
# स्वदेशीचा राग आळवणाऱ्या पाखंड्यांचा खरा चेहरा उघड

अमित शिंदे

मे, २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारने ‘मेक इन इंडिया’चा नारा देऊन त्यांच्या भांडवलदार मालकांना खुश करण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. ‘मेक इन इंडिया’च्या नावाखाली आंतरराष्ट्रीय भांडवलाला पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात देशात गुंतवणुकीसाठी आकर्षित करण्यासाठी भांडवलदारांचे ‘प्रधानसेवका’ असलेल्या मोदींनी एका वर्षात सातत्याने कित्येक देशांचे दौरे केले. मोदींच्या सततच्या परदेश दौऱ्यांवरून, मागील सर्व सरकारांनी परदेशी भांडवल आणण्यासाठी जो ‘लवचिकपणा’ दाखवला होता, त्यापेक्षा अधिक ‘लवचिक’ होण्यात हे सरकार कुठलीही कसूर बाकी ठेवणार नाही, हे लक्षात येऊ शकते. संसदेत विरोधी बाकांवर असताना ‘भाजप’ने संरक्षण, विमा क्षेत्रामध्ये विदेशी गुंतवणुकीला विरोध करण्याचे नाटक उत्तम वठवले. पण त्यानंतर निवडणूक काळात ‘अच्छे दिन’चा ‘जुमला’ उडवून सत्तेत आल्यानंतर भाजपने हे विरोधाचे नाटक विसरून संरक्षण आणि विमा क्षेत्रामध्ये विदेशी भांडवलासाठी दरवाजे उघडले आहेत. त्याही पुढे जाऊन आजपर्यंत खाजगी भांडवलापासून अलिप्त असलेली ‘भारतीय रेल्वे सेवा’ खाजगी हातांमध्ये सोपवण्याच्या दिशेने गरजेची असलेले सुरुवातीची पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. संसदीय व्यवस्थेचे चारित्र्य आणि वित्तीय भांडवलाच्या जागतिकीकरणाचा आजचा काळ बघता असे म्हणणे अतिशयोक्ती वा चूक ठरणार नाही की सरकार कुणाचेही बनो, कोणतेही भांडवलधार्जिणे सरकार विदेशी भांडवल गुंतवणूक थांबवू शकणार नाही.

देशातील संसाधने भांडवलदारांच्या हातात सोपवण्यासाठी आणि स्वस्तात श्रमाचे शोषण करण्यासाठी जो ‘जुमला’ ह्या वेळी उडवला गेला आहे त्याचे नाव आहे - मेक इन इंडिया! २५ सप्टेंबरला ‘मेक इन इंडिया’ची औपचारिक सुरुवात करताना मोदींनी म्हटले होते की भांडवलदारांना बऱ्याच ‘अडचणीं’मुळे देश सोडताना बघून त्यांना फार दुःख होते आणि भांडवलदारांना ज्या ‘अडचणीं’चा सामना करावा लागतो त्या अडचणी ते दूर करू इच्छितात. हा कार्यक्रम सुरु होण्याअगोदर केंद्र सरकारच्या वाणिज्य मंत्री निर्मला सीतारामन यांनी एक पत्रकार परिषद घेऊन सांगितले होते की ‘मेक इन इंडिया’साठी आरंभीची आवश्यक पाऊले म्हणून त्यांनी विविध क्षेत्रांतील विदेशी गुंतवणुकीवरची मर्यादा हटवली आहे किंवा वाढवली आहे, परवाना प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी ती ऑनलाइन केली आहे. ह्या परवान्यांचा वैधता कालावधी वाढवून तीन वर्षे करण्यात आला आहे आणि बरेच नियम व प्रक्रिया एक तर रद्द करण्यात आल्या आहेत किंवा त्यांना ‘सुलभ’ करण्यात आले आहे. परवाना प्रक्रियेचे नियम आणि प्रक्रिया रद्द करणे किंवा त्यांना अधिक ‘सुलभ’ बनवणे याचा अर्थ काय, हे सहज समजू शकते. पर्यावरण विषयक क्लियरेंस, जमिनींचे विना-अडथळा अधिग्रहण आणि श्रम कायद्यांमध्ये भांडवलदारांच्या सोयीचे बदल, हाच त्याचा अर्थ असतो.

नरेंद्र मोदींच्या ‘मेक इन इंडिया’च्या आवाहनाला प्रतिसाद देत स्पाइस ग्रुप, सॅमसंग, हिताची, हुआवेई, पोस्को सारख्या अंतरराष्ट्रीय कंपन्या भारतामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यासाठी पुढे आल्या आहेत. तैवान स्थित जगातील सर्वात मोठी इलेक्ट्रॉनिक उपकरण उत्पादक कंपनी ‘फॉक्सकॉन’चे चेयरमैन टेरी गोऊ यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत फॉक्सकॉन महाराष्ट्रामध्ये ५ बिलियन अमेरिकन डॉलर्सची गुंतवणूक करत असल्याची घोषणा केली आणि या यादीत आणखी एक नाव जोडले गेले. फॉक्सकॉन महाराष्ट्रात येण्यामुळे जवळजवळ ५०,००० नवीन रोजगार निर्माण होतील, असेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्र सरकारनेसुद्धा ‘फॉक्सकॉन’ला पुणे-मुंबईच्या दरम्यान १५०० एकर जमीन उपलब्ध करून देणार असल्याची घोषणा केली. ‘मेक इन इंडिया’च्या घोषणे नंतर देशात झालेली ही सर्वात मोठी विदेशी गुंतवणूक आहे. फॉक्सकॉन एप्पल, ब्लैकबेरी,झिओमी सारख्या मोठ्या मोबाइल कंपन्यांसाठी इलेक्ट्रॉनिक उपकरणे तयार करते. ‘फॉक्सकॉन’च्या जगभरातील कारखान्यांमध्ये जवळपास १२ लाख कामगार काम करतात. चीनमधील एकट्या शेनझेन स्थित कारखान्यामध्ये १,२०,००० कामगार काम करतात. परंतु आपण गुंतवणूक आणि रोजगाराचे डोळे दिपवून टाकणारे आकडे बघताना ‘फॉक्सकॉन’च्या चीनमधील कारखान्यांमध्ये कामगारांकडून कशा नारकीय परिस्थितीमध्ये १२-१४ तास काम करवून घेतले जाते, तेसुद्धा आपण विसरता कामा नये. ‘फॉक्सकॉन’च्या चीनमधील कारखान्यांमध्ये कशा प्रकारे कामगारांचे शोषण केले जाते, ते अगोदर पाहू.

**कामाची नारकीय परिस्थिती :**

फॉक्सकॉनच्या शेनझेनमधील कारखान्यांतील जवळपास १,२०,००० कामगारांना कंपनी आपल्याच होस्टेल्समध्ये ठेवते. होस्टेल्सच्या एकाच खोलीमध्ये ६ ते २४ लोकांना कोंबण्यात येते. कंपनीच्या दृष्टीने होस्टेल्स म्हणजे कामगारांसाठी निर्माण केलेली सुविधा असली तरी प्रत्यक्षात ही होस्टेल्स एखाद्या तुरुंगापेक्षा वेगळी नाही. ह्या होस्टेल्समध्ये व कारखान्यांमध्ये कामगारांच्या हालचाली टिपण्यासाठी ठिकठिकाणी कॅमेरे बसवण्यात आले आहेत. मागील काही वर्षांपासून ‘फॉक्सकॉन शेनझेनमधील कारखान्यांमध्ये कामगारांकडून किती भयंकर परिस्थितीत काम करवून घेते त्याच्या बातम्या वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या आहेत. येथे कामगारांच्या आत्महत्यांच्या घटना सुद्धा वेळोवेळी घडल्या आहेत. आत्महत्या करणारे बहुतेक कामगार हे २० ते २५ वयोगटातील तरुण-तरुणी आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर ‘फॉक्सकॉन’वर मोठ्या प्रमाणात टीकासुद्धा झाली आहे. तेव्हापासून ‘फॉक्सकॉन’ने आपल्या कामगारांना कुठल्याही ‘बाहेरील’ व्यक्ती वा संस्थेस कंपनीशी संबंधित कुठल्याही समस्येची माहिती देण्यावर प्रतिबंध घातले आहेत. या बाबतीत कामगारांना धमकावले जाते. जेव्हा ‘फेयर लेबर असोसियेशन’ (एफ.एल.ए.) नामक संस्थेने ‘फॉक्सकॉन’च्या चीनमधील तीन कारखान्यांची (गुप्त) तपासणी केली तेव्हा कारखान्यांमधील कामगारांची सुरक्षा व आरोग्याच्या अनेक समस्या असल्याचे तसेच कामगारांना कुठलाही अधिक मोबदला न देता अधिक वेळ काम करवून घेतले जात असल्याचे समोर आले. कित्येक मानवाधिकार संघटना ज्यावेळी गुप्तपणे ‘फॉक्सकॉन’च्या डॉरमेटरीज (कामगारांची आराम करण्याची जागा) पर्यंत पोहोचल्या तेव्हा कारखाना व्यवस्थापन कामगारांची दिनचर्या कशा प्रकारे नियंत्रित करते, ते उघडकीस आले. कामगारांचे कामाचे तास कारखान्याच्या व्यवस्थापनाकडून निश्चित केले जातात, कामगारांना विशिष्ट वस्तू सोडून इतर वस्तूंचा उपयोग करण्याची परवानगी नाही. जेव्हा एखादा कामगार ह्या नियमांचे उल्लंघन करताना पकडला जातो तेव्हा त्याला सर्वांसमोर अपमानित केले जाते. जेव्हा कंपनीचे एखादे नवीन उत्पादन बाजारात येते तेव्हा कामगारांकडून १२-१४ तास काम करवून घेतले जाते. त्या काळात कित्येक कामगारांना कारखान्यामध्येच झोपणे भाग पडते. ह्या कारखान्यांमधील बहुतेक कामगार हे सामान्य आर्थिक पार्श्वभूमीतून आलेले तरुण-तरुणी असल्यामुळे कंपनी त्यांचा फायदा घेते. इथे काम करणारे बहुतेक कामगार हे दुरवरच्या भागातून आलेले तरुण असतात. त्यांना त्यांच्या घरी जाण्यासाठी वर्षातून केवळ एकदा सुट्टी मिळते.

‘फॉक्सकॉन’चा इतिहास इतका कुख्यात असूनही महाराष्ट्र सरकारने तिच्यासाठी लाल गालिचा अंथरला आहे. एकीकडे महाराष्ट्र सरकार ‘फॉक्सकॉन’ला १५०० एकर जमीन उपलब्ध करून देणार आहे तर दुसरीकडे ‘फॉक्सकॉन’ अदानी ग्रुपसोबत जॉइंट वेंचर करण्याबाबत चर्चा करीत होती, हा फक्त योगायोग नाही. अदानी औद्योगिक समूहाने नरेंद्र मोदींच्या हजोरो कोटींच्या निवडणूक-प्रचार खर्चामध्ये सिंहाचा वाटा उचलला होता! अजून एक गोष्ट इथे आवर्जून नमूद केली पाहिजे. ‘फॉक्सकॉन’ने एक व्यापारिक करार सुभाष घई यांच्या ‘विसेलिंग वुड्स इंटरनेशनल’ सोबत केला आहे. ह्या करारानुसार ‘विसेलिंग वुड्स इंटरनेशनल’ कंपनी फॉक्सकॉनला डिजिटल कंटेंट निर्माण करण्यात मदत करणार आहे. डिजिटल कंटेंट निर्माण करण्याच्या नावाखाली सुभाष घईंची कंपनी ‘फॉक्सकॉन’च्या बाजूने जनतेचे सामान्य मत तयार करण्याचे काम करेल, हे उघडच आहे. हे भांडवलशाहीचे नवीन कार्यरूप आहे! ज्या तत्परतेने महाराष्ट्र सरकारने ‘फॉक्सकॉन’साठी जमीन उपलब्ध करून दिली आहे आणि श्रम सुधारणा लागू करण्याबद्दल आपली प्रतिबद्धता जाहीर केली आहे, त्यावरून हे सिद्ध झाले आहे की कधी काळी स्वदेशीचा राग आळवणाऱ्या तथाकथित राष्ट्रवाद्यांचे हे सरकार विदेशी भांडवलासमोर गुडघे टेकून त्याच्या स्वागतास उभे आहे.

●

# इमारती कोसळून दरवर्षी होणाऱ्या शेकडो मृत्यूंना जबाबदार कोण?

४ ऑगस्टला ठाणे जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे एक जुनी इमारत कोसळून ११ लोक मृत्युमुखी पडले व ७ लोक जखमी झाले. ह्या घटनेच्या एक आठवडा आधीच मुंबईतील ठाकुर्ली परिसरात मुसळधार पावसामुळे एक ३ मजली इमारत कोसळल्यामुळे ९ लोकांचा मृत्यू झाला होता. अश्या प्रकारच्या इमारत दुर्घटना ही आता सामान्य बाब झाली आहे. केवळ २००८ ते २०१२ च्या दरम्यान १०० हून अधिक इमारती कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. २०१३ मध्ये एप्रिल ते जून महिन्यात १०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला. त्याव्यतिरिक्त ४ एप्रिल २०१३ रोजी एक बांधकाम चालू असलेली इमारत कोसळून ७४ लोकांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये बहुतांशी बांधकाम करणारे मजूर आणि त्यांच्या कुटुंबियांचा समावेश होता. मागील वर्षी तामिळनाडू मध्ये सुद्धा एक ११ मजली इमारत मुसळधार पावसात कोसळली ज्यात ६१ लोक मृत्युमुखी पडले. अश्या घटनांची ही यादी वाढतच जाईल.

ढोबळमानाने अश्या दुर्घटना दोन प्रकारच्या असतात. पहिला प्रकार ज्यात अतिशय जुन्या इमारती मुसळधार पावसामुळे व मोडकळीस आल्यामुळे कोसळतात. दुसरा प्रकार निकृष्ट प्रतीच्या बिल्डिंग मटेरीअलचा वापर आणि बांधकामाच्या चुकीच्या व असुरक्षित पद्धतीमुळे बांधकाम चालू असलेल्या इमारती कोसळणे हा आहे. ह्या दोन्ही प्रकारच्या दुर्घटनांमध्ये दरवर्षी शेकडो माणसे मारली जातात. त्यातून सरकारच्या कार्यक्षमतेवर आणि जबाबदारपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होते.

जुन्या इमारतींपुरते बोलायचे झाले तर एकट्या मुंबईमध्ये अश्या १४,००० इमारती आहेत ज्या ७० वर्षांपेक्षा जास्त जुन्या आहेत. त्यातील ९०० हून अधिक इमारती अत्यंत धोकादायक अवस्थेत आहेत. प्रश्न हा आहे की अश्या इमारतींमध्ये किती लोक राहत आहेत? तिथे राहणाऱ्या लोकांना हे माहिती नाही का की ते मृत्यूच्या सापळ्यात राहत आहेत? हे अगदी उघड आहे की अशा इमारतीमध्ये राहण्याचे धोके २४ तास मृत्यूच्या छायेत राहणाऱ्या ह्या लोकांपेक्षा अधिक कोणाला माहित असणार?

बी.बी.सी.च्या एका रिपोर्ट नुसार मुंबई हे आशिया खंडातील घरांच्या किमती व भाडे सर्वाधिक असलेल्या शहरांपैकी एक शहर आहे. ब्लूमबर्ग विश्लेषण २०१२ नुसार एका सामान्य भारतीय माणसाला मुंबईमध्ये एक चांगला सुविधाजनक फ्लॅट घेण्यासाठी ३०० वर्ष काम करावे लागेल. त्याच बरोबर मध्यम वर्गातील एक मोठा हिस्सा सुद्धा मुंबई मध्ये घर घेण्यास असमर्थ आहे. घरांचे भाडे सुद्धा इतके जास्त आहे की एका कुटुंबाला राहण्यासाठी १ बी.एच. के. फ्लॅटसाठी १२ ते २० हजार मोजावे लागतात आणि त्या बरोबरच १ ते २ लाखांपर्यंत ॲडवान्स भरावा लागतो. साहजिकच जेमतेम उत्पन्न असलेल्या एका व्यक्तीला तिच्या कुटुंबासाठी घर खरेदी करणे किंवा भाड्याने घेणे स्वप्नवत गोष्ट बनते. पर्यायाने लोकांना झोपडपट्ट्या वा चाळींमध्ये राहावे लागते. इथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही आहे की मुंबईतील ६० टक्के लोकसंख्या झोपडपट्ट्या व चाळींमध्ये राहते. दुसरीकडे मुंबई मध्ये सुमारे ५ लाख फ्लॅट श्रीमंत ग्राहकांच्या प्रतीक्षेत आहेत व त्यांच्या जाहिरातींनी वर्तमानपत्रांमध्ये पानेच्या पाने भरलेली असतात.

अशा परिस्थितीमुळे लोक जुन्या व मोडकळीस आलेल्या घरांमध्ये राहण्यास बाध्य होतात. घरमालक अशा घरांची डागडुजी करण्याची तसदीसुद्धा घेत नाहीत. त्यामुळे अशा इमारती अधिकच धोकादायक बनतात. जे लोक स्वतःच्या घरांमध्ये राहतात ते सुद्धा आपले राहते घर सोडणे टाळतात कारण त्या इमारतीचा पुनर्विकास किंवा पुनर्वसन न होण्याच्या परिस्थितीत त्यांची जमीन जाण्याचा धोका असतो व तसे झाल्यास ते बेघरच होतील. ठाण्यात ४ ऑगस्ट रोजी झालेल्या दुर्घटनेमध्ये हेच बघायला मिळाले होते. महानगर पालिकेने धोकादायक इमारतींची ओळख करून त्यांना घरे खाली करण्याच्या नोटीस देऊन सुद्धा लोकांनी घरे रिकामी करण्यास नकार दिला होता, कारण त्यांच्या कडे राहण्यासाठी दुसरा कुठलाही पर्याय उपलब्ध नव्हता.

अशा वेळी महानगर पालिका वा सरकारची ही जबाबदारी ठरते की जोपर्यंत ह्या इमारतींचा पुनर्विकास किंवा पुनर्निर्माण होत नाही तोपर्यंत ह्या लोकांची ट्रान्जिट कॅम्प किंवा इतर कुठल्या ठिकाणी राहण्याची व्यवस्था करावी. परंतु महानगरपालिका केवळ नोटीस पाठवून किंवा कधी कधी ती सुद्धा न पाठवताच आपली जबाबदारी झटकून टाकते. पर्यायाने त्याची किंमत शेकडो लोकांना त्यांच्या मृत्यूने चुकवावी लागते.

आता दुसऱ्या प्रकाराच्या दुर्घटनेकडे येऊयात. महागडी घरे विकत घेण्यास असमर्थ असलेले लोक वर्तमानपत्रांमधील स्वस्त घरांच्या जाहिरातींच्या जाळ्यात अडकतात. ही स्वस्त घरे कशी असतात? ही स्वस्त घरे वास्तविक नवखे व किरकोळ बांधकाम कंत्राटदार यांच्याकडून निर्माण केलेली बेकायदेशीर घरे असतात. अशी घरे बांधत असताना गृहनिर्माणातील कुठल्याही शास्त्रीय मानकांचे पालन ह्या कंत्राटदारांकडून करण्यात येत नाही. अश्या बांधकामामध्ये बहुतांशी वेळा अत्यंत निकृष्ट बांधकाम साहित्याचा वापर केला जातो व कुठल्याही सुरक्षा मानकांचा विचार केला जात नाही. पोलिस व महापालिकांची ह्यात महत्वाची भूमिका असते. ते अश्या बांधकाम व्यावसायिकांकडून मलिदा खाऊन बेकायदेशीर बांधकामांकडे कानाडोळा करतात. अशी बेकायदेशीर घरे बांधण्याचे प्रमाण ह्या एकाच गोष्टीवरून लक्षात यावे

पान ९ वर

• संपादक मंडळ – नारायण खराडे, विराट चौधरी • संपादकीय कार्यालय- रूम नंबर १०३, बिल्डिंग नंबर ६१, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३ मो. नं. ९७६९९०३५८९, ९७६४५९४०५७, ९६१९०३९७९३ • व्ही २ एंटरप्राइज, गाला-१०, सर्वे न ३/१३, वालीव, वसई पूर्व, ठाणे-४०१२०८, फोन न. ०२५०-६०६६६०८ कडून मुद्रित